
# शब्द रुची

ऑगस्ट २०१६
मूल्य १० रु.
पृष्ठे ४८




**रंगयोगी**

**'चिन्ह'च्या 'गायतोंडे' ग्रंथाच्या निमित्ताने**

नरेंद्र दामले

**ब्रेक्सिट**

**एक खळबळजनक घटस्फोट**

डॉ. अनंत लाभसेटवार

**'माध्यम'चं वेगळेपण आणि 'आमादमी विदाऊट पार्टी'**

प्रवीण बर्दापूरकर

ऑफबीट भटकंतीचा १३ वर्षांचा प्रवास

isha tours®

Lets explore the world...

मुख्य कार्यालय -
१ए, मुरलीधर सोसायटी, ब्राम्हण सोसायटी,
गोडबोले हॉस्पिटलच्या मागे, नौपाडा, ठाणे. (प)
✆ ०२२ २५४३ ७४१७ / २५४३ ७४५८, ९३२०२ ३१९१०
दादर - ९३२००३१९१०, बोरीवली - ९३२४५३१९१०,
पुणे - ९३२०१३१९१० लेह - ९३२०२३१९१०



## स्कॅन्डीनेव्हिया

फिनलँड-स्विडन-नॉर्वे

(नॉर्थन लाईटस् स्पेशल)

१४ डिसेंबर ते २१ डिसेंबर

## आसाम-नागालॅन्ड मेघालय

(हॉर्नबिल फेस्टीवल स्पेशल)

२८ नोव्हेंबर ते ७ डिसेंबर





## विंटर लडाख

(चादर ट्रेक)

०७ - १३ जानेवारी २०१७
२१ - २७ जानेवारी २०१७
०३ - ०९ फेब्रुवारी २०१७
१६ - २३ फेब्रुवारी २०१७

## अंदमान

(सावरकर पूण्यतिथी विशेष)

२५ फेब्रुवारी - २ मार्च २०१७



## श्रीलंका

०२ - १० नोव्हेंबर २०१६

(व्हेल वॉचींग सह)

## भूतान

०८ - १५ नोव्हेंबर '१६, १९ - २६ मार्च '१७
०९ - १६ एप्रिल '१७, १४ - २१ मे '१७

## ताडोबा, भरतपूर, रन ऑफ कच्छ

(वाईल्ड लाईफ सफारी)







info@ishatours.net | ✆ 8080 144 000 | www.ishatours.net

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

ऑगस्ट २०१६, वर्ष तिसरे
अंक चौथा, मूल्य १० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर
मुखपृष्ठ : ग्रंथाली संगणक विभाग

**कार्यालयीन संपर्क**

**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com

**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप / मधु भोसले**
granthaliad@gmail.com

**फेसबुक आणि वेबसाईट संपर्क**
**दर्शना पवार ९९३०७३२९१३**
granthali01@gmail.com

**वितरण व्यवस्थापक – विलास जोशी**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

## संपादकीय...

पिकली पाने कधी ना कधी गळणार, अशी समजूत घालण्याचा कितीही प्रयत्न केला तरी मराठी साहित्यविश्वाला दीर्घकाळ उणीव जाणवतच राहील, अशी काही मोजकी माणसे होऊन जातात. डॉ. रा.चिं. ढेरे हे निर्विवाद अशा सारस्वतांपैकी एक होते. अरुण जाखडे यांनी म्हटल्याप्रमाणे एका लेखात मावूच शकणार नाही असे, हे व्यक्तिमत्त्व होते, तर शशिकांत सावंत यांनी सूचित केल्याप्रमाणे संशोधकांचा दीपस्तंभ आणि कठोर टीकाकाराची लेखणीदेखील थबकावी, असे अभ्यासक होते. त्यांच्यावरील दोन प्रातिनिधिक लेख म्हणजे 'ग्रंथाली' परिवारातर्फे त्यांना वाहिलेली श्रद्धांजली होय.

**– संपादक**

---

### अनुक्रमणिका



४
**ऋषितुल्य नव्हे; ऋषीच**
अरुण जाखडे

१२
**संशोधकांचा दीपस्तंभ**
शशिकांत सावंत



१६
**रंगयोगी**
**'चिन्ह'च्या 'गायतोंडे' ग्रंथाच्या निमित्ताने**
नरेंद्र दामले




२२
**ब्रेक्झिट : एक खळबळजनक घटस्फोट**
डॉ. अनंत लाभसेटवार


**माध्यम'चं वेगळेपण आणि आमादमी विदाऊट पार्टी'** – प्रवीण बर्दापूरकर / २८

**भारताचा उत्तर ध्रुव** – आत्माराम परब, नरेंद्र प्रभू / ३२

**ग्रंथाली प्रकाशन वृत्तांत** / ३६–३७

**रोहन प्रकाशन, पद्मगंधा प्रकाशन, साधना प्रकाशन** / ३८ ते ४०

**'ग्रंथाली' परीक्षणे** – चांगदेव काळे / ४२



# ऋषितुल्य नव्हे, ऋषीच

अरुण जाखडे

अण्णांवर लिहिणे इतके का सोपे आहे? त्यांच्या किती प्रतिमा समोर येतात. त्यातली कोणतीही एक प्रतिमा एका लेखात बसू शकत नाही. दोन मुख्य प्रतिमा - एक संशोधक व दुसरी त्यांचे व्यक्तित्व. त्यांच्या व्यक्तित्वातसुद्धा कितीतरी गोष्टी आहेत. एक गृहस्थी, एक सुहृदयी मित्र, एक रसिक माणूस, जीवनातील विविध गोष्टींबद्दल कुतूहल आणि रस असणारे! ही यादी आणखी वाढू शकते. गेली वीस-पंचवीस वर्षे त्यांच्या सहवासात राहिल्यानंतर अण्णांच्या अशा कितीतरी प्रतिमा डोळ्यांसमोर उभ्या राहतात. ह्या प्रतिमांना अनेकांनी वेगवेगळी रूपे दिली. कोणी ऋषितुल्य, कोणी व्रतस्थ, कोणी शोधयात्री, कोणी कवी, कोणी मनस्वी, कोणी फकिरी वा सन्यस्त वृत्तीचा आणि आणखी कोणी काही. ज्यांना ते जसे दिसले, भावले, अनुभवले तसे. ह्या सगळ्या गोष्टी इतक्या एकरूप आहेत की त्यातला एक पदर बाजूला काढून फक्त अण्णा दाखवणे अशक्य आहे.

डॉ. रा.चिं. ढेरे यांच्यासारखी अफाट माणसं शतकात एखाद-दुसरी होत असतात आणि ती आपल्याला भेटली, त्यांच्याबरोबर काम करता आलं, आयुष्याचा, माझ्या आयुष्याचा जवळजवळ एकतृतीयांश भाग त्यांच्याबरोबरच घडला, हे माझ्यासाठी तरी फार अद्भुत आहे. कल्पनातीत आहे आणि हे सगळे दिवस आता भूतकाळात किंवा आठवणीत जमा झाले. त्या गप्पा, त्या चर्चा, ते त्यांचे बोलणे, यांतूनच आपल्या मनाला आणि आयुष्याला आकार मिळतो, तसा मला मिळाला, शल्य एकच की याची परतफेड वा कोणती गुरुदक्षिणा अण्णांना मी देणार? परमेश्वराचे आभार की त्याने मानवाला विस्मृतीबरोबर स्मृतीचे अभय दिले आहे. ह्या माझ्या स्मृतीत ते अविस्मरणीय आणि सर्जनशील दिवस आहेत.

ह्या स्मृती जशा व्यक्तिगत व ज्ञानात्मक स्वरूपाच्या आहेत; तशाच प्रकाशकीय अनुभवांच्याही आहेत. ग्रंथ प्रकाशनाच्या निमित्ताने निर्माण झालेला स्नेहभाव कौटुंबिक संबंधांपर्यंत परावर्तित झाला, पण या ठिकाणी मात्र मला संशोधक-प्रकाशक या नात्यातील ज्ञानात्मक व सृजनात्मक संबंधच सांगावेसे वाटतात. माझ्याबाबतीत म्हणायचे झाले तर 'लेखकांनी घडवलेला प्रकाशक' असेच म्हणावे लागेल. अनेक मान्यवर प्रतिभावंतांची, अनुभवी व व्यासंगी लेखकांची पुस्तके प्रकाशित करताना मी ह्या सर्व लेखकांबरोबरच्या चर्चा टिपकागदाप्रमाणे टिपल्या.

माझ्या प्रकाशनसंस्थेचा प्रारंभच अण्णांच्या पुस्तकांनी झाला आणि पुढे त्यांची पुस्तके प्रकाशित करत राहिलो. यातूनच प्रकाशन संस्थेला एक आकार आला. मी अनेक मान्यवर व नवोदित लेखकांची उत्तम पुस्तके काढली, असे जाणकार लोक म्हणत असतात, हे खरेही असेल; पण मी स्वत: व माझी संस्था अण्णा आणि त्यांच्या पुस्तकांनाच केंद्रस्थानी ठेवत आलो. बाकीचा व्याप हाही त्या अनुषंगानेच, म्हणजे संशोधन, समीक्षा ह्या विषयातच वाढत गेला. ह्यामुळेच संस्थेला एक चेहरा प्राप्त झाला. त्याचे सगळे श्रेय अण्णांच्या प्रकाशित केलेल्या ग्रंथांनाच आहे. अण्णांच्या

ठांथांमुळेच मी 'ग्रंथप्रकाशक' झालो, याचा मला सार्थ अभिमान आहे.

मी खरा फक्त पुस्तकप्रेमी आहे. आजही मला माझी स्वत:ची ओळख तेवढीच सांगायला आवडते. ह्या पुस्तकप्रेमातून प्रकाशन संस्था निर्माण झाली. हा सगळा इतिहास विस्तारभयास्तव बाजूला ठेवू. पण प्रकाशन व्यवसाय सुरू करताना मनात असाही विचार होता की, इतक्या प्रकाशन संस्था असताना आपण वेगळे काय करू शकतो? दुसरी माझी भूमिका म्हणजे प्रकल्प घेऊन काम करणे. एखादा प्रकल्प घ्यायचा आणि त्यात काही वर्षे स्वत:ला गुंतवणे ही गोष्ट मला आवडते. ही भूमिका ठेवूनच डॉ. ढेरे यांच्या पूर्वप्रकाशित ग्रंथांचे पुनर्व्यवस्थापन करून पुढील काळात ते प्रकाशित करणे आणि त्यांचे पुढील होणारे नवीन प्रकल्प प्रकाशित करणे हाच एक प्रकल्प करण्याचा संकल्प केला.

असे प्रकल्प करताना लेखकांचाही सकारात्मक प्रतिसाद लागतो. त्याच काळात अण्णांनी त्यांच्या पूर्वप्रकाशित ठांथात विखुरलेले लेख व त्या अनुषंगाने पुढे लिहिलेल्या नवीन लेखांची पुनर्मांडणी करून तीन नवी हस्तलिखिते तयार केली होती. ती तिन्ही एकाचवेळी प्रकाशित होणेही आवश्यक होते. कारण त्यात एक अंत:सूत्र होते. ते तीन ग्रंथ म्हणजे, 'लोकदेवतांचे विश्व', 'लोकसंस्कृतीचे उपासक' आणि 'भारतीय रंगभूमीच्या शोधात'. हे एकाच दिवशी म्हणजे १५ जानेवारी १९९६ रोजी आळंदी येथील साहित्य-संमेलनाच्या निमित्ताने आम्ही प्रकाशित केले. ह्या तीनही पुस्तकांत महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास तर दडलेला आहेच, शिवाय अण्णांचे लोकसंस्कृतीविषयक संशोधन-चिंतनही आपणांस दिसते. ही तीन पुस्तके अभ्यासकांनी एकाचवेळी वाचावीत हाही उद्देश होता.

प्रकाशनसंस्थेच्या प्रारंभीच एकाच वेळी तीन संशोधन ग्रंथ प्रकाशित करण्याचे माझे धाडस अनेकांना आश्चर्यकारक वाटले. परंतु पुढे मी ह्याच गोष्टी पुन:पुन्हा करत राहिल्यामुळे आता तीच माझी ओळख झाली.

ह्या तीन पुस्तकांचाच पुढचा भाग म्हणजे 'संत, लोक, अभिजन' हे पुस्तक मार्च १९९८ मध्ये प्रकाशित केले. या ग्रंथाच्या उपशीर्षकातच म्हटले आहे, 'ज्ञानदेवादी संतांनी घडविलेले मराठी लोकसंस्कृतीचे उन्नयन आणि अभिजन संस्कृतीचे शुद्धीकरण'.

ह्यात अभिजन संस्कृतीचे शुद्धीकरण ही गोष्ट महत्त्वाची आहे. बहुजनांच्या संस्कृतीला सन्मान, गौरव देण्यामागचा अण्णांचा हेतू व त्या अनुषंगाने त्यांचे संशोधन, चिंतन आयुष्यभर विस्तारतच राहिले.

अशा पद्धतीने अण्णांनी लिहिलेली असंकलित टिपणे, नवे लेख, काही अगोदरच्या पुस्तकांतले समाविष्ट लेख यांतूनच 'लोकसाहित्य : शोध आणि समीक्षा', 'श्रीआनंदनायकी', 'आज्ञापत्र', 'मुसलमान मराठी संतकवी' अशी मालिकाच पुढे आली. 'श्रीआनंदनायकी'च्या प्रस्तावनेतच अण्णांनी माझ्या योजनेचे व ग्रंथप्रकाशनसाठीच्या आग्रही भूमिकेची पावती दिली आहे.

देवताविज्ञान हाही अण्णांच्या संशोधनाचाच विषय. मराठीत ही ज्ञानशाखा अण्णांनी अधिक प्रतिष्ठित केली. देवताविज्ञानविषयक 'लज्जागौरी' (१९७९) आणि 'श्रीविठ्ठल: एक महासमन्वय' (१९८४) ही पुस्तके मी प्रकाशन क्षेत्रात येण्यापूर्वीच प्रकाशित झाली होती. ती केवळ बहुचर्चित ठरली नव्हती तर ह्या पुस्तकांमुळे अण्णांना मोठे सन्मानही त्या काळात प्राप्त झाले. ह्या पुस्तकाच्या नव्या आवृत्त्या काढण्याची संधीही अण्णांनी मलाच दिली. ह्या पुस्तकांप्रमाणेच 'दक्षिणेचा लोकदेव श्रीखंडोबा', 'दत्तसंप्रदायाचा इतिहास', 'नाथसंप्रदायाचा इतिहास' ह्या पुनर्व्यवस्थापित पुस्तकांप्रमाणेच 'श्रीतुळजाभवानी' (२००७), 'करवीरनिवासिनी श्रीमहालक्ष्मी' (२००९), 'श्रीव्यंकटेश्वर आणि श्रीकालहस्तीश्वर' (२०११) ह्या संपूर्णत: नव्या ग्रंथांनी देवताविज्ञान ही शाखा अधिक समृद्ध होत गेली. अण्णांची प्रकृती ठीक नसतानाही त्यांच्या अफाट स्मरणशक्तीच्या आधारे व अरुणाताईच्या सहकार्याने 'श्रीपर्वताच्या छायेत', 'त्रिविधा' आणि 'श्रीनामदेव, जनी आणि नागरी' ही पुस्तके गेल्या वर्षी अण्णांच्या वाढदिवसाला प्रकाशित केली. म्हणजे एकाच वेळी अण्णांच्या तीन पुस्तकांचे प्रकाशन पद्मगंधाने दोन वेळा केले. हे करताना 'लोकसंस्कृतीचे प्रतिभदर्शन' व 'संस्कृतीची शोधयात्रा' हे अण्णांचे दोन गौरवग्रंथही प्रकाशित केले.

आता ह्या वर्षीही अण्णांच्या ८७व्या वाढदिवसाच्या निमित्ताने 'श्रीनरसिंहोपासना : उदय आणि विकास' ह्या नव्या ग्रंथांचे प्रकाशन होणार होते. 'लोकसंस्कृतीचे प्रतिभदर्शन' ह्या ग्रंथाची नवी आवृत्ती व 'दक्षिणेचा लोकदेव श्रीखंडोबा'ची नवी

**अण्णांवर लिहिणे इतके का सोपे आहे? त्यांच्या किती प्रतिमा समोर येतात. त्यातली कोणतीही एक प्रतिमा एका लेखात बसू शकत नाही. दोन मुख्य प्रतिमा - एक संशोधक व दुसरी त्यांचे व्यक्तित्व. त्यांच्या व्यक्तित्वातसुद्धा कितीतरी गोष्टी आहेत. एक गृहस्थी, एक सुहृदयी मित्र, एक रसिक माणूस, जीवनातील विविध गोष्टींबद्दल कुतूहल आणि रस असणारे! ही यादी आणखी वाढू शकते. गेली वीस-पंचवीस वर्षे त्यांच्या सहवासात राहिल्यानंतर अण्णांच्या अशा कितीतरी प्रतिमा डोळ्यांसमोर उभ्या राहतात. ह्या प्रतिमांना अनेकांनी वेगवेगळी रूपे दिली. कोणी ऋषितुल्य, कोणी व्रतस्थ, कोणी शोधयात्री, कोणी कवी, कोणी मनस्वी, कोणी फकिरी वा सन्यस्त वृत्तीचा आणि आणखी कोणी काही. ज्यांना ते जसे दिसले, भावले, अनुभवले तसे. ह्या सगळ्या गोष्टी इतक्या एकरूप आहेत की त्यातला एक पदर बाजूला काढून फक्त अण्णा दाखवणे अशक्य आहे...**



ढेरे दांपत्य वर्षा व अरुण या आपल्या लेकींसह

आवृत्ती असे तीन ग्रंथ प्रकाशित होणार होते. श्रीनरसिंहासाठी त्यांनी यापूर्वी काही लेख लिहिले होते, फार मोठा प्रवासही केला होता आणि त्याला अंतिम स्वरूप देण्यापूर्वीच अण्णांना मोठ्या शारीरिक मर्यादा आल्या. काही चमत्कार होऊन यातून अण्णा बाहेर येतील अशीही आशा होती. पण ते अशक्य दिसू लागल्यावर, श्रीनरसिंहावरचे त्यांचे उपलब्ध काम प्रकाशित करण्याचे अरुणाताईंनी आणि मी ठरविले परंतु...

* * *

एकवीस जुलैला अण्णांच्या वाढदिवशी दरवर्षी ग्रंथ प्रकाशित करण्याची परंपरा यावर्षी थांबली. 'दक्षिणेचा लोकदेव श्रीखंडोबा'ची नवी आवृत्ती घेऊन मी त्या दिवशी अण्णांच्या घरी गेलो. त्यांच्या फोटोसमोर प्रत ठेवली. पण भावनावेगाने तर मला शक्तिपातच झाल्यासारखे वाटले. तो दिवस म्हणजे गेली वीस वर्षे आमच्यासाठी उत्साह आणि नवनिर्मितीचा आनंद देणारा असायचा.

वीस वर्षांत संशोधनात्मक एकवीस पुस्तके प्रकाशित करण्यासाठी अण्णांनी दिलेले सहकार्य, प्रेम हे अद्वितीय आहे. वर दिलेली प्रकाशित पुस्तकांची माहिती म्हणजे यादी नव्हे तर एकूण कामाचा व्याप त्यातून स्पष्ट व्हावा हा हेतू आहे. प्रकल्पात रमणे हाच माझ्या आनंदाचा, निष्ठेचा, कार्यपद्धतीचा भाग आहे. अण्णांची पुस्तके प्रकाशित करत असतानाच डॉ. व. दि. कुलकर्णी यांचीसुद्धा पाच समीक्षात्मक पुस्तके एकाच दिवशी प्रकाशित केली. र.धों. कर्वे यांच्यावरील 'रधों.' हा ग्रंथाचा एकत्रित प्रकल्प, श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या कादंबऱ्या, 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण' (डॉ. गणेशदेवी यांच्या मार्गदर्शनातून) 'हाल सातवाहनाची गाथा सप्तशती' (पुनर्मुद्रण), 'सूफी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन', 'गालिबचे उर्दू काव्यविश्व : अर्थ आणि भाष्य' असे महाराष्ट्रातील अनेक मान्यवरांचे ग्रंथ मी प्रकाशित केले.

आर्थिक प्राप्तीचा विचार न करता, मनस्वीपणे, पूर्ण बौद्धिक क्षमता पणाला लावून दीर्घजीवी व आदर्श काम करण्याचा संस्कार हा अण्णांच्या सहवासातून घडला. आता प्रकल्प नसतील तर मीच बेचैन होतो.

असे संशोधन ग्रंथ प्रकाशित करताना खूप सावध राहावे लागते. टिपा, तळटिपा, संदर्भसूची, नामसूची यांबरोबरच त्या लेखकाने हे उभे करताना घालवलेली आयुष्याची वर्षे ह्या गोष्टी फार गांभीर्याने घ्याव्या लागतात. प्रकाशकाने तटस्थ वृत्तीने आपल्या सहकारी लोकांवर अवलंबून राहून ग्रंथ प्रकाशित करणे ही गोष्ट मला व्यक्तिशः मान्य नाहीच. मला केवळ आर्थिक गुंतवणूक कधीच महत्त्वाची वाटत आली नाही, मला त्या ग्रंथात लेखकाइतकीच आपलीही मानसिक गुंतवणूक असायला हवी असे वाटत आले. नव्हे, ती आपोआपच होत जाते. एका सर्जकाबरोबर माझा समांतर सर्जनप्रवास चालला तरच माझे विकसन होऊ शकेल. माझ्या ह्या स्वभावामुळेच अण्णांचा विश्वास मला प्राप्त करता

आला आणि ही प्रकल्पयात्रा बावीस वर्षे आनंदात पार पडली.

* * *

मराठीत पूर्वी जे ग्रंथ प्रकाशित झाले, त्यातील बहुतांश ग्रंथ हे फारसा नेटकेपणाने व देखण्या स्वरूपात प्रकाशित झालेले दिसत नव्हते. असे विषय रूक्ष असतात आणि म्हणून त्याला सुबक व आकर्षक स्वरूप द्यायला हवे असे फार कमी लोकांना वाटते. रसिकता ही फक्त ललित पुस्तकांसाठीच हवी का? संशोधन ही सुद्धा एक कला आहे आणि त्यासाठीही प्रतिभा लागते, ही गोष्ट लक्षात ठेवूनच आम्ही हे ग्रंथ प्रकाशित केले. अण्णांचे ग्रंथ प्रकाशित करताना सर्वच २१ पुस्तकांसाठी रविमुकुल यांनी दिलेला कलात्मक स्पर्श आणि वेळोवेळी त्यांच्याबरोबर झालेल्या चर्चाही माझ्यासाठी खूप महत्त्वाच्या आहेत. प्रारंभही त्यांनीच घडवून आणला होता. अण्णांचे संशोधनात्मक लेखन हेही लालित्यपूर्णच असते. रूक्षतेला तिथे जागाच नाही. अण्णांइतकी लोकप्रियता इतर फार कमी संशोधकांना मिळाली. याचे कारण अण्णांमध्ये एक सर्जनशील लेखकही दडला होता.

अण्णांच्या एकूण कामाचा व्याप, प्रकल्प हातात घेण्यापूर्वी त्यासंबंधी त्याचा केलेला अभ्यास, विविध ग्रंथांचा, संदर्भांचा घेतलेला शोध आणि नंतर क्षेत्रीय कार्य, हे मी जवळून पाहिले. त्यांची ही कार्यपद्धती आणि संशोधन क्षेत्र पाहिले तर अण्णा केवळ मराठी संस्कृतीचे, महाराष्ट्राचे संशोधक-अभ्यासक नाहीत तर ते संपूर्ण भारताचेच आहेत. त्यांचे ग्रंथ इतर भाषांत अनुवादित झाल्यावर महाराष्ट्राबाहेरील अभ्यासकांच्याही लक्षात येईल की अण्णांचे संशोधन हे भारताच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीवर आहे. त्यांनी जो प्रवास व क्षेत्रीय कार्य केले आहे, तो केवळ महाराष्ट्रातच नाही, तर कर्नाटक, आंध्र, केरळ, तमिळनाडू, गोवा ह्या दक्षिणी राज्यांप्रमाणेच उत्तरेतील ओदिशा, आसाम, बंगालसारख्या ईशान्यपट्टीप्रमाणेच उत्तरेकडील इतर राज्यांतही केलेला आहे. ह्या संपूर्ण भारतीय पार्श्वभूमीवर अण्णांची इतर भारतीय संशोधकांच्या कामाशी तुलना केल्यास अण्णांच्या कार्याचे मोठेपण आज ना उद्या लक्षात येईल.

अण्णांनी तर स्वत:च काही भारतीय पातळीवरचे हाती घेतलेले प्रकल्प, भारतीय पातळीवरचे संप्रदाय आणि त्यासंबंधीची साधनसामग्री पानशेतच्या पुरात वाहून गेली. अण्णांचा लेखन प्रवास हा ललित लेखनाकडून लोकसंस्कृती व संशोधनाकडे झाला. अण्णांनी कविता केल्या आहेत, नाटिका लिहिल्या आहेत, चरित्रेही लिहिली आहेत. पण नाथसंप्रदायाच्या अभ्यासाच्या निमित्ताने त्यांना सापडलेली संशोधनाची वाट हाच त्यांचा जीवनध्यास झाला. तरीही अण्णांचा प्राचीन-अर्वाचीन आणि अगदी समकालीन साहित्याचाही अभ्यास होता. अनेक साहित्यकार त्यांचे मित्र होते आणि अनेक साहित्यकारांनी अण्णांच्या कामाचे मोल जाणले होते. अण्णांविषयी त्यांनी आपला आदर वेळोवेळी व्यक्त केला आहे.

तर हा ललित लेखनापासून लोकसंस्कृतीकडे जाणारा प्रवास म्हणजे रवींद्रनाथ टागोरांच्या अगदी उलट. टागोर लोकसाहित्याकडून कवितेकडे व इतर साहित्यप्रकाराकडे वळले. टागोर एकेकाळी लोकगीते संकलित करत होते आणि प्रारंभीची त्यांची पुस्तके लोकसाहित्यावरचीच आहेत. महाराष्ट्राची किंवा दक्षिणेची लोकसंस्कृती आणि भारतातील इतर भागांतील लोकसंस्कृतीतील लोकजीवन, लोकपरंपरा फार वेगळ्या नाहीतच. अण्णांचा उल्लेख 'महाराष्ट्राचे थोर संशोधक' ऐवजी 'भारतीय लोकसंस्कृतीचे थोर संशोधक' असाच करायला हवा. अण्णांनी महाराष्ट्राच्या देव्हाऱ्याचेच दर्शन घडविले नाही, तर संपूर्ण भारताच्या देव्हाऱ्याचेच दर्शन घडविले आहे.

अण्णांकडे पीएच.डी., डी.लिट. अशा सर्व पदव्या असताना अण्णा विद्यापीठीय अभ्यासापासून किंवा कार्यपद्धतीपासून दूर राहिले. ते जाणीवपूर्वक राहिले असावेत. विद्यापीठीय अभ्यास आणि अभ्यासक्रमाच्या शिस्तीच्या बाहेर जाऊन, त्यांनी ही विद्यापीठीय चौकट मोडली किंवा नाकारली. यांमुळेच त्यांचे ग्रंथ विद्यापीठीय संशोधनांपेक्षा आगळेवेगळे ठरतात. आपली विद्यापीठे ही समाजाच्या मूळ स्वरूपांपासून, समाजाच्या गतिविधींपासून सतत दूर राहिली आहेत. संशोधनाचे स्वरूप व्यक्तिगत वा मार्गदर्शकाच्या प्रभावाखाली पारंपरिक व तत्त्वशोधनप्रधान असते, ती पद्धत समाजविन्मुख असते व सर्जनशील विचाराला लक्षात घेणारी नसते. आपसातील हितसंबंधातही ती अडकलेली असते. या सर्व गोष्टींमुळे रूढ विचारापेक्षा ते वेगळी मांडणी करत नाहीत.

अण्णांच्या संशोधनाला अशी कोणतीच चौकट किंवा मर्यादा नसल्यामुळे अण्णा समाजसन्मुख राहिले आणि रूढ समजुतींना धक्के देणारे अनेक निष्कर्ष त्यांनी मांडले. यासाठी त्यांना वाद-विवादांना सामोरे जावे लागले आणि मनस्तापासही. पण खरा संशोधक हा लोकानुनय थोडाच करत असतो? परंपरेच्या उथळ अर्थाबाहेर जाऊन काही नवे सांगणाऱ्याला भोगावे लागणारे भोग अण्णांनाही भोगावे लागले.

कोणत्याही संशोधकांची अथवा आपल्या लेखकाची बलस्थाने ओळखण्याचे, जाणून घेण्याचे कौशल्य प्रकाशकाकडे असायला हवे असे एकदा व्यंकटेश माडगूळकर म्हणाले होते, असे

**एकवीस जुलैला अण्णांच्या वाढदिवशी दरवर्षी ग्रंथ प्रकाशित करण्याची परंपरा यावर्षी थांबली. 'दक्षिणेचा लोकदेव श्रीखंडोबा'ची नवी आवृत्ती घेऊन मी त्या दिवशी अण्णांच्या घरी गेलो. त्यांच्या फोटोसमोर प्रत ठेवली. पण भावनावेगाने तर मला शक्तिपातच झाल्यासारखे वाटले. तो दिवस म्हणजे गेली वीस वर्षे आमच्यासाठी उत्साह आणि नवनिर्मितीचा आनंद देणारा असायचा...**



कौशल्य काही प्रमाणात मला प्राप्त झाले असेल तर तेही अण्णांमुळेच. इतक्या भेटी, गप्पा, चर्चा यांतून मला समजले, उमजले गेलेले अण्णा पूर्वग्रह, स्तुती आणि निंदा यांपासून सतत दूर राहिले. ज्या व्यक्तीबरोबर आपला तात्त्विक अथवा व्यक्तिगत वाद आहे, त्या व्यक्तीच्या ज्ञानसन्मुखतेचा, बौद्धिक क्षमतेचा ते आदरच करायचे. पण कधी उथळ, पूर्वग्रहदूषित किंवा आपल्या अभ्यासाचा अभास तयार करणाऱ्यांनाही त्यांनी दुखावले नाही. प्रत्युत्तर दिले नाही आणि तसा विषय निघालाच तर ते पटकन विषयांतर करायचे. अलीकडच्या काळात ज्ञानाच्या क्षेत्रात बळावलेल्या अधमनि अण्णांचा उत्साहच कोमेजत चालला होता.

जाहीर कार्यक्रमात, समारंभात वा सांस्कृतिक गलक्यात न मिसळणाऱ्या अण्णांना मात्र माणसांचे वेड होते. अण्णांचे स्नेही आणि चाहतावर्ग फार मोठा होता. त्यात परदेशी अभ्यासक होते आणि अशिक्षित माणसंही. पानशेतच्या पुरात घराला लागलेला ओलावा पुढे काही दिवसांनी किंवा घर बदलल्यानंतर गेला; परंतु त्यांच्या घराला असलेला माणुसकीचा ओलावा कायमच होता. आतिथ्य आणि माणसांच्या प्रेमासाठी ते घर कायम उत्सुक असायचे.

अण्णांना पुष्कळ पुरस्कार मिळाले. परंतु पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन करायला जावे, तर अण्णा संकोचलेलेच असायचे. पुरस्कार घ्यायला जा, भाषणं करा, तिथं वेळ घालवा हे त्यांना मान्य नव्हते. काही महत्त्वाच्या पुरस्कारांना लोकाग्रहास्तव किंवा कुटुंबीयांच्या आग्रहास्तव ते गेले; पण अपवादानेच. अनेक पुरस्कार ह्यासाठी त्यांनी नाकारले. अण्णा म्हणायचे, ''तुम्हाला

मला पुरस्कार द्यायचाय ना? तर घरीच या. आपण चहापाणी घेऊ आणि मी इथे, माझ्या घरी त्याचा स्वीकार करतो.''

ह्यामागे अण्णांची भूमिका स्पष्ट होती ती म्हणजे तुम्ही ज्या कामासाठी माझा गौरव करता, पुरस्कार देता, ते मूळ काम सोडून मी गौरव स्वीकारत, पुरस्कार स्वीकारत फिरत राहिलो तर कामाचा उद्देश बाजूलाच राहील. आजकाल माध्यमांमुळे प्रसिद्धीचे वाढलेले पेंढ पाहता, अण्णांची प्रसिद्धीविन्मुख वृत्ती ही अभावाने नव्हेच तर दुर्मीळ गोष्ट आहे. ह्यांमुळेच महाराष्ट्र शासनाचा पहिला 'ज्ञानोबा-तुकाराम पुरस्कार' अण्णांना मिळाला, तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख सकाळपासून सारखी चौकशी करत होते की 'अण्णा येत आहेत ना?' मुंबईला हा कार्यक्रम होता आणि अण्णा पुण्याहून निघाले आहेत, ते पुरस्कार घ्यायला येत आहेत हे कळल्यावर विलासरावांना हायसं वाटलं. तसं त्यांनी जाहीर बोलूनही दाखवलं. राजकारणी माणसं त्यांना घरी कधी भेटायला यायची. विशेषतः अभिनंदन वगैरे करण्यासाठी, तेव्हाही अण्णा फार संकोचलेले असायचे. ह्या लोकांबरोबर काय बोलणार, हा प्रश्न त्यांना पडे.

आठवणींचा लोंढाच आता वाहू लागला आहे आणि मला या लेखात कोठेतरी थांबले पाहिजे. अण्णा गेले त्याच्या आदल्या दिवशीच आम्ही भेटलो होतो. रात्री ८-८.३० वाजेपर्यंत मी त्यांच्याच घरी होतो आणि श्रीनरसिंहाच्या पुस्तकाची प्रुफे घेऊन गेलो होतो. त्यांना स्मरणशक्तीने धोका दिलेला नव्हता. त्या दिवशी काही शब्दांचे अर्थही त्यांनी अल्पशब्दात सांगितले. एकूण परिस्थिती आता गंभीर होत चालली आहे याची जाणीव झाली होती; पण काही दिवस तरी ते राहतील असे वाटत असतानाच...

* * *

सकाळीच वर्षाचा फोन आला. सगळे संपले होते. मी ऑफिसमध्ये बसतो तिथे माझ्यासमोरच अण्णांच्या पुस्तकांची रॅक उभी आहे. घरी माझ्या अभ्यासाच्या खोलीत आहेतच. तीच आता माझ्याशी बोलत राहतील. काही सांगत राहतील. त्यांची आठवण आलीच तर त्यांचे एखादे पुस्तक वाचत बसायचे आणि प्रत्यक्ष नाही; पण मनानेच ही मानसभक्ती, मानसपूजा करत राहायचे. कोणाच्या व्यक्तीच्या निधनाचा दीर्घकाळ शोक करणे योग्य नाही. अण्णांनी ठेवलेल्या ग्रंथरूपी ज्ञानात्मक खुणाच आता आपल्या मार्गदर्शक असतील, अण्णा आपल्यातच असल्याचा अनुभव देतील.

अण्णांना तसे दीर्घायुष्य मिळाले. त्याचा त्यांनी पूर्ण सदुपयोग केला. मृत्यू व त्यांची प्रकृती एकमेकांना अनेकवेळा चकवे देत गेली आहे. शरीरप्रकृतीने त्यांना कधीच साथ दिली नाही. पण त्यांच्या हातात असलेले ज्ञानात्मक प्रकल्प, त्यांची बुद्धिमत्ता, आपल्या कामावरची अविचल श्रद्धा पाहून मृत्यूसुद्धा थांबत आला. आपले कामही विसरला. ज्ञानाचा खेळ त्यालाही पाहायचा होता. हा खेळ संपला तेव्हा त्याला स्मरण झाले असावे आणि घेऊन गेला तो अण्णांना सोबत.

* * *

गेली पासष्ट वर्षे चालत आलेला हा ज्ञानयज्ञ थांबला. एका संघर्षमय आयुष्याचा शेवट झाला.

हे सगळे धाडस अण्णांनी एकट्याने पेलले. त्यांच्या पाठीशी कोणती व्यक्ती, संस्था, पक्ष काहीही नव्हते. वयाच्या पाचव्या वर्षीच आई-वडील गेल्याने आलेले पोरकेपण. पानशेतच्या पुरात वाहून गेलेले सर्वस्व. एकाच वेळी आर्थिक, शारीरिक आणि अर्धवट राहत असलेल्या प्रकल्पातून निर्माण होणारी अंतर्गत अस्वस्थता वा घुसमट ते सहन करत राहिले. त्यांनी कधी आपण हे सहन करत आहोत, आपणास नक्की उत्पन्न नाही, आपली प्रकृती ठीक नाही याचा जाहीर उच्चारही केला नाही. ते म्हणत, 'हे मी माझ्यासाठी, माझ्या अंतःप्रेरणेने स्वीकारलेले व्रत आहे. मग मी त्यासंबंधी इतरांना दोष का देऊ?'

अण्णांना वैकुंठात नेताना डॉ. निरगुडकरांनी अभंग गायला - 'शेवटचा दिस गोड व्हावा'. बारीच्या दिवशीच तुम्ही महाप्रस्थानासाठी निघाला. तुमच्यासोबत विद्वानांनी, लेखकांनी चार पावले पुढे टाकली तर तुम्ही लावलेल्या वृक्षाला फळे आली असे म्हणता येईल.

* * *

अण्णा, पोरकेपण घेऊन तुम्ही पुण्यात आलात; पण तुमच्या आश्रयाला हजारो ग्रंथ आले. नव्हे, तुम्हीच त्यांना घेऊन आलात, सांभाळले. हा ग्रंथसंग्रह आज पोरका झाला आहे. त्यातील प्रत्येक

**हा ललित लेखनापासून लोकसंस्कृतीकडे जाणारा प्रवास म्हणजे रवींद्रनाथ टागोरांच्या अगदी उलट.
टागोर लोकसाहित्याकडून कवितेकडे व इतर साहित्यप्रकाराकडे वळले.
टागोर एकेकाळी लोकगीते संकलित करत होते आणि प्रारंभीची त्यांची पुस्तके लोकसाहित्यावरचीच आहेत.
महाराष्ट्राची किंवा दक्षिणेची लोकसंस्कृती आणि भारतातील इतर भागांतील लोकसंस्कृतीतील लोकजीवन,
लोकपरंपरा फार वेगळ्या नाहीतच. अण्णांचा उल्लेख 'महाराष्ट्राचे थोर संशोधक' ऐवजी
'भारतीय लोकसंस्कृतीचे थोर संशोधक' असाच करायला हवा.
अण्णांनी महाराष्ट्राच्या देव्हाऱ्याचेच दर्शन घडविले नाही,
तर संपूर्ण भारताच्या देव्हाऱ्याचेच दर्शन घडविले आहे....**

पाना-पानाला तुमचा स्पर्श झाला आहे, म्हणूनच कोणते पुस्तक कोणत्या रॅकवर वा कोणत्या ठिकाणी आहे, ते कोणत्या साईजचे आहे आणि कव्हर कसे आहे, वगैरे तुम्ही तत्काळ सांगू शकायचा. धनगर आपली मेंढरं ओळखतो तसेच काहीसे. प्रत्येक ग्रंथाला, कागदाला, पोथीला, हस्तलिखिताला माहीत आहे, त्यांना तुम्ही कसे घरी आणले, त्यासाठी केवढी तोशिष घेतली. हे सगळे तुम्ही लिहायचे राहूनच गेले.

अण्णांवर आणि त्यांच्या कामावर अनेकांनी लेख ह्यापूर्वी लिहिले आहेत. कोणी त्यांचा उल्लेख ऋषितुल्य म्हणून तर कोणी व्रतस्थ म्हणून केला. दोन्ही बरोबर आहेत. ऋषी समाजापासून दूर राहतात; पण विचार समाजाचा करतात. तुम्ही लोकांपासून दूर राहिलात; पण आयुष्यभर विचार लोकजीवनाचा, लोकसंस्कृतीचाच करत आला, गुहेच्या खोल आत-आत बसून तप करणाऱ्या ऋषीप्रमाणे तुम्ही ज्ञानसाधना करत राहिलात ह्यामुळेच तुम्ही ऋषितुल्य नाहीत तर ऋषीच आहात.

आणि व्रतस्थदेखील. अविचल वृत्तीने तुम्ही ही ज्ञानसाधना आयुष्यभर केली. घेतलेले व्रत उतले नाही, मातले नाही, टाकले नाही. व्रतामुळे खूप काही मिळाले, तुमचे आणि आम्हा सर्वांचेच जीवन ज्ञानाच्या अंगाने समृद्ध झाले. एका अर्थाने साठा उत्तराची कहाणी सफळ संपूर्ण झाली.

**– अरुण जाखडे**


arunjakhade@padmagandha.com

टीप :

अण्णांचे सगळे काम एका लेखात मावणारे नाही. हा थोडा प्रयत्न आहे. अण्णांनी उभ्या केलेल्या एकूण प्रकल्पांची, संपूर्ण लेखांची व पुस्तकांची वाङ्मयसूची, अण्णांविषयी व त्यांच्या संशोधनाविषयी अनेकांनी लिहिलेल्या लेखांची सूची व लेख, त्यांना प्राप्त झालेले सन्मान, अण्णांची ग्रंथसंपदा जी शंभरपेक्षा अधिक आहे, ह्या सर्व गोष्टींची सूची 'लोकसंस्कृतीचे प्रतिभदर्शन' (पद्मगंधा प्रकाशन, २०००) ह्या पुस्तकात आहे. त्या पुस्तकाची लवकरच नवी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे. ह्यात अण्णांवर त्यांच्या अगोदरच्या पिढीतील, त्यांच्या समकालीन व पुढील पिढीतील जाणकारांनी लिहिलेले लेख आहेत. ती नावे इतकी भारदस्त आहेत, की अण्णा एका अर्थाने नशीबवानच म्हणायचे.

**॥ग्रंथाली॥**

## मी पाहिलेला म्यां - मारुती ज्योतिबा सावळकर




सावळकरांची प्राथमिक शिक्षक म्हणून पहिली नियुक्ती लमाण तांड्यावर झालेली. तांड्यातील लोकांना स्वतःलाच राहण्यासाठी घरे नाहीत तर दुसऱ्याला घर कोठून देणार? लेखक अंबाजोगाईसारख्या शहरात जन्मलेले व शिकलेले तांडा हा सावळकरांसाठी एक नवीन प्रकार होता. पण लेखक या गोष्टींना घाबरले नाहीत. अशावेळी सावळकर जनावरांच्या गोठ्यात राहिले. एका बाजूला बकऱ्या, तर एका बाजूला जनावरे, मध्येच लेखकाची सतरंजी अंथरलेली, डोक्यावर शेकारलेले छप्पर, सकाळी झोपेतून उठले की अंगाला बकऱ्याच्या लेंड्याव जनावराचे शेण चिकटलेले, कपड्याचा कुबट वास यायचा. पण लेखकाने या गोष्टीची कोठेही तक्रार केली नाही. परिस्थिती जुळवून घेण्याचा प्रयत्न सावळकरांनी केलेला आहे. प्रामाणिकपणा व सचोटी सोडली नाही. ''पाण्यात राहून माश्याशी वैर नको'' म्हणून त्यांनी तांड्यातील लोकांच्या सवयी नाईलाजास्तव अंगिकारल्या. त्या अंगिकारताना सावळकर कोठेही वाहवले नाहीत.

**मूल्य २०० रु.    सवलतीत १२० रु.**

## आरसपानी जगताना - डॉ. वीणा सानेकर




आजच्या आपल्या जगण्यात अनेक पातळीवरचे 'संवाद' हरवलेले आहेत. अनेक शब्दांचे स्पर्शार्थ हरवलेले आहेत, अशा स्पर्श-संवादांची गरज अधोरेखित करणारे डॉ. वीणा सानेकर यांचे हे लेखन आजच्या कौटुंबिक-सामाजिक संबंधाच्या बदलत्या पोतावर अचूक भाष्य करते...

ग्रीष्म ऋतूच्या कहराने कोरड्या पडलेल्या व भेगाळलेल्या जमिनीवर अचानक येणाऱ्या पावसाच्या चार थेंबांनी जी प्रसन्नता निर्माण होते तशीच प्रसन्नता निर्माण करण्याची क्षमता या संग्रहात आहे.

**– किशोर बेडकिहाळ**

**मूल्य १५० रु.  सवलतीत ९० रु.**

## डॉ. रा. चिं. ढेरे यांचे महान ग्रंथ



महाराष्ट्राच्या शैव विचारधारांवर श्रीपर्वताचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष पण अत्यंत गाढ परिणाम आहे. श्रीपर्वताच्या छायेत महाराष्ट्रातल्या धार्मिक-सांस्कृतिक इतिहासातले काही महत्वाचे दुवे या ग्रंथात नव्याने उलगडले आहेत आणि काही कूट रहस्यांवरही नवा प्रकाश टाकला आहे.

**श्रीपर्वताच्या छायेत**

किंमत ₹ ३१०



गाणपत्य, जैन आणि मुकुंदराज ह्या तीन परंपरातील ग्रंथकारांचा आणि ग्रंथकृतींचा मागोवा घेणारा ग्रंथ.
प्राचीन मराठी साहित्याच्या सामर्थ्याची, सौंदर्याची आणि भक्तिभावनेच्या अखंड सूत्राची जाणीव करून देणारा ग्रंथ.

**त्रिविधा**

प्राचीन मराठीच्या तीन साहित्यधारा

किंमत ₹ २००



मराठीतील नामदेव आणि नामदेव परिवार यांच्याविषयीच्या साहित्यात भर घालतानाच 'जनी'चे लौकिक व वाङ्मयीन चरित्र तर नागरीचे आत्मकथन.

**श्रीनामदेव जनी आणि नागरी**

किंमत ₹ १३०

१९ पुस्तकांची एकत्रित किंमत ₹ ५०३० सवलतीत ₹ ३७७०

सर्व पुस्तकांवर २०% सवलत

**श्रीतुळजाभवानी** — किंमत ₹ ६००

**करवीरनिवासिनी श्रीमहालक्ष्मी** — किंमत ₹ ४५०

**लज्जागौरी** — किंमत ₹ ३००

**श्रीवेंकटेश्वर आणि श्रीकालहस्तीश्वर** — किंमत ₹ ४००

**श्रीविठ्ठल : एक महासमन्वय** — किंमत ₹ ४००

**नाथ संप्रदायाचा इतिहास** — किंमत ₹ २८०

**दत्त संप्रदायाचा इतिहास** — किंमत ₹ २६०

**दक्षिणेचा लोकदेव श्रीखंडोबा** — किंमत ₹ २२०

**लोकदैवतांचे विश्व** — किंमत ₹ २३०

**संत, लोक आणि अभिजन** — किंमत ₹ २५०

**भारतीय रंगभूमीच्या शोधात** — किंमत ₹ २५०

**मुसलमान मराठी संतकवी** — किंमत ₹ १७०


**लोकसंस्कृतीचे उपासक** — किंमत ₹ २१०

**लोकसाहित्य शोध आणि समीक्षा** — किंमत ₹ १७०

**आज्ञापत्र** — किंमत ₹ १४०

**श्री आनंदनायकी** — किंमत ₹ ८०

**पद्मगंधा प्रकाशन**
१९६६, तारा-भुवन, माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे-४११०३० www.padmagandha.com
फोन : (०२०) २४४५०२६० मो. : ७३५०८३९१७६ E-mail : p.padmagandha@gmail.com



**रा. चिं. ढेरे यांचे निधन झाल्यानंतर त्यांच्यावर अर्थातच अनेक लेख आले. या सर्वच लेखांत त्यांचा उल्लेख 'संशोधक' असा होता. भली मोठी ग्रंथसंपदा त्यांनी निर्माण केली. हे सर्व ग्रंथ वाचणे हे सोपे काम नव्हे, कारण विविध संदर्भांनी ते भरलेले आहेत. त्यामुळे केवळ काही पुस्तकांतून ढेरे यांची शैली आणि कामाची पद्धत याबद्दल काही अनुमान काढता येते का, याचा प्रयत्न मला या लेखात करायचा आहे.**

# संशोधकांचा दीपस्तंभ

**शशिकांत सावंत**

**सं**शोधक रा.चिं. ढेरे यांनी आपले आयुष्य संत साहित्य, लोकरीती जनमानसांत रुजलेल्या कथा, दंतकथा, पुराणे, वेदउपनिषदे आणि लोकदैवते यांच्या अभ्यासाला वाहून घेतले होते. महाराष्ट्रातील अनेक विद्वान गावगन्ना भाषणे देत फिरतात. पण पुस्तके लिहित नाहीत. रा.चिं. ढेरे मात्र याला अपवाद होते. गावोगावी हुडकून पडलेली दफ्तरे शोधावीत, पोथ्या मिळवाव्यात, कोणी पोथी न दिल्यास त्यातील मजकुराची दुसरी प्रत हाताने लिहून सिद्ध करावी, बर हे सारे स्वखर्चाने करावे ही कामाची परंपरा राजवाड्यांपासून य.दि. फडक्यांपर्यंत चालत आलेली आहे. या परंपरेतील रा.चिं. ढेरे कदाचित शेवटचे संशोधक असावे; 'लास्ट रोमन' म्हणावे तसे.

आपल्या संशोधनप्रेरणेबद्दल ते सांगत, 'पूर्वसुरींचे ज्ञानसंचित अभ्यासक्रमानुसार सुबोध करून सांगणे, किंवा सर्वसाधारण वाचकांच्या जिज्ञासेची तृप्ती करणे हा त्यांचा उद्देश असतो. शिक्षकांच्या व्यवसायाचीच ती अट असते. जे आत दाटले-साठले आहे, ते अनावरणपणे अक्षरात ओसंडते आहे, असा तो अनुभव नसतो. माहिती मिळवणे अन विशिष्ट शिस्तीने ती मांडणे-असा तो तांत्रिक व्यवहार असतो. व्यापक समाजशिक्षणासाठी तो आवश्यक असतो, उपकारक असतो. सुबुद्ध समाजाच्या घडणीत या व्यवहाराचे स्थान महत्त्वाचे असते, हे कोणीही नाकारणार नाही. शहाणे करून सोडावे सकळ जन' ही या प्रबोधक लेखनामागची प्रेरणा असते. समाजाची ती गरज असल्यामुळे अशा लेखनातून व्यवहारसाधनही सहज घडत राहते.'

लोकमानसात रुजलेल्या देवदेवता हा विषय त्यांनी का

निवडला याचे कारण कदाचित बालपणीच्या अनुभवांत असावे. निसर्गाचे चक्र लहान खेड्यांत अनुभवत असतानाच त्यांना चेडोबा, भिक्रोजीबुवा, भैरोबा ह्या ग्रामदेवतांविषयी कुतुहल वाटू लागले. त्यातून एकेका देवतेविषयी माहिती जमवताना ते किती कष्ट घेत असतील याची कल्पना 'लोकदैवतांचे विश्व'सारख्या पुस्तकातील पहिल्याच लेखातून येऊ शकते. या प्रकरणात ते गणेशपुराण आणि मुद्गल पुरण यांच्या प्रकाशनाची काय स्थिती आहे ते सांगतात. तीन-चारशे वर्षातील गणेशभक्तांची नावे देतात गणपतीविषयक उपलब्ध पोथ्या कोणत्या ते सांगतात आणि महाराष्ट्रातील गणेशविषयक ठिकाणे कोणती हेही सांगतात. पुढेपुढे वाचत जाऊ तसे अगदी गणपतीला विघ्नविनाशक म्हणून नमन करण्याची पद्धत का पडली असावी हे जैन ग्रंथकार हरीभाद्र यांची साक्ष काढून स्पष्टीकरण देतात.

अलक्ष्मी किंवा ज्येष्ठा हिच्यावर या ग्रंथात एक स्वतंत्र प्रकरण आहे आधाराचे श्लोक निवडून त्यातून प्रतित होणारे मुद्दे एकामागून एक मांडायचे आणि त्या आधारे त्या दैवतांचे एक प्रोफाईल तयार करायचे ही त्यांची पद्धत आहे. याच प्रकारे ते स्कंद आणि गणेश याचे नाते कोणते? मूषक या प्रतिकाचा नेमका अर्थ काय? याच शोध घेतात. प्रोफाईल म्हणण्याचे कारण अशी माहिती कधी अंतिम असू शकत नाही, तर ती सत्याच्या जवळ जायची. एकातून दुसरे दुसऱ्यातून तिसरे असे संदर्भ शोधताना त्यांची लेखणी कशी प्रवास करते हे पाहण्यासारखे आहे. गणेशपुराणातील एका गंधर्वाला मिळालेला 'तू चोरासारखा राहणारा मूषक होशील' हा संदर्भ देतदेत ते चोरीच्या कामालाही, परराष्ट्रात जाऊन ते करणे याला कसा सन्मान होता हे सांगत ते शुक्रनीतीसारमधील, चोरांनी आणलेले धन एकषष्ठमांश राजाला देऊन बाकीचे काढून घ्यावे, या संदर्भापर्यंत येतात. अर्थातच या त्यांच्या शैलीने वाचक साम्तुध होतो आणि भारतीय संस्कृतीच्या वेगवेगळ्या टप्प्यावरून सहज फिरून येतो यात शंका नाही.


ते एके ठिकाणी सांगतात, 'महाराष्ट्रात नांदणाऱ्या मानवसमूहाची लोकसंस्कृती केवळ मराठी लोकसाहित्याच्या द्वारा सामग्र्याने अभ्यासता येणार नाही तिची पाळेमुळे सुदूर भूतकाळापर्यंत पसरलेली आहेत आणि त्याचा विस्तार समजून घेण्यासाठी मराठीपूर्व वाङ्मयाचा आश्रय घेण्यावाचून गत्यंतर नाही.'

या साऱ्या लेखनाचा आधार अर्थातच तोंडी आणि लेखी साधनाचा वापर हा आहे. पण मराठी आणि आजूबाजूच्या प्रदेशातील भाषा आणि आख्यायिका यांचा वापर करून ढेरे अनेक कोडी भाषिक आधारातून सोडवतात. उदाहरणार्थ कुमारधारा हा शब्द कसा निर्माण झाला? वियान राज हा शब्द कसा आला? हे सांगताना वियवान हा शब्द तमिळ असून त्याचा अर्थ टोळीचा नायक असा आहे हे त्यांचे म्हणणे. हे वाचताना अर्थातच अनेक दक्षिणी भाषा किंवा कोश वापरून ते अर्थ निर्णय न, करायचा प्रयत्न करतात, हे दिसते. यामुळे त्यांच्या अनेक ठिकाणच्या प्रतिपादनाला इतर संदर्भ दिलेले आढळतात, जे केवळ पुस्तकातलेच नाहीत तर समाजात रुजलेले आहेत. महाराष्ट्राचे लोकदैवत खंडोबा हे स्कंद आहेत. का? तर जुन्या काळी स्कंदाचा उत्सव ज्या दिवशी यायचा, त्या दिवसाला- मार्गशीर्ष शुक्ल षष्ठीला-स्कंदषष्ठी म्हणतात त्याच दिवशी खंडोबाचा उत्सव होतो. शिवाने मनी आणि माल या दोन दैत्यांचा संहार करण्यासाठी अवतार धारण केला तोच मल्लारी आहे अशी कथा मल्लारिकामहात्म्य ग्रंथात आहे हीही माहिती पुढे येते. त्याचे सैन्य सात कोट होते आणि कन्नडीत सात म्हणजे येळ.

'नाथ संप्रदायाचा इतिहास' श्री तुळजाभवानी 'लज्जागौरी', 'श्री विठ्ठल एक महासमन्वय'... इ. पुस्तके त्यांनी लिहिली अर्थातच ही यादी खूप मोठी आहे. ही पुस्तके वाचताना पानोपानी थक्क व्हायला होते. याच कारण ढेरे एखादा प्रश्न घेतात आणि स्वतःच त्याचं उत्तर शोधतात. यामुळे त्यांच्या लेखनातून केवळ माहितीच मिळत नाही, तर वाचक विचारप्रवृत्त होतो. उदा. 'पांडवप्रताप'सारखी पोथी घरात का वाचली जात नाही? इनाम गावात सापडलेल्या मूर्ती अनैसर्गिक भासतील अशा सौष्ठवाच्या का आहेत? गणेशमूर्तीची पूजा नेमकी कधी सुरू झाली? अशा प्रश्नापासून ते 'काय देह् घालू कर्वती कर्मरी, टाकू या भीतरी अग्निमाजी' यामधील 'कर्मरी'चा अर्थ काय? असे विविध प्रश्न ते विचारतात आणि स्वतःच उत्तर देतात. कर्मरीचा अर्थ जोग महाराजांनी 'एक प्रकारचे शस्त्र' असा दिला आहे. विठ्ठल प्राप्तीसाठी अंगावर करवत चालवून घेऊ का असे विचारणारा तुकाराम कर्मरी म्हणजे दुसर शस्त्र चालवू का? असे म्हणणार नाही असे सांगून कर्मरीचा संबंध म्हणजे आंध्रप्रदेशामध्ये शैल येथे कनुमारी नावाचे स्थान आहे त्याच्याशी असल्याचे अनुमान ढेरे काढतात. तिथून उडी घेऊन जीवनाचा अंत करण्याची प्रथा आहे. त्या कनुमारी विधीचाच कर्मरी झाला असे ते सांगतात. संस्कृत आणि दक्षिण भाषा येत असल्यामुळे त्यांच्या संशोधनाला अनेक आयाम प्राप्त झाले. उदा. 'कर्मरी' हा शब्द कनुमारीमुळे झाला आहे. हे दक्षिणी भाषेच्या सानिध्यामुळेच त्यांनी सिद्ध केले. पांडवप्रताप का वाचले जात नाही असे सांगताना ते म्हणतात, 'असे ग्रंथ पारायणात पुन्हा वास्तवरूप घेतात अशी श्रद्धा असते.'

ढेरे यांचे आणखी एक वैशिष्ट्य होते ते म्हणजे त्यांची दृष्टी चौफेर होती. इंग्रजी साहित्य त्यांना वावगे वाटले नाही. त्यामुळे युरोपियन आणि पाश्चात्य संशोधकांच्या- दंतकथा, पुराणे आणि इतर सर्व पौर्वात्य गोष्टींवरती केलेल्या - संशोधनाचा त्यांनी आधार तर घेतलाच, पण खुल्या दिलाने त्यांचे शब्द कोट केले किवा डॉ. सांकलियांसारखा पुरातनवेत्ता देवदेवतांच्या मूर्तीबद्दल जे काही म्हणतो, ते त्यांनी सांकलीयांच्याच शब्दांत दिले. खरंतर असं दुसऱ्याला देणे. हा एक उदारपणाचा भाग आहे. तो ढेरे यांच्या व्यक्तिमत्त्वात पूर्णपणे बसत होता.

'लहानपणी आईवडील वारले, दारिद्र्य अनुभवले हा सर्व कालक्रम ढेरे यांना निराश करून गेला नाही.' त्यांच्या आत्मचरित्रपर लेखात ते म्हणतात, '१९३५च्या एप्रिलच्या मध्यात, आई-वडिलांच्या मृत्यूनंतर मी वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षी आजोळी राहायला गेलो, तेव्हापासून १९४३च्या अखेरीपर्यंत जेमतेम आठ-नऊ वर्षाचा काळ मी आजोळच्या खेड्यात काढला,



परंतु त्या अल्पकाळात माझ्या कोवळ्या मनावर त्या वातावरणाचे जे अमिट संस्कार घडले, त्या संस्कारांच्याच अभ्यासात मी रमत राहिलो. त्या संस्कारांचे मर्म शोधीत राहिलो. नव्या जीवनदृष्टीशी त्या संस्काराचे काही नातेगोते जुळते आहे का, याचा शोध घेत राहिलो. त्या कालखंडातल्या संस्कारांपासून मी मनाने दूर जाऊ शकलो नाही. तेच संस्कार मला पुन्हापुन्हा हात उंचावून पालवीत राहतात आणि मी पुन्हापुन्हा त्यांच्या सहवासात राहून त्यांचे अंतरंग शोधण्यात रंगून जातो' असे ते सांगतात. तमाश्यासारख्या खेळाचा बालपणीच आस्वाद घेतल्याने एके ठिकाणी ते असेही म्हणतात की, 'आमच्याकडे बामणाघराचे लीवने नव्हते, पण महाराघाराचे गाणे होते.'

त्यांच्या अफाट संशोधनातून अरुणा ढेरेंसारखी त्यांची मुलगी व्यासंग आणि संशोधनाकडे वळली आणि तिने जवळपास वडिलांचा वारसा चालवावा अशा पद्धतीने संशोधन केले. अनेक संत कवियत्री, अनेक देवदेवता, अनेक पारंपरिक कथाकहाण्या, यावर त्यानी लेखन केले. त्याही व्यासंगी संशोधक म्हणून प्रसिद्ध आहेत. चिनी म्हणायचे, तुम्ही एक झाड लावलात म्हणजेच १०० वर्षांत पुढच्या पिढ्यांना त्याच फळ मिळतं. रा. चिं. ढेरे हे असे वृक्ष लावणारे संशोधक होते. त्यांच्या संशोधनाच्या सावलीत अनेक पिढ्या सुखाने काम करू शकतील.

आपल्या हयातीतच ढेरे यांनी कितीतरी प्रचंड काम करून ठेवले. त्यामुळे वयाच्या ५० व्या वर्षी त्यांचा गौरवग्रंथ प्रसिद्ध झाला. नरहर कुरुंदकर यांच्यासारख्या अभ्यासकांवर त्यांनी भरभरून लिहिले. सततचे वाचन, सततचे व्यासंग यामुळे ते कृतार्थ जीवन जगले असे कोणीही म्हणेल. त्यांच्या संशोधनाचे विषय जरी लक्षात घेतले तरी त्यांच्या कामाचा अफाट अवाक लक्षात येतो. विठ्ठल असेल, लज्जागौरी असेल,. महाभारत रामायण असतील, मौखिक परंपरेतील कहाण्या असतील, गावोगावच्या ग्रामदेवता असतील, वासुदेव यासारखी परंपरेतील भटकी मंडळी असतील! एके ठिकाणी वासुदेवाबाद्दल लिहिताना ते म्हणतात की, वासुदेव हा त्याच्या नेहमीच्या मार्गाने नेहमी भिक्षा मागत जातो. त्याव्यतिरिक्त इतर गावात किंवा इतर ठिकाणी तो जातो, तेव्हा तो आपली मोरपिसाची टोपी घालत नाही. अशी छोटीमोठी निरीक्षणे, नोंदी त्यांच्या लेखनातून मिळत राहतात. त्यामुळे पावलोपावली आढळणारे त्यांचे लेखन रूक्ष बनलेले नाही. शब्द थोडासा धीट आहे, पण ते रंजक बनते. आपल्या गावाबद्दल आणि आजीबद्दल ते लिहितात, 'दुःख दारिद्र्याने गांजलेले आजीचे डोळे सहस्त्रधारांनी गळायचे पण तिचे जीवनचक्र फिरतच होते. ऋतूचक्राच्या सर्व आऱ्यावर जागती दृष्टी ठेवून फिरत होते. परंपरेने तिच्या तनामनावर जे जे उमटवले होते, ते ते सारे तिच्या नित्यक्रमातून सहज उमलून यायचे. अगदी अभावितपणाने, दीर्घकाळच्या सवयीने तिचा हा नित्यक्रम साऱ्या गावाच्या जीवनक्रमाशी बांधलेला होता आणि गावाच्या जीवनक्रम निसर्गक्रमाशी बांधलेला होता.'

खरेतर माझ्यासारखी अनेक मंडळी ही पाश्चात्य साहित्य




वाचून मोठी होतात आणि मग ती आपल्या देशी संचिताला पारखी होतात. अशा कितीतरी मंडळींना वाचनाकडे, आपल्या देशी संचिताचे परिचय करून देण्याकडे त्यांनी वळवले. खरंतर त्यांचे ग्रंथ हे काही जास्त खपणारे नव्हेत. पण तरीही पद्मगंधा प्रकाशनाच्या अरुण जाखडे या व्यक्तीने त्यांचे ग्रंथ सलग दोन तपे प्रकाशित केले. त्यांच्या ग्रंथांचा एकत्रित संचही काढला आणि त्यामुळे एक मोठा साचा वाचकांना उपलब्ध झाला. याही संचातील पुस्तके चाळताना थक्क व्हायला होते. अगदी रंगभूमी आणि नाटक यासारख्या विषयांवरही त्यांनी लिहिले आहे. त्यामुळेच दशावतारासारखी आपली परंपरा तिच्या नाटक क्षेत्रातील मंडळींना अभ्यासता येते. थोडक्यात त्यांनी जे काही संशोधन करून ठेवले आणि जी काही ग्रंथनिर्मिती केली आहे ती विविध क्षेत्रातील मंडळींना कायम प्रेरणा देणारी, मेंदूला उत्तेजन देणारी आणि आपल्या देशी संचिताचा व्यवस्थित परिचय करून देणारी आहे.

संतांनी त्यांच्या जीवितकार्याचे साधन म्हणून लोकसाहित्याचे अध्यात्मिकरण केले आहे. म्हणजेच संतसाहित्य हे अध्यात्मिकृत लोकसाहित्यच आहे, असे ते सांगत त्यातूनच 'संत लोक आणि अभिजन' हे पुस्तक त्यांनी लिहिले. यात अगदी गुरुगौरवासारख्या विषयापासून तुच्छतादर्शक नामे इथवर अनेक विषयांचा उहापोह आहे. नीट पाहिले तर असे दिसते की, त्यांची वेगवेगळ्या विषयांची निवड ही त्यांना पडणाऱ्या प्रश्नांतूनच होत असते. त्यातूनच ललितच्या कीर्तनाबद्दल विवेचन करताना लालीअताची कीर्तनपरंपरा ते उलगडून दाखवतात. ज्यात देव राजा, म्हणून त्याच्यापुढे कलावंत कला सदर करतात आणि राजा त्यांना बक्षीस देतो सिंहासनावर बसला आहे, अशी कल्पना केली जाते. ती परंपरा आजही चालू का राहिली आणि संतांच्या या देवसत्तेच्या संकल्पनेचा परिणाम खुद्द संतांवर काय झाला, असा प्रश्न त्यांना यातूनच पडतो.


कुंचे पताका झळकती/टाळ मृदुंग वाजती//' यासारख्या अभंगात ज्ञानेश्वरांनी संत हेच सुभात वीर आहे असे वर्णन केले आहे, असे दाखवून ते सांगतात, 'देव हा राजा आहे आणि भक्त हे त्याच्या संप्रदायातले वीर आहेत, अशी धारणा लोकदेवांच्या उपासनाक्षेत्रात पूर्वी रूढ होती आणि आजही आहे.' नाथांनी एका अभंगात आपल्या कथेचा ज्ञानकथा असा केलेला उल्लेख त्यांना विचार करायला लावतो आणि पुढे ते सांगतात की महानुभावांचे सुत्पाथ आदि ग्रंथ सोडले तर तत्त्वविवेचन करणारे मराठीतील प्राचीन ग्रंथ हे संस्कृतपेक्षा वेगळे आहेत कुठल्या दृष्टीने तर ते 'ज्ञानप्रबंध' नसून ज्ञानकथा आहेत. या एका वाक्यात पूर्ण संतपरंपरेच्या 'डिस्कोर्स'चे वैशिष्ट्य ते उलगडून दाखवतात.

मी काही या परंपरेचा अभ्यासक नाही, पण माझ्यासारख्या अनेकांना पानोपानी विचार करायला लावणारे आणि आपली परंपरा समजावून सांगणारे हे लेखन आहे. इंग्लिशमध्ये मोठ्या प्रमाणावर अगदी तत्त्वज्ञान, गणित, क्रिटीकल थिअरी अशा अनेक विषयांचे कोश उपलब्ध आहेत. या विषयामधील कुठलीही संज्ञा घेतली (उदा. प्रीयोरी ही तत्त्वज्ञानातील किंवा अनंत गणितातील) तर त्याचे संदर्भ आपल्याला मिळत जातात. रा. चिं. ढेरे यांचे ग्रंथ हे माझ्यासारख्या केवळ कुतूहल पातळीवर लोकसंस्कृती, परंपरा याकडे पाहणाऱ्यांसाठी याप्रकारचे कोषच आहेत आणि अर्थातच त्यात खोलवर उतरू पाहणाऱ्यांसाठी तर ते सोने आहे.

**– शशिकांत सावंत**
भ्रमणध्वनी : ९८२१७८५६१८
shashibooks@gmail.com



अवघ्या मराठीजनांचं पाक्षिक 'पुणे पोस्ट' । वार्षिक वर्गणी ५०० । एका वर्गणीवर एक दर्जेदार पुस्तक भेट । संपर्क : ७७२२००५०८१, ०२०-२४४६४६९६




# रंगयोगी

**'चिन्ह'च्या 'गायतोंडे' ग्रंथाच्या निमित्ताने**

**नरेंद्र दामले**

**गायतोंडेंवरच्या प्रेमानं, त्यांच्याबद्दलच्या आदरानं, या कामाचं मोल असल्यानं आणि संपादकांच्या सचोटीची खात्री असल्यानं अनेकांनी विनामोबदला काम केलं, आर्थिक सहकार्य केलं. त्यामुळेच विशेष कागदावर छापलेला हा २१६ पानी सुरेख मराठी ग्रंथ वाचकांना माफक किमतीत उपलब्ध होऊ शकला आहे...**

**ना**मवंत लेखक आणि वास्तुरचनाकार फिरोझ रानडे आणि चित्रकार गायतोंडे एकाच वेळी जे जे स्कूल ऑफ आर्टमध्ये शिकायला होते. गायतोंडेंच्या मृत्यूनंतर कधीतरी रानडेंना एका चित्रकाराकडे जेवायला बोलवलं होतं. बरोबर इतरही चित्रकार मंडळी होती. गप्पा मारता मारता रानडेंनी गायतोंडेंबद्दलच्या आठवणी सांगितल्या. तसे त्यातले दोन तरुण उठले आणि त्यांनी रानडेंना अगदी वाकून नमस्कार केला. त्यातला एक जण म्हणाला, गायतोंडेंची आणि आमची कधी प्रत्यक्ष भेट झाली नाही. तुमची-त्यांची एवढी मैत्री होती तर तुम्हालाच नमस्कार करून त्यांना नमस्कार केल्याचं पुण्य आम्ही मिळवतो आहोत.

कलाक्षेत्रात ज्यांच्याबद्दल इतका आदर आहे असे जगप्रसिद्ध चित्रकार म्हणजे वासुदेव संतू गायतोंडे. जगभरच्या कलाकारांना आणि कलारसिकांना गायतोंडेंबद्दल आदर आहे. २०१५ साली न्यूयॉर्कच्या प्रसिद्ध ग्युगेनहाईम म्युझियममध्ये त्यांचे सिंहावलोकन प्रदर्शन झाले. तिथे असे प्रदर्शन भरलेले ते एकमेव भारतीय चित्रकार! प्रसिद्ध चित्रकार प्रभाकर बरवेंची सुरुवातीची चित्रे पाहून गायतोंडे त्यांना एकदा 'तू पिक्चर मेकर आहेस' म्हणाले होते. नंतर खूप वर्षांनी एका 'शो'मधली बरव्यांची चित्रे पाहून गायतोंडे त्यांना म्हणाले, "Now you are a painter!" गायतोंडेंकडून कौतुकाची पावती मिळाली हे अभिमानाने सांगताना बरव्यांच्या चेहऱ्यावरचा आनंदच त्यांच्या मनात गायतोंडेंबद्दल असलेला आदर दाखवत होता. चित्रकार हुसेन आणि गायतोंडे यांच्यात तर घनिष्ट मैत्र होती. दोघांनाही एकमेकांच्या कलेविषयी नितांत आदर होता.

१९७० नंतर गायतोंडेंच्या चित्रांची सर्व विक्री पंडोल आर्ट गॅलरीने हाताळली. त्या आर्ट गॅलरीचे संस्थापक काली पंडोल यांच्याशी गायतोंडेंचा दृढ स्नेह होता. काली पंडोल यांच्या पश्चात त्यांच्या मुलाने, दादीबानेही, तो तसाच पुढे चालू ठेवला. दादीबांच्या स्वत:च्याच म्हणण्याप्रमाणे ते हुसेनच्या बाबतीत पार्शल आहेत. हुसेनची चित्रं त्यांना खूप आवडतात. पण हुसेननाही त्यांनी सांगितलं होतं, "I consider Gaitonde as India's greatest artist." त्यावर हुसेन पण उत्तरले की या तुझ्या विधानात नाकारण्यासारखं तर काही नाहीच, इतकं की त्यावर चर्चासुद्धा होऊ

शकत नाही. हुसेननं एकदा गायतोंडेंना सांगितलं, Gai, if I had your talent I would turn the world upside down". तर गायतोंडेंनी त्यावर सांगितलं, "I like the world as it is." दादीबा म्हणतात की त्यांना गायतोंडेंची पेंटिंग्ज कधीच कळली नाहीत. ती त्यांना दिसायला साधी वाटली तरी त्या वरवरच्या साधेपणाखाली काही तरी गहन, गुंतागुंतीचं आहे हे त्यांना जाणवत राहतं. पण काय ते समजत नाही.

प्रसिद्ध चित्रकार प्रभाकर कोलते जे जे मध्ये शिकत असताना त्यांनी शंकर पळशीकर सरांना विचारलं, सर, गायतोंडे यांची चित्रे समजत नाहीत. त्यावर सर पटकन म्हणाले, ''अरे, पण दिसतात ना? ती पहायचा प्रयत्न कर. डोळ्यांनी, दृष्टीनं, बुद्धीनं, मनानं पहायचा प्रयत्न कर. साऱ्या ज्ञानेंद्रियांनी ती अनुभवण्याचा प्रयत्न कर. समजतील.'' त्यांची चित्रे समजो किंवा न समजो, पण त्या चित्रांकडे पहात असताना काहीतरी अद्भुत पाहत असल्याचा अनुभव अनेकांना येत राहतो. दिल्लीचे वास्तुरचनाकार नरेंद्र डेंगळे एका गॅलरीत अनपेक्षितपणे गायतोंडेंच्या चित्रासमोर येऊन ठाकले आणि पाहता पाहता त्यात खेचले गेले. त्यामधील गहिऱ्या शांततेत क्षणभर न्हाऊन निघाले. गायतोंडेंची चित्रे पाहण्याबद्दल कोलते म्हणतात की, आपण पाहतोय त्या चित्रांना दृष्टी आहे अशी जाणीव जेव्हा पाहणाऱ्याच्या मनात जागी होते तेव्हा त्यानं बेलाशक समजावं की ती गायतोंडे यांची चित्रे आहेत. एअर इंडियाचे माजी आर्ट डायरेक्टर सच्चिदानंद दाभोळकर १९४९ पासून गायतोंडेंना ओळखत होते. ते म्हणतात, 'गायतोंडेंच्या चित्रांमागे त्यांची तपश्चर्या होती, ध्यानधारणा होती. तुमचं मन शांत असेल तर पेंटींग शांत होईल. गायतोंडेंची चित्रे आपल्याला वेल बॅलन्स्ड, क्वाएट आणि कलरफुल वाटतात.' त्याबद्दल गायतोंडे म्हणतात, जेव्हा मी दुःखी होतो, विमनस्क होतो तेव्हा मी फिरायला जात असे. अशा परिस्थितीत मी कधीच कॅनव्हासवर ब्रश टेकवला नाही. कॅनव्हासपुढे मी उभा राहतो तेव्हा मला वाटतं मी एका विस्मयपूर्ण अवस्थेत असतो.


गायतोंडेंचे तरुणपणीचे मित्र विश्वास यंदेंना 'श्वेत बीच में बिंदू शाम, वही कबीर का राम' हे वाचून गायतोंडेंची आठवण होते. गायतोंडे रिकाम्या कॅनव्हासकडे तासन् तास बघत बसत, तर कधी समुद्राकडे, कधी छताकडे, कधी शून्यात, कुठेही. डेंगळेंना गायतोंडे म्हणाले आहेत, 'तो रिकामा कॅनव्हास मला इतका आवडतो की, केव्हा केव्हा मी त्यास पुष्कळ वेळ न्याहाळत बसलेलो आहे.'

चित्रकार रामकुमार, दादीबा पंडोल आणि इतरही अनेक जणांनी गायतोंडेंबरोबर एकही शब्द न बोलता तासन् तास घालवल्याचे अनेक प्रसंग दिले आहेत. मुळात शांततेची आवड असल्याने गायतोंडे बोलायचे फार कमी, त्यातही स्वतःच्या चित्रांबद्दल वा स्वतःच्या कलेबद्दल तर अजूनच कमी. त्यांनी जवळच्या मानलेल्या माणसांशी ते कधी कधी बोलते होत असत, अर्थात त्यांचा मूड असेल तेव्हाच. त्यांच्या अगदी मोजक्या मुलाखती उपलब्ध आहेत. त्यापैकी प्रितीश नंदींना दिलेल्या



मुलाखतीत ते म्हणाले आहेत, 'मजजवळ बोलण्यासारखं काही नाही. विश्वास ठेवा. माझ्याजवळ खरंच बोलण्यासाठी फारच थोडं आहे. त्यामुळेच मला एकांत प्रिय आहे. मी एखाद्या व्यक्तीसोबत न बोलता तासन् तास एकत्र घालवू शकतो आणि एकही शब्द बोलावा असं वाटत नाही. आम्ही ती संयुक्त शांतता मजेनं एकित्रत अनुभवू शकतो.' मधली काही वर्ष त्यांनी चित्र काढणं थांबवलं होतं, त्याबद्दल नंदींना ते म्हणाले आहेत, 'मी चित्रेही रंगवत नाही आणि बोलतही नाही. त्या दोन गोष्टी वेगवेगळ्या आहेत. मी चित्रे रंगवत नाही, कारण मला ते करायची आता गरज वाटत नाही. पण मी बोलतही नाही, कारण मला शांतता प्रिय आहे. या दोन गोष्टी सारख्या नाहीत.' यावर नंदी त्यांना म्हणाले की, गायतोंडे खरोखरच सन्यासी झाले आहेत, तर गायतोंडे उत्तरले, मी संन्यासी झालो नाही. मी सन्यासी आहेच. चित्राची भाषा ऐकण्यासाठी चित्राकडे ध्यान लावलं पाहिजे असं त्यांचं मत होतं.

एखाद्या योग्याप्रमाणेच गायतोंडे वर्तमानात, 'is' मध्ये जगणारे होते. माझं रंगवून पूर्ण झालेलं आधीचं चित्र आणि मी रंगवत असलेलं नवं चित्र यापलिकडचं मला काही नको. माझ्या अवतीभवतीही नको. माझ्या अवकाशात त्याची अडगळ होते, असं ते म्हणत. नंतरच्या काळात ते वर्षाकाठी ६-७ चित्रंच काढत आणि एकदाच मुंबईला येऊन ती सर्व दादीबा पंडोलांच्या हाती सोपवत.




ठरला की मी त्याला स्पर्श करतो आणि तो (कॅनव्हासवर) वाहू /ओघळू देतो. आणि मग रंग आणि चित्रकार यांच्यात जी क्रिया घडते ती महत्त्वाची. त्यातूनच चित्र घडतं. रंगांबद्दल गायतोंडे एकदा म्हणाले होते, रंगांना स्वत:चं असं प्रकाश आणि दृक्संवेदनांमुळे शक्य झालेलं स्वतंत्र रूप असतं. लाल हा प्रथम लालच असतो. खरं तो लाल रंग कशाचंच प्रतीक नसतो. त्यास नवं रूप प्राप्त होतं ते तो पिवळ्या ठिपक्यापुढे कसा येतो त्या रचनासंघटनेमुळे. या रूपाला आणखी काही वेगळा अर्थ देणं चुकीचं ठरेल. फिगरेटिव्ह ते अमूर्त शैली, पुढे पॉल क्ली आणि नंतर झेनचा प्रभाव, पुढे पूर्णपणे स्वत:ची शैली हा त्यांचा प्रवास ठाम वैचारिक बैठकीवर आणि आत्मिक ताकदीवर झाला होता. याचमुळे त्यांना त्यांच्या चित्रांबद्दल आणि कलेबद्दल समाधान होतं. मी संपूर्ण चित्रकार आहे, असं ते म्हणाले आहेत. त्यांना कसली इच्छा, ईर्षा नव्हती. ते संपूर्ण वर्तमानातच जगायचे. ''आयुष्य जसजसं समोर येत गेलं तसतसा मी जगत गेलो,'' हे म्हणताना ते असं मात्र म्हणालेत, ''मी 'मी' आहे. हे 'मी'पण मी मिळवलं.''

वर उल्लेखलेले सगळे दाखले आणि अवतरणं ही 'गायतोंडे' ग्रंथामधूनच उद्धृत केलेली आहेत. अशी अफाट चित्रं काढणाऱ्या या चित्रकाराची प्रेरणा काय होती, धारणा काय होती, भावना कशा होत्या आणि एकंदरच त्यांचं व्यक्तिमत्त्व कसं होतं, इतकी उच्च कला काय मुशीतून बाहेर येते, कशी येते हे सगळं लोकांसमोर आणण्याच्या प्रबळ इच्छेने चित्रकार आणि संपादक सतीश नाईक 'चिन्ह'द्वारे वेळोवेळी छापत आले आहेत. त्याच्या पुढे जाऊन गायतोंडेंबद्दल सखोल आणि समग्र लोकांसमोर यायला हवे या उद्देशाने त्यांनी या ग्रंथाचा घाट घातला. इतका अस्सल चित्रकार आणि त्याच्या कार्याबद्दलचं जे काही मांडायचंय त्यातली प्रत्येक गोष्ट तशीच अस्सलच असायला हवी या निर्धाराने ते कामाला लागले. अनंत अडचणी आल्या तसेच अनेक मदतीचे हात पुढे आले. या ग्रंथाबद्दल आणि 'चिन्ह'बद्दल प्रेम, कौतुक, आस्था असणारे ठामपणे नाईकांच्या पाठीशी उभे राहिले. दिलेल्या वेळेपेक्षा ग्रंथ तयार व्हायला कितीतरी जास्त वेळ लागला तरी त्याला दिरंगाई न म्हणता सगळे जण शांतपणे वाट पाहत राहिले. या सगळ्या प्रवासाची मांडणी सतीश नाईकांनी 'गायतोंडे .. न संपणाऱ्या शोधाची कहाणी' या नावाने २४ पानी पुरवणी देऊन केली आहे. ही कहाणी मुख्य ग्रंथात देऊन ग्रंथाच्या मूळ हेतूला फाटे न फुटू देण्याइतके ते सतर्क आहेत. गायतोंडेंची नसलेली पण त्यांच्या नावाने खपवलेली चित्रे बाजारात आहेत हे माहीत असल्याने निवडीसाठी

त्यांच्यातल्या कराराप्रमाणे त्यांना वर्षभर सारख्या हप्त्यात पैसे पोचवले जात. पण त्या चित्रांचं पुढे काय होतं, ती कितीला विकली जातात किंवा विकलीच जात नाहीत, ती कोण घेतं याच्याशी त्यांना काहीही देणंघेणं नसायचं. 'बीबीसीवर माझ्या चित्रांचे आंतरराष्ट्रीय भाव कसे वाढले आहेत हे मी त्रयस्थपणे बघितलं,' असं ते म्हणाले आहेत. मी चित्रे काढतो कारण तू मला त्यांचे पैसे देतोस असं ते एकदा दादीबांना म्हणाले होते. या वाक्याचा अर्थ दादीबांना नीट उमगायला अनेक वर्षं जावी लागली. अपघातानंतर अनेक वर्षे गायतोंडे चित्रे काढत नव्हते. त्याबद्दल ते म्हणाले होते, ''मी इथं माझ्या डोक्यात रंगवतो आहे चित्र. माझी ताकद आता अपुरी आहे, मर्यादित आहे आणि ती मी आत्ता कॅनव्हासवर रंग लावण्यात खर्च करू इच्छित नाहीय. मात्र याचा अर्थ असा नाही की मी रंगवतच नाही.''

गायतोंडेंनी असं कधीच म्हटलं नाही की हे चित्र मी काढलं. ते नेहमी म्हणायचे, ''हे चित्र माझ्याकडून होऊन गेलं.'' गायतोंडे म्हणाले आहेत, मी रंग सोडतो. फक्त रंग, आणि, संगीताच्या भाषेत सांगायचं झालं तर मी रंग ऐकतो. एकदा त्यांनी सांगितलं होतं, माझ्या चित्राची सुरुवात नेहमी रंगानं होते. एकदा का माझा रंग




उपलब्ध असलेल्या १५० चित्रांपैकी ग्रंथात निवडलेली ६०-६५ चित्रे अत्यंत काळजी घेऊन, खातरजमा करून मगच निवडलेली आहेत. त्यासाठी प्रचंड वेळ आणि कष्ट खर्च पडले, तरी त्याची पर्वा न करता त्यांनी ते केलं हे महत्त्वाचं.

मुळात गायतोंडे स्वभावाने अबोल, त्यात त्यांनी जगाला चार हात दूर ठेवलेलं, शिवाय ते स्वत:च्या कलेबद्दल, तंत्राबद्दल फारसं न बोललेले. वेगवेगळ्या काळात त्यांनी जवळ येऊ दिलेली अगदी मोजकीच माणसं, त्यातली काही दिवंगत झालेली, काही वृद्ध झालेली. त्यामुळे गायतोंडेंचं चित्र उभं करण्यासाठी जी काही माहिती लागणार होती ती जमवण्यासाठी नाईक आणि सहकाऱ्यांना अक्षरश: समुद्रतळातून मोती वेचावे लागले, वाळू रगडून तेल काढावं लागलं आणि मग त्याच तैलरंगानं गायतोंडेंचं चित्र तयार करावं लागलं. गायतोंडेंच्या आत्यंतिक आत्ममग्नतेची आणि त्याचवेळी त्यांच्या परिपूर्णतेची वाढ तरुणपणी कशी झाली याचा अंदाज त्यांचे तरुणपणातले सहयोगी, सुहृद आणि विद्यार्थी यांच्या लेखांमधून आपल्याला होतो, पण त्यांनाही गायतोंडेंच्या बालपणाबद्दल, त्यांच्या कुटुंबीयांबद्दल अगदीच त्रोटक माहिती होती. गायतोंडे लहानपणापासून चित्र काढायचे आणि त्यांनी पुढे चित्रकलेकडे वळण्याला त्यांच्या वडिलांचा कट्टर विरोध होता. त्या भांडणामधूनच गायतोंडेंनी कुटुंबाला पूर्ण तोडून टाकलं होतं. त्यांना बहिणी होत्या हेसुद्धा बहुतेकांना माहित नव्हतं. शेवटी जंगजंग पछाडून सतीश नाईक यांनी गायतोंडेंच्या तिघी बहिणींपैकी हयात असलेल्या धाकट्या बहिणीचा (किशोरी दास) पत्ता मिळवला. लहानपणापासून गायतोंडेंना असलेला एकमेव चित्रकलेचा ध्यास, त्याविरोधात वडिलांचं टोकाचं कठोर वागणं, त्याविरोधात काही करण्याची, बोलण्याची आईची असमर्थता, त्याला प्रतिक्रिया म्हणून गायतोंडेंचं दुसऱ्या टोकाला जाऊन सगळ्याच कुटुंबियांना पूर्णपणे तोडून टाकणं, त्यामुळे आईला आणि लहान बहिणीला झालेल्या वेदना आणि किशोरींच्या मनात उरलेला कडवटपणा, मध्यंतरी प्रेमात पडलेले असताना तेवढ्या काळापुरता गायतोंडेंच्यात आलेला मृदुपणा, गायतोंडेंच्या स्वभावात मुळातच असलेला निग्रह अशा अनेक गोष्टींचा उलगडा त्या लेखातून होतो.

एका क्षणी अनपेक्षितपणे गायतोंडेंनी त्यांच्यावर फिल्म बनवण्याची परवानगी सुनील काळदातेंना दिली, पण काही कठीण अटींवर, तू म्हणशील असा उभा रहा, ते कर, तर ते तसलं मी काही करणार नाही. मी अॅक्टर नाही, चित्रकार आहे. माझ्या दिनचर्या व्यत्यय न येऊ देता करणार असशील तरच कर. नाहीतर मी तुला हाकलून देईन. काळदातेंनी ते आव्हान स्विकारलं. २६ मिनिटांच्या त्यांच्या मूकपटानं जगभरातल्या मानाच्या फेस्टिव्हल्समध्ये वाहवा तर मिळवलीच आणि सर्वात दुर्मिळ अशा स्टँडिंग ओव्हेशनचा मानही! ही फिल्म बनवण्याची स्वत: काळदातेंनी सांगितलेली कहाणी ग्रंथात आहे. या फिल्मची स्क्रिप्ट बनवण्यासाठी काळदातेंनी नितीन दादरावालांची मदत घेतली. आधी कवी असलेले दादरावाला नंतर चित्रकलेकडे वळण्यात गायतोंडेंच्या चित्रांचा हात होता. फिल्मिंगसाठी १२-१५ दिवस रोज सकाळी आणि संध्याकाळी काळदाते आणि दादरावाला गायतोंडेंकडे जात असत. त्या काळात झालेल्या बोलण्याचा, गप्पांचा सारांश दादरावालांनी दिला आहे, शिवाय ही फिल्म बनवण्याच्या आधीचे आणि नंतरचे गायतोंडेंसंबधातले काही अनुभवही सांगितले आहेत. अशी बारा जणांची गायतोंडेंसंबंधातली आत्मकथनं ग्रंथात आहेत. शिवाय फिरोझ रानडे, ज्ञानेश्वर नाडकर्णी आणि नरेंद्र डेंगळे यांचे गायतोंडेंवरचे आधी इतरत्र छापून आलेले लेख त्यांच्या उच्च दर्जामुळे तसेच्या तसे ग्रंथात घेतले आहेत. ग्रंथाला प्रभाकर कोलतेंची प्रस्तावना लाभली आहे. गायतोंडेंची ३०च्या वर छायाचित्रं ग्रंथात आहेत. १९४८ पासूनची ही छायाचित्रे मिळवताना नक्कीच खूप कष्ट पडले असणार. संपादकांनी वृत्तपत्रांत दिलेल्या आवाहनाला प्रतिसाद मिळून त्यातून एक लेख आणि काही छायाचित्रे मिळाल्याचं नाईक सांगतात. अत्यंत उच्च प्रतीचा कागद संपूर्ण ग्रंथासाठी वापरला आहे. अशा कागदावर गायतोंडेंच्या चित्रांच्या प्रिंट बघायला मिळणं हे आपलं भाग्यच! चित्रकलेवरच्या, आणि त्यातही मराठी पुस्तकासाठी इतका किमती कागद वापरणं हे निश्चितच धाडसाचं होतं, पण ग्रंथ गायतोंडेंवरचा आहे तर तो उच्चतम दर्जाचाच असायला हवा ही त्यामागची भावना होती. त्याबद्दल संपादकांचं वेगळं अभिनंदन. शिवाय गायतोंडेंच्या घेतलेल्या सहा मुलाखतींचे अंश, गायतोंडे आणि त्यांना आदर असलेले निसर्गदत्त महाराज यांच्यातला एका पुस्तकातून घेतलेला संवाद, 'नवकला आणि मी' हा गायतोंडेंनी स्वत: लिहिलेला लेख, आणि

चार पानी संदर्भसूची यांनी हा ग्रंथ परिपूर्ण झाला आहे.

गायतोंडेंवरच्या प्रेमानं, त्यांच्याबद्दलच्या आदरानं, या कामाचं मोल असल्यानं आणि संपादकांच्या सचोटीची खात्री असल्यानं अनेकांनी विनामोबदला काम केलं, आर्थिक सहकार्य केलं. त्यामुळेच विशेष कागदावर छापलेला हा २१६ पानी सुरेख मराठी ग्रंथ वाचकांना माफक किमतीत उपलब्ध होऊ शकला आहे.

मराठी साहित्यात, मराठी मनोविश्वात चित्रकलेला आणि एकंदरीतच दृश्यकलांना त्यांच्या योग्यतेचं मानाचं स्थान मिळावं यासाठी सतीश नाईक, सुहास-साधना बहुलकर, शर्मिला फडके व इतरही अनेक कलाकार जे कष्ट, प्रयत्न करत आहेत त्यांच्या या कार्याच्या वाटचालीत हा ग्रंथ म्हणजे एक मानाचं ठाम पाऊल आहे हे निश्चित. माझा या बाबतीतला वैयक्तिक अनुभव फार बोलका आहे. मी काही व्यावसायिक कलाकार नाही, किंवा गायतोंडेंसारखं 'माझी कला हेच माझं जीवन' असंही माझं नाही. पण कलांचा आस्वाद मी मनापासून घेतो. शास्त्रीय संगीतातल्या किंवा गाण्यातल्या शब्दांविनाच्या आलापीचा आस्वाद घेताना हे काय चाललंय, याला काय अर्थ आहे असं मनात येत नाही. ड्रमच्या ठेक्यावर नाचताना कधी शब्दार्थ नसण्याची अडचण होत नाही. पण पूर्वी चित्र बघताना मात्र हे काय काढलंय असं सगळ्यात आधी मनात येत असे. समोरचा आकार झाड आहे का गाडी आहे का माणूस आहे, माणूस असला तर बाई आहे की बुवा आहे, बाई असली तर स्त्री आहे की मुलगी आहे हे निरखण्यातच सगळी शक्ती जात असे. आता माझी कलादृष्टी काहीशी विकसित झाली आहे असं मला वाटतं. चित्र समजणं ते चित्र अनुभवणं या प्रवासात या सगळ्या चित्रकार-लेखकांची मला फार मदत झाली आहे. हा 'गायतोंडे' ग्रंथ वाचल्यानंतर, त्यात लिहीलं आहे ते डोळे मिटून चित्तात मुरवल्यानंतर आणि पुन्हा डोळे उघडून त्यातली गायतोंडेंची चित्र बघितल्यानंतर मी ठामपणे सांगतोय की माझा चित्रानुभव एका वेगळ्याच पातळीवर जात चालला आहे, माझी संवेदनशीलताही वाढत चाललेली आहे. आता यापुढे जेव्हा मी गायतोंडेंच्या चित्रासमोर उभा असेन तेव्हाचा रंगानुभव निश्चितच जास्त सशक्त असेल, चित्रानुभव अधिक स्वयंपूर्ण असेल. गायतोंडे, क्ली, व्हॅन गॉग, पिकासो, हुसेन, बरवे या प्रत्येकाच्या चित्रांनी मिळणारे अनुभव सगळे सुंदरच असतात, पण तरी वेगवेगळे असतात, हे जाणवण्याची संवेदनशीलता माझ्यात येऊ लागली.

एका मुलाखतीत गायतोंडे म्हणाले आहेत, ''सवर्सामान्य माणसाने स्वत: गंभीरपणे प्रयत्न केल्याशिवाय तो चित्रं समजू शकणार नाही. कलेला आणि संगीतालासुद्धा अत्यंत विशिष्ट पद्धतीची शिस्त लागते. म्हणूनच शेवटी कलारसिक हा आपल्या स्वत:च्या प्रयत्नांनीच कलेचं रसग्रहण करून कला समजू शकतो.''

हा ग्रंथ वाचून मला झाली तशी अनेक वाचकांना अशा प्रकारे चित्रं बघण्याची, अनुभवण्याची प्रेरणा मिळेल अशी मला खात्री आहे.


– नरेंद्र दामले

भ्रमणध्वनी : ९८२३० ३४२३०

narendra.damle@gmail.com



॥ग्रंथाली॥

'' 'माधवबाग' ही 'आरोग्यबाग' कशी झाली, कशी बहरत गेली, त्या प्रवासाचे प्रामाणिक व प्रत्ययकारी वर्णन वाचताना मला अननुभूत आनंद मिळत राहिला.''

– ज्येष्ठ हृदयरोगतज्ज्ञ डॉ. जगदीश हिरेमठ




डॉ. रोहित साने व किरण भिडे या तरूणांनी उभारलेल्या स्वास्थ्यउद्योगाच्या संघर्ष व यशाची सुमेध वडावाला रिसबुड लिखित कहाणी

**हृदयस्पर्शी माधवबाग**

डबल क्राऊन साईज • २३२ कृष्णधवल व ८ रंगीत पाने

जनआवृत्ती किंमत २५० रु. • सवलतीत १६० रु. टपालखर्च ३० रु.

हे पुस्तक माधवबागच्या सर्व सेंटरवर मिळेल

किंवा मिस्ड कॉल द्या ०२२३९९७१९१९

एका महिन्यात चवथी आवृत्ती प्रकाशित झालेले हृदयस्पर्शी पुस्तक

रोहन प्रकाशन

# निरोगी मन:स्वास्थ्यासाठी...


प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ **डॉ.विजया फडणीस** लिखित
निरोगी मानसिक आरोग्याचा कानमंत्र देणारी ४ पुस्तकं




**मुलांना घडवताना**
रु.१५० • १८० पानं




**सुखाने जगण्यासाठी**
रु.१५० • १६० पानं




**मनं उलगडताना**
रु.२०० • २०४ पानं




**गोष्टी मनाच्या**
रु.२०० • २०८ पानं




## मन:स्वास्थ्य
स्वत:चं आणि कुटुंबाचं

**४ भागांचा ७०० रुपयांचा**
**सप्रेम भेट संच**
**५५५ रुपयात**

विशेष सवलतीत

**विशेष**
**सवलत फक्त**
**३० ऑगस्टपर्यंत**

**रोहन प्रकाशन**
५ ब ६ धवलगिरी, शनिवार पेठ, पुणे ३०
✆ पुणे २४४८०६८६ मो. ८१४९१२०२१०
✆ मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२
E-mail : rohanprakashan@gmail.com

अधिक माहितीसाठी
आमच्या वेबसाईटला भेट द्या
**www.rohanprakashan.com**

# ब्रेक्सिट – एक खळबळजनक घटस्फोट

**डॉ. अनंत लाभसेटवार**



डेव्हिड कॅमेरॉन

**शेवटी हा घटस्फोट म्हणजे युरोपीयन समाजवादाचा पराभव असंही म्हणता येईल. ब्रिटनमध्ये व सर्व राष्ट्रसंघात ही राज्यप्रणाली प्रचलित असली तरी तिचं स्वरूप वेगळं आहे. ब्रिटिश समाजवाद भांडवलशाहीकडे झुकणारा तर युरोपमधला कामाऐवजी योजनांवर भर देणारा. त्याच्या अर्थकारणाचा वाढदर शून्यवत तर ब्रिटिशांचा २ टक्क्यांच्या वर. ब्रिटिशांना अशी आर्थिक अभियांत्रिकी करण्याची जरुरी भासली नाही. बाहेर पडल्यामुळे त्या देशाला आपलं वेगळेपण जगाला दाखवण्याची संधी मिळेल.**

**अ**मेरिकेत उन्हाळा सुरू होऊन अवघे तीन दिवस लोटले होते. तरीही तो बहुचर्चित व अतिप्रतिक्षित गुरुवार (जून २३, २०१६) एका दृष्टीनं एवढा तापला की त्या दिवशी जगातले सर्व शेअरबाजार वितळून गुंतवणूकदारांचं अतोनात नुकसान झालं. त्या काळ्या गुरुवारी ब्रिटिश मतदारांनी पंतप्रधान डेव्हिड कॅमॅरॉनच्या एका साध्या ठरावावर मतदान केलं. त्या लोकांनी युरोपी राष्ट्रसंघाचा घटक म्हणून राहावं की बाहेर पडावं हा प्रश्न वरकरणी सोपा असला तरी वास्तवात तो सर्व जगाला भिडणारा होता. म्हणून या मतदानावर सर्व जगाचं लक्ष वेधलं होतं. गेल्या ४३ वर्षांपासून ग्रेट ब्रिटन या राष्ट्रसंघाचा एक संस्थापक, उदार व जबाबदार घटक होता. एवढ्या वर्षांच्या संसारावर पाणी सोडून लग्नमोड करणं कुणाच्या ध्यानीमनी नव्हतं. म्हणून ब्रिटन असं उच्छृंखल पाऊल उचलणार नाही अशी जगाची अपेक्षा होती. सर्वेक्षणं अनिर्णित असली तरी 'नांदा सौख्यभरे'च्या बाजूला कितीतरी लोकांचा पाठिंबा होता.

खुद्द कॅमॅरॉन व मजूर पक्षाचे माजी पंतप्रधान टोनी ब्लेअर यांनी या ठरावाला आशीर्वाद दिला होता. सध्याचे विरोधी (मजूर) पक्षाचे मुख्य जेरमी कोरबीन देखील त्यांच्या बाजूला होते. याप्रमाणे

वधूच्या आईवडिलांचीच नव्हे तर वराच्या बाजूची संमती असताना घटस्फोट घेण्याचं कुणाला सुचेल? याशिवाय ब्रिटनमधले अनेक लेखक, तत्त्ववेत्ते, कलाकार, नेते, अभिनेते, वृत्तपत्र वगैरे जनमानसाचे शिल्पकार लग्नमोडीचा विचारही करू नका म्हणून प्रचार करीत होते. त्यामुळे मतदारांचं पारडं त्यांच्या बाजूला वळू लागलं. यात जगातल्या मुख्य बहुद्देशीय कंपन्यांच्या मुख्यांनी भर घातली. अमेरिकेच्या सर्वांत मोठ्या बँकेचे मुख्याधिकारी- जिमी डायमन, यांनी तर लंडनमध्येच ठाण मांडलं आणि 'नांदा सौख्यभरे'च्या बाजूनं भाषणं ठोकली. त्यांच्या चेस मॅनहॅटन बँकेच्या शाखा इंग्लंडमध्ये आहेत. खरं म्हणजे लंडन हे जागतिक वित्तकेंद्र समजल्या जात असल्यामुळे सर्व मोठ्या बँकांची उपस्थिती लंडनमध्ये सापडते. अनेक उद्योजकांनी लंडन टाइम्समध्ये आपल्या नावासह जाहिराती दिल्या होत्या.

अनिवासी भारतीयांनीही या लग्नाला हातभार लावला. ग्रेट ब्रिटनमध्ये १५ लाख भारतीय किंवा भारतीय वंशाचे लोक राहतात. त्यातले अधिकांश अमेरिकेप्रमाणे यशस्वी असले तरी कित्येक अतिश्रीमंत आहेत. त्यातल्या पोलाद बादशहा लक्ष्मी मित्तलपासून नारायण मूर्तींच्या जावयापर्यंत सर्व पंतप्रधानांच्या पाठीशी उभे राहिले.

एवढा तोफखाना त्यांच्या बाजूला असताना हा ठराव नामंजूर होईल असं म्हणणाऱ्याला वेड्याच्या दवाखान्यात भरावं लागलं असतं. शेवटच्या काही दिवसात राष्ट्रसंघात राहण्याच्या बाजूला अनपेक्षित पुष्टी मिळाली. एका विरुद्ध मताच्या माथेफिरूनं लोकप्रतिनिधीगृहाच्या प्रतिनिधीचा दिवसाढवळ्या खून केला. ती ४२ वर्षांची महिला दोन मुलांची माता होती. ती राष्ट्रसंघात राहण्यास अनुकूल होती. या क्रौर्यापोटी निर्माण झालेल्या करुणेच्या लाटेमुळे पंतप्रधानाची बाजू अजूनच सदृढ झाली. ही निश्चिती बघून लंडनमधल्या सट्टेवाल्यांनी (Bookies) हे विधेयक मंजूर होण्याची शक्यता ८० टक्क्यांपेक्षा जास्त आहे असं भाकित केलं आणि अनेकांनी त्या बाजूला पैसे लावले. अगोदरच साम्राज्यहीन झाल्यामुळे घायाळ होऊन आयाळ गेलेल्या सिंहासारखी स्थिती झाली असल्यामुळे राष्ट्रसंघातून बाहेर पडलं तर व्यापारात घट होऊन ग्रेट ब्रिटनचा बटू ब्रिटन होईल व गरिबीची लाट पसरेल अशा इशारा जगविख्यात उदारमतवादी इकॉनॉमिस्ट या लंडनस्थित वित्त साप्ताहिकानं दिला व मतदारांना सावध केलं.

एका देशानं दुसऱ्याच्या अंतर्गत राजकारणात ढवळाढवळ करू नये असा राजनैतिक शिष्टाचार आहे. ओबामांनी इराणबरोबर जो अणुकरार केला तो इस्राएलला आत्मघातकी म्हणून पंतप्रधान बेंजामिन नेटान्याहु यांनी त्याविरुद्ध अमेरिकेत प्रचार केला. त्यावेळी ओबामांनी त्या चिमुकल्या देशाला या शिष्टाचाराची आठवण करून दिली. पण ब्रिटनमध्ये मतदानाची वेळ उभी ठाकली असता अमेरिकेच्या अध्यक्षांना त्याचं विस्मरण पडलं. ब्रिटननं राष्ट्रसंघातच राहावं असा उपदेश कुणी न विचारताच त्यांनी केला. या मोफत सल्ल्याचा ब्रिटिश मतदारांना राग आला. ओबामांची ढवळाढवळ त्यांच्या पचनी पडली नाही. तरीही हिलरीनं तसंच मतप्रदर्शन करून त्या उपदेशाच्या ज्योतीचा वणवा केला. फक्त डोनाल्ड ट्रंपनी मतदारांशी सहमती व्यक्त करून घटस्फोट घ्या असा निर्वाळा दिला. त्यासाठी अनेकांनी त्यांची विटंबना केली.

शेवटी गुरुवारी मतदान सुरू झालं. त्यावेळी अमेरिकेत रात्र होती. तरीही काही दर्दींनी चित्रवाणीच्या संचासमोर बसून जागरण केलं. ब्रिटनमध्ये दिवस ढळल्यावर अमेरिकेत मध्यरात्र झालेली. त्यावेळी मतदारांचा कौल बदलला. हळूहळू पारडं घटस्फोट घेणाऱ्यांकडे वळू लागलं व वित्त बाजाराला एकदम भोवळ आली. न्यूयॉर्कचा शेअरबाजार बंद असला तरी फ्युचर्स मार्केटस् उघडे होते. त्यात होणाऱ्या व्यवहारानुसार शुक्रवार दिवस चांगला नसणार याची गुंतवणूकदारांना खात्री झाली आणि ते खरंच ठरलं. सकाळी शेअरबाजार उघडताच समभागांच्या किंमती पाण्यात फेकलेला दगड तळाशी ज्या गतीनं जातो त्यापेक्षा जास्त वेगानं घसरल्या. सगळीकडे रक्ताचा सडा पडला. कित्येकांचं काळीज घशात येऊन बसलं. अशा वेळी काही कमजोर मनाचे गुंतवणूकदार खिडकीतून उडी मारून काळजीमुक्त होतात. पण तशी वार्ता यावेळी वाचण्यात आली नाही. शुक्रवारी शेअरबाजार बंद झाला तेव्हा समभागधारकांचं एकूण २ ट्रिलियन डॉलरचं (१३६ लाख कोटी रु.) नुकसान झालं असं लगेच कुणीतरी गणित केलं. यापूर्वी लंडनच्या व युरोपमधील शेअरबाजारांनी अशीच कोलांटी कधीच खाल्ली नव्हती. मुंबईच्या सेन्सेक्स निर्देशांकात ६०० अंशाची घट झाली.

पण चलनाचं काय? पौंडानं केव्हाच जीव सोडला. गेल्या ३१ वर्षांत त्यानं डॉलरच्या तुलनेत एवढा नीचांक कधी गाठला नव्हता. आपला रुपया तर मूर्च्छितच पडला. एक डॉलर विकत घेण्यास कधी नव्हे ते ७१ रुपये लागत होते. दिवसाच्या शेवटी तो ६७ रुपयांवर विसावला. हे ज्या भारतीय कंपन्यांनी डॉलरमध्ये कर्ज काढले त्यांना व परदेशात शिक्षण घेण्यास जाऊ पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी चांगलं नव्हतं. तोच डॉलर विकत घेण्यास आता खिसाभर रुपये लागत होते. कंपन्यांना डॉलरमध्ये कर्जफेड करावी लागत असल्यामुळे ती डोईजड झाली तर नवल कसलं? या काळ्या ढगाला एकच सोनेरी किनार होती. सोन्याचे भाव एकदम वाढले. पण लग्न महागलं.

युरोपी राष्ट्रसंघात सध्या २८ देश आहेत. त्यातले ४-५ मोठे सोडले तर इतर एवढे बटू आहेत की त्यांची कुणी दखल घेत नाही. पण समग्र देशांची बाजारपेठ अमेरिकेपेक्षा मोठी (१९ लाख कोटी डॉलर) व लोकसंख्याही अधिक (५०० दशलक्ष किंवा ५० कोटी). भारत व चीन सोडले तर एवढी मोठी दुसरी बाजारपेठ जगात दुसरी नाही. म्हणून निर्यातप्रधान देशांना हा राष्ट्रसंघ महत्त्वाचा वाटतो. अर्थातच हा सर्व गट समाजवादी असून त्यांचं सरासरी उत्पन्न मागच्या वर्षी ३२,०८० डॉलर (२२ लाख रुपये) होतं. म्हणजे अमेरिकेपेक्षा बरंच कमी (५३,०८० डॉलर किंवा ३६ लाख रुपये). आर्थिक विषमता कमी करण्यास हे देश यशस्वी झाले आहेत. अमेरिका, चीन किंवा भारतापेक्षा राष्ट्रसंघातील देशात




**सध्या सिरियन युद्धग्रस्तांनी सगळा युरोप व्याप्त केला आहे. जर्मनीत १५ लाख विस्थापित आले. बहुतेकांचं गंतव्यस्थान ब्रिटन आहे. पण तो देश जलवेष्ठित असल्यामुळे हे लोंढे निसर्गानं थोपवले. तरीही ते ब्रिटिशांचं कवाड ठोठावत आहे. याची भितीही ब्रिटिशांना भेडसावत होती. आता ब्रिटन अलग झाल्यामुळे त्याला आपली सरहद्द नियंत्रित करण्याचे हक्क प्राप्त होतील.**

कितीतरी कमी आर्थिक तफावत आढळते. याचं कारण असं की त्यासाठी हे देश प्रमाणाबाहेर व्यय करून संरक्षण खात्यावर फार कमी खर्च करतात. कल्याणकारी योजनांवर अमाप खर्च केल्यामुळे आयतोबा वृत्ती तर वाढलीच पण काम करण्याची हौस व ऊर्जा घटली. संरक्षणासाठी हे देश नेटो (NATO) कडे व पर्यायानं अमेरिकेकडे बघतात. पण अमेरिकाच या ओझ्याखाली सध्या कण्हत, कथत व रडत आहे.

जेव्हा मतदान संपलं आणि धूळ निवळली तेव्हा या निवडणुकीत आश्चर्यजनक ७२ टक्के लोकांनी भाग घेतला असं आढळून आलं. देश जेवढा विकसित तेवढं मतदाराचं प्रमाण व योगदान कमी असं सर्वसाधारणपणे म्हणता येईल. भारतात मतदान केंद्रावर लोकांची मैलभर ओळ तर अमेरिकेत किंवा ग्रेट ब्रिटनमध्ये तिकडे अनेक तास चिटपाखरूही भिरकत नाही. म्हणजे या लोकशाही अल्पसंख्याकांधिष्ठित आहेत असंच म्हणावं लागेल. म्हणून यावेळी चांगलं मतदान झालं ही नवलाची गोष्ट होती. एकूण ५२ टक्के लोकांनी विभक्त होण्यासाठी मत दिलं तर ४८ टक्के मतदारांनी ही युती अखंड ठेवावी असं मतप्रदर्शन केलं. कुठलाही घटस्फोट म्हणजे एक प्रकारचं मरणच. त्यावेळी दुःखाचे पाट वाहतात. पण यावेळी बाहेर पडणाऱ्यांनी हर्षकल्लोळ केला तर हरलेल्यांनी आपले अश्रू बीयरच्या पेल्यात गाळले. बहुसंख्याकांची द्रोही व पलायनवादी वागणूक त्यांना मुळीच आवडली नाही. जिंकलेल्यातले अनेक पश्चात्तापदग्ध झाले. ४०-५० लाख लोकांनी पुनर्मत घेण्यात यावं या ठरावावर सह्या केल्या. आपल्या मतदानामुळे जे वित्तजलितकांड निर्माण झालं ते त्यांना बघवेना. पण उशिरा आलेलं हे शहाणपण आता काही कामाचं नव्हतं. पुनर्मतदान होण्याची शक्यता शून्यापेक्षा जास्त नव्हती. झालेलं नुकसान अपरिमित होतं.

इतिहासात ग्रेट ब्रिटन व्यापारावर जगत आला. त्यांची इस्ट इंडिया कंपनी त्यासाठी प्रसिद्ध होती. त्या देशाची ५० टक्के निर्यात राष्ट्रसंघातील उरलेल्या २७ देशांना होत असे. पण आता राष्ट्रसंघ या आयातीवर शुल्क लावणार असल्यामुळे ब्रिटनला दुसऱ्या बाजारपेठा शोधणं भाग पडेल. त्यासाठी तो भारताला लक्ष्य करेल यात शंका नाही. त्याला आपल्या पूर्वीच्या वसाहतीत सोनं पुन्हा सापडण्याची शक्यता.

अनेक बहुदेशीय कंपन्या ग्रेट ब्रिटन व लंडन राष्ट्रसंघात शिरण्याचं प्रवेशद्वार समजत. म्हणजे मुख्य ऑफिस व कारखाना त्या देशात उभारून त्या राष्ट्रसंघाची मागणी पुरवू शकत होते. याचं एक चांगलं उदाहरण म्हणजे आपली १०९ अब्ज डॉलर जागतिक खप असलेली टाटा कंपनी. ती मिठापासून आयटीपर्यंत (software) सर्व वस्तू व सेवा ब्रिटनमध्येच नव्हे तर तिथून युरोप खंडात विकते. ही बाजारपेठ आता महागणार म्हणून टाटाच्या समभागांना एका दिवसात ३० हजार कोटी रुपयांची ठोकर बसली. या बाबतीत टाटा एकटी नाही. भारत हा ब्रिटनमध्ये गुंतवणारा तिसऱ्या नंबरचा देश. आपल्या आठशेहून अधिक कंपन्या त्या देशात कार्यरत आहेत. त्या सर्वांना या विभक्तीकरणाची फळं भोगावी लागणार आहे याविषयी वाद नाही.

विभक्तीजन्य वित्त वादळामुळे उद्ध्वस्त झालेल्या देशात अनेक परिणाम एकदम दृष्य झाले तर काही दृष्यमान होण्यास बराच वेळ लागेल. पहिला बळी पडला तो पंतप्रधानांचा. निवडणुकीचं प्रेत चितेवर ठेवण्याअगोदरच डेव्हिड कॅमॅरॉननी राजीनामा देऊन त्यांच्या टोरी पक्षाला गोत्यात आणले. अतिउदारमतवादी व तीव्र समाजवादी जेरमी कोरबीन मजूर पक्षाच्या सोनिया गांधी. त्यांचं स्थान खूपच काटेरी झालं. त्यांच्या प्रति मंत्रालयातल्या (Shadow Cabinet) अनेक मंत्र्यांनी राजीनामे दिले.

या निवडणुकीत हार खाल्ल्यामुळे टोरी पक्षाला पुन्हा निवडणूक लढवून नवीन नेता निवडावा लागेल. असं झालं तर कोरबीनलाही तसंच करावं लागेल.

राष्ट्रसंघातून बाहेर पडणं घराबाहेर पडण्याएवढं सोपं नाही. पुढील २-३ वर्षे देशाला राष्ट्रसंघाशी व्यापाराविषयी व इतर गोष्टींविषयी वाटाघाटी कराव्या लागतील. त्यासाठी भरमसाठ खंडणी भरावी लागेल. पण सध्या ग्रेट ब्रिटन दर आठवड्याला ३५० दशलक्ष पौंड जी देणगी देते ती बंद होणार असल्यामुळे विघटन भुर्दंडाचं दुःख कमी होईल. दुसरी मोठी समस्या म्हणजे ब्रिटनचे १० टक्के लोक इतर देशात राहतात. राष्ट्रसंघात राहणाऱ्या अनिवासी ब्रिटिशांचं काय होईल हे सागणं कठीण. त्यांच्या नोकऱ्या जातील कारण त्या आता राष्ट्रसंघाच्या कर्मचाऱ्यांना प्राधान्यानं देण्यात येतील. काहींच्या नोकऱ्या सुरक्षित राहतील. पण आता त्यांना फ्रान्स किंवा जर्मनीत राहायला व्हिसा लागेल. भारतीयांना तो प्राप्त करणं अजूनच कठीण जाईल. तसंच अनेक बहुदेशीय कंपन्या आपल्या कचेऱ्या व कारखाने लंडनवरून राष्ट्रसंघात हलवतील. जिमी डायमाननं २४ तासात जे.पी. मॉर्गन कंपनीचे हजाराहून अधिक कर्मचारी हलवण्याचा निर्णय जाहीर केला. तसंच मॉर्गन स्टॅनले या जागतिक वित्त कंपनीनं तीन हजारहून अधिक नोकऱ्या फ्रँकफर्ट व इतर ठिकाणी स्थलांतरित करण्याचं ठरवलं. हा मजूर ऱ्हास पुढील काही महिन्यात वाढेल यात शंका नाही. ब्रिटनच्या भविष्याला तो विधायक नसून विघातक आहे असंच म्हणावं लागेल.

पण त्याहीपेक्षा जास्त विघातक म्हणजे ग्रेट ब्रिटनचे संभाव्य तुकडे. सध्या त्या देशाचे चार मुख्य घटक भाग आहेत- स्कॉटलंड, उत्तर आयर्लंड, वेल्स व इंग्लंड. स्कॉटलंड व उत्तर आयर्लंडच्या बहुसंख्यांक मतदारांनी राष्ट्रसंघात राहण्यासाठी मतदान दिलं. त्या भागांना ब्रिटनपासून अलग होऊन स्वतंत्रपणे राष्ट्रसंघाचे सदस्य होण्याची जबरदस्त इच्छा असून त्याप्रित्यर्थ एक ठराव लवकरच जनतेसमोर मांडण्यात येणार आहे. तसं झालं तर स्कॉटलंड ब्रिटनचा भाग राहणार नाही. उत्तर आयर्लंडही तोच मार्ग स्वीकारेल. मग वेल्स फार मागे राहणार नाही. एकेकाळी सूर्य कधीही मावळत नसलेलं अफाट साम्राज्य जवळ असलेल्या महान देशाची शकले होऊन मागे बटू ब्रिटन राहिला तर इतिहास विराट हास्य करेल. पण सद्य परिस्थितीत ही शक्यता नाकारता येणार नाही.

तसंच युरोपीय राष्ट्रसंघाचं अखंडत्वही धोक्यात आलं आहे. ग्रेट ब्रिटन या संस्थेला वर्षाकाठी २० अब्ज पौंड भरे. पण त्यातून ब्रिटनला फक्त १० अब्ज पौंडचे लाभ मिळत. उरलेले पैसे राष्ट्रसंघ अनुदान म्हणून इतर गरीब व बारीक देशांना शिधा देण्यास वापरे. ही खुराक आता बंद पडणार असल्यामुळे राष्ट्रसंघही आर्थिक कोंडीत सापडून त्याचं राहणीमान घसरेल हे उघड आहे.

पण आर्थिक नुकसानापेक्षा युरोपीय राष्ट्रसंघाचं अस्तित्वच धोक्यात येणार आहे. अनेक घटक देशांना राष्ट्रसंघ आवडत नाही. फ्रान्समध्ये ६१ टक्के जनता राष्ट्रसंघाविषयी असंतुष्ट असून तिथे फ्रेक्सीट नावाची चळवळ सुरू झाली. ब्रिटननं जसं स्वातंत्र्य संघापासून मिळवलं तसंच फ्रेंच लोकांना पाहिजे. नेदरलँडसुद्धा त्याच मार्गावर आहे. या सर्व देशात लोकशाही आहे पण स्वातंत्र्य (Liberty) नाही. त्यावर ब्रुसेल्सच्या अज्ञात व मतदारांचा अंकुश नसलेल्या नोकरशहांनी बंधनं घातली आहेत. त्यामुळे अनेक नाखुश झाले आहेत. म्हणून बाहेर पडणाऱ्या ब्रिटनएवढंच मागे राहणाऱ्या देशांचं भविष्य धूसर झालं आहे.

या बाबतीत ब्रिटनच्या यातना वर्णनातीत आहेत. ग्रेट ब्रिटनचं विघटन होऊन स्कॉटलंड राष्ट्रसंघात संमिलित झाला तर ब्रिटनला आपल्या अण्वस्त्रांपासून वंचित राहावं लागेल. कारण अण्वस्त्रधारी नौका, पाणबुड्यांचे तळ स्कॉटलंडमध्ये आहेत. आजकाल देशाची पत नैतिक बळाऐवजी त्याच्या बंदुकीत किती गोळ्या किंवा म्यान्यात किती तलवारी आहेत यावरून ठरते. असं जर झालं तर इंग्लंडची ओळख बेटरूपी श्रीलंकेपेक्षा वेगळी नसेल.

पण असं अरिष्ट ओढवण्याची काय गरज होती? प्रस्थापितांना असा घटस्फोट घेण्याची काय आवश्यकता होती? याचं मुख्य कारण म्हणजे बव्हंशी ब्रिटिशांना आपण लोकशाहीत राहत असलो तरी आपलं स्वातंत्र ब्रुसेल्समधल्या राष्ट्रसंघाच्या मुख्यालयात काम करणाऱ्या बेनामी, अपरिचित व कधीही निवडून न आलेल्या बाबूंनी चोरून नेलं असं वाटत होतं. याचं एक उदाहरण म्हणजे स्त्रियांनी ओले केस वाळवण्यास उपयोगात येणारं यंत्र कमी प्रमाणात वापरावं म्हणजे वीज वापर कमी होऊन पर्यावरणरक्षण होईल असं काढलेलं फर्मान. तसंच विशिष्ट प्रकारचे विद्युत बल्ब्स वापरावेत अशा क्षुल्लक नियमांमुळे राष्ट्रसंघानं स्त्रियांचा रोष ओढवला. असे अनेक नियम वारंवार काढले जात होते. ब्रिटिश संसद त्यांना रद्द करू शकत नव्हती. त्यामुळे ते शिरसावंद्य मानणं भाग होतं.

दुसरं महत्त्वाचं कारण म्हणजे स्थलांतरांची भीती. युरोपीय राष्ट्रसंघाचा एक नियम असा की त्याच्या कुठच्याही २८ सदस्य देशांत राहणाऱ्याला कुठेही व्हिसामुक्त विहार करण्याचंच नव्हे तर स्थायिक होण्याचं स्वातंत्र्य आहे. अवैधपणे घुसखोरी करणाऱ्यालाही ही सुविधा उपलब्ध असते. म्हणजे आज रुमानियातला कैदेतून सुटलेला गुन्हेगार ब्रिटनमध्ये केव्हाही बस्तान मांडून त्या देशाच्या कल्याणकारी योजनांचा फायदा घेऊ शकतो. पण रंगीत त्वचा असलेल्या उच्चविद्याविभूषित व उत्पादक नागरिकाला देशात प्रवेश मिळणं कठीण झालं आहे. याप्रमाणे युरोपीय देशातून आलेल्या अल्पशिक्षित, अल्पपठित व अनुत्पादक लोकांचं स्वागत तर बाहेरून आलेल्या कौशल्यवान, उच्चशिक्षित व उत्पादक व्यावसायिक लोकांचा धिक्कार करण्याची राष्ट्रसंघर्षावर पाळी आली होती. स्थलांतरितांचं नियंत्रण करण्याचा हक्क ब्रिटिशांना नव्हता. हा प्रश्न तिथे नेहमीच ऐरणीवरचा समजला जाई.

या ६५ दशलक्ष लोकवस्तीच्या देशात मागच्या वर्षी ३-४ लाख स्थलांतरित रुमानिया, बल्गेरिया व क्रोएशियासारख्या पूर्व युरोपियन देशातून आले व स्थायिक झाले. ते प्राधान्यानं ब्रिटन पसंत करतात कारण तिथली फुकट आरोग्यसेवा, शिक्षणाचा उच्च दर्जा, कल्याणकारी योजनांतून मिळणारे लाभ व एकंदरीत स्वातंत्र्य

त्यांना आवडतं. या अनामंत्रित रहिवाशांमुळे ब्रिटनचा सामाजिक पोत तर बदललाच पण ब्रिटिश संस्कृतीला तडा गेला. देशाचं सांस्कृतिक वेगळेपण लयाला जाऊ लागलं. शिवाय ते नोकऱ्यांसाठी स्थानिक लोकांशी स्पर्धा करू लागले. कष्टाच्या व कौशल्यहीन कामासाठी अशा स्थलांतरितांचा उपयोग वाढला व स्थानिक लोकांत बेरोजगारीचं प्रमाण वाढलं. तसंच शाळांवर, आरोग्यसेवेवर व कल्याणकारी योजनांवर बोजा वाढला. स्थलांतरित करपट्टी भरत असले तरी त्यांचं सरासरी उत्पन्न कमी असल्यामुळे योगदान मर्यादितच असतं. याचा स्थानिक लोकांना राग येणं साहजिक आहे.

**ब्रिटनच्या यातना वर्णनातीत आहेत. ग्रेट ब्रिटनचं विघटन होऊन स्कॉटलंड राष्ट्रसंघात संमिलित झाला तर ब्रिटनला आपल्या अण्वस्त्रांपासून वंचित राहावं लागेल. कारण अण्वस्त्रधारी नौका, पाणबुड्यांचे तळ स्कॉटलंडमध्ये आहेत. असं जर झालं तर इंग्लंडची ओळख बेटरूपी श्रीलंकेपेक्षा वेगळी नसेल.**

सध्या सिरियन युद्धग्रस्तांनी सगळा युरोप व्याप्त केला आहे. जर्मनीत १५ लाख विस्थापित आले. बहुतेकांचं गंतव्यस्थान ब्रिटन आहे. पण तो देश जलवेष्ठित असल्यामुळे हे लोंढे निसर्गानं थोपवले. तरीही ते ब्रिटिशांचं कवाड ठोठावत आहे. याची भितीही ब्रिटिशांना भेडसावत होती. आता ब्रिटन अलग झाल्यामुळे त्याला आपली सरहद्द नियंत्रित करण्याचे हक्क प्राप्त होतील.

शेवटी हा घटस्फोट म्हणजे युरोपीयन समाजवादाचा पराभव असंही म्हणता येईल. ब्रिटनमध्ये व सर्व राष्ट्रसंघात ही राज्यप्रणाली प्रचलित असली तरी तिचं स्वरूप वेगळं आहे. ब्रिटिश समाजवाद भांडवलशाहीकडे झुकणारा तर युरोपमधला कामाऐवजी योजनांवर भर देणारा. विकासापेक्षा राष्ट्रसंघ आर्थिक विषमतेवर जास्त लक्ष ठेवते. वर्षात १२ महिने असले तरी कर्मचाऱ्यांना १४ महिन्यांचा पगार देण्याची स्पेनमध्ये पद्धत असे. फ्रान्समध्ये आठवड्याला ३५ तास काम केलं तरी ४० तासांचा पगार मिळण्याची व्यवस्था. त्या देशात सर्वसामान्य माणसाला पंचतारांकित व्हॅकेशन पाहिजे असेल तर एखादा धार्जिण डॉक्टर पकडावा. तणाव फार वाढला किंवा अंगात दुखत असलं तर तो अशी हवापालट प्रिस्क्राईब करू शकतो. ग्रीसमध्ये तर वयाच्या ५५ व्या वर्षी निवृत्त होऊन सरकारी पैशावर ऐषआरामी जीवन जगता येत असे. हे वय बदललं तेव्हा लोकांनी संप पुकारून नासधूस केली. समाजवादाची ही कृष्णबाजू ब्रिटनमध्ये सापडत नाही.

सरकारी वरदहस्तामुळे युरोपमध्ये काम करून अर्थनिर्मिती करणं रोगिष्ट समजण्यात येते. त्याच्या अर्थकारणाचा वाढदर शून्यवत तर ब्रिटिशांचा २ टक्क्यांच्या वर. मरणासन्न अर्थकारणाला चेतावणी देण्यासाठी युरोपियन सेंट्रल बँकेनं व्याजाचे दर एवढे कमी केले की ते शून्याखाली गेले. या उण्या व्याजदराचा अर्थकारणाच्या वाढीवर फारसा परिणाम झाला नाही. ब्रिटिशांना अशी आर्थिक अभियांत्रिकी करण्याची जरुरी भासली नाही. बाहेर पडल्यामुळे त्या देशाला आपलं वेगळेपण जगाला दाखवण्याची संधी मिळेल.

इतिहासात ब्रिटिशांनी अनेक संकटं भोगली. पण प्रत्येक वेळी त्या देशाला संकटात संधी सापडली. यावेळीही तसंच होईल. सुरुवातीच्या अडचणीतून त्यांना मार्ग मिळेलच. शेवटी पिंजऱ्यातल्या पक्षापासून पक्षाच्या सदस्यापर्यंत प्रत्येकाला स्वातंत्र्य हवं असतं. ब्रिटिश त्याचा फायदा घेऊन वर येतील हे नि:शंक.

– **डॉ. अनंत पां. लाभसेटवार** (पीएच.डी.)
latalabh@aol.com
(लेखक फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी, कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्ष चेअरमन ऑफ दी बोर्ड होते.)

**॥ग्रंथाली॥**




## पाणीबाणी... – संपादन प्रभाकर साळेगावकर

निसर्गाच्या खपामर्जीने मराठवाड्यात हाहाकार माजला. अवघे जगणे पार विस्कटून गेले. पाणी शोधता शोधता मरण यातनांचे भोग पाठी लागले. नजरेत मावणार नाही एवढे आकाश रिते पडले. ह्या शुष्क जमिनीवर वेदनेची कोरांटी लागू पाहत होती. हे रखरखीत जगणं खुरडत का होईना पण रेटून नेण्याचा खटाटोप थांबायला तयार नव्हता. असे अनुभव काळजामध्ये खोल कुठेतरी खुपसले जायचे. हे घाव सहन करताना होरपळलेल्या माणसांकडे वेदनेचे शब्द चाल करुन येऊ लागले. ह्या भीषण वास्तवातून आकाराला आल्या ह्या कविता. ह्यातला सूर आनंद देणार नाही, पण भरपूर अस्वस्थ करणारा आहे. ह्या कवींच्या मनात जखमा झालेल्या आहेत. त्यातले रक्त वाहून गेले आहे. पण खपली भरेल असा वेडा आशावादही आहे. सुन्न करणारा हा संग्रह म्हणजे निसर्गानेच तयार केलेले शिल्प आहे. वाचक म्हणून आपली सोबत मिळाली तर त्यांनाही कष्टाचे सोने नव्हे चीज झाले असेच वाटेल.

– **हेमंत टकले**

**मूल्य १६० रु. सवलतीत १०० रु.**

# आता पुण्यातील रसिक वाचकांची पुस्तकखरेदी

म्हात्रे पुलाजवळ, डीपी रोडवरच!

# मॅजेस्टिक बुक गॅलरी

ग्रंथांच्या मनोहारी विश्वात फेरफटका मारून
प्रसन्न वातावरणात पुस्तकखरेदीचा आनंद घ्या!

म्हात्रे पुलाजवळ, शंभर फूट डीपी रोड, शुभारंभ लॉन्ससमोर,
पुणे ४११ ०५२

भरपूर पार्किंगची सोय

विविध विषयांवरची हजारो मराठी व इंग्रजी पुस्तके
वेधक मांडणीत एकत्रित पाहा.



पुस्तकखरेदीच्या विविध योजनांचा लाभ घ्या.

वाचनालयांसाठी खास सवलत!

दूरध्वनी : (०२०) ६८८८८९०८

**ह्या जाहिरातीचे कात्रण घेऊन येणाऱ्यास २०% सवलत.**

# 'माध्यम'चं वेगळेपण आणि 'आमादमी विदाऊट पार्टी'

प्रवीण बर्दापूरकर

**स**कारात्मक, विधायक काही घडत नाही, शहरी आणि त्यातही प्रामुख्यानं, मध्यमवर्गीयांची संवेदनशीलता हरवत चालली आहे, नमस्कार करावा अशी पावलेच दिसत नाहीत, आजची तरुण पिढी चंगळवादी झालीये, वाचन संस्कृती लोप पावते आहे...वगैरे खंत नेहेमीच कानावर पडते. प्रत्यक्षात शंभर टक्के तसं काहीच नसतं, नाहीच. समाजात खूप काही चांगलं घडत असतं पण, ते माहीत नसल्यानं ही 'लोकप्रिय' किरकिर होत असावी. लोकही ही किरकिर एका कानानं ऐकतात आणि दुसऱ्या कानातून सोडून देतात!

'गेल्या तीस वर्षांपूर्वीचे लोक व त्यांच्या समजुती अथवा माझ्या प्रवासाची हकिकत (रोजनिशी)' असं रेल्वेगाडीसारखं लांबलचक शीर्षक असलेलं गोविंद बाबाजी जोशी या लेखकाचं पुस्तक नुकतंच भेटीला आलं. मूळ पुस्तक १८९६ साली प्रकाशित झालेलं आणि सध्या अर्थातच दुर्मिळ होतं. महत्प्रयासे शोधून काढून 'माध्यम प्रकाशन' या मुंबईच्या प्रकाशकानं ते पुन्हा प्रकाशित केलंय. महत्त्वाचं म्हणजे, या पुस्तकाच्या ५०० प्रती राज्यातील ग्रंथालयांना नि:शुल्क वितरीत केल्या आहेत! गोविंद बाबाजी जोशी यांनी १८६० नंतर भारतात सुमारे एक तप आणि तीन हजार मैल केलेल्या प्रवासाची हकिक्त म्हणजे हे पुस्तक आहे. पाच मैल म्हणजे आठ कि.मी. असा आजच्या हिशेबानं हा एकूण प्रवास आहे. हा प्रवास घडला तेव्हा प्रवासाची साधनं किती अपुरी होती हे वेगळं सांगायला नको.

त्या काळात गोविंद बाबाजी जोशी यांनी रेल्वे आणि बैलगाडीनं २२४१, जलमार्गानं २५७, घोड्यावर बसून १९१ आणि पायी १९० मैल प्रवास करताना लिहिलेली रोजनिशी म्हणजे हे पुस्तक आहे. तत्कालीन सामाजिक जीवन आणि देशाची स्थिती समजून घेण्यासाठी हे पुस्तक फारच उपयुक्त आहे. शैली आजच्या भाषेपेक्षा पूर्णपणे अपरिचित पण, रसाळ आणि गुंगवणारी आहे. त्यातून सुमारे दीडशे वर्षांपूर्वी मराठी भाषेचा बाज कसा होता, हेही समजतं; आज साठीच्या उंबरठ्यावर किंवा साठी पार असलेल्या लोकांना नष्ट झालेले अनेक मराठी शब्द या पुस्तकात भेटतील आणि 'हरवलं ते सापडल्याचा' आनंद मिळेल. वाचकांच्या या पिढीला, ही रोजनिशी वाचताना कालौघात स्मृतीआड झालेल्या मराठी शब्दांच्या गतकातर आठवणींत रमण्याची संधीही नक्की मिळेल. पण ते असो, कारण या पुस्तकावर लिहिण्याचं हे प्रयोजन नाहीये.

ग्रंथालय शास्त्राचा विद्यार्थी असल्यानं हे पुस्तक आणि त्याची महती ठाऊक होती. विद्यापीठाच्या ग्रंथालयात तेव्हा हे पुस्तक पाहिल्याचंच नाही तर, उत्सुकतेनं वाचल्याची पुसटशी आणि काहीच लक्षात न राहिल्याची स्पष्ट आठवण आहे. पण, माध्यम प्रकाशनाला इतकं दुर्मीळ आणि महत्त्वाचं हे पुस्तक का प्रकाशित करावं, मोफत वितरित का करावं, हे काही कळेना. पुस्तकाच्या प्रस्तावनेतून आणि नंतर उन्मेष अमृते व अमित जठार यांच्याशी बोलल्यावर या प्रकाशनाचं वेगळेपण कळलं. चित्रपट व मालिका लेखक आणि दिग्दर्शक उन्मेष अमृते, आयटी क्षेत्रातील अमित जठार. जनसंपर्क क्षेत्रातील एका परदेशी कंपनीत राजकीय शाखेतील तज्ज्ञ गिरीश ढोके, अॅडव्होकेट असलेले विनायक मुणगेकर, शिक्षण क्षेत्रातले राजेंद्र जोशी, सिव्हिल इंजिनीअर असलेले गिरीश गव्हाणे आणि कॉल सेंटर संचालक सुशांत पोळ असा हा तेवीस ते पंचेचाळीस वर्ष वयोगटातील, मुंबईतला सात जणांचा ग्रुप आहे. हे सर्वजण अर्थातच उत्तम वाचक आहेत आणि स्वाभाविकच पुस्तकप्रेमी आहेत. काही तरी वेगळं करण्याची त्यांना

उमेद आहे. 'घरचं खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजण्याची' त्यांची त्यासाठी सहर्ष तयारी आहे. त्यातूनच 'माध्यम प्रकाशन' ही कल्पना पुढे आली. या कल्पनेचं वेगळेपण म्हणजे आता उपलब्ध नसलेली, खरं तर दुर्मीळ झालेली आणि मराठी समाज-भाषा-संस्कृतीचा ऐवज असणारी पुस्तकं चोखंदळ वाचक आणि अभ्यासकांसाठी प्रकाशित करण्याचं ठरवण्यात आलं. अनेकांशी संपर्क साधून महत्त्वाच्या शंभर दुर्मीळ पुस्तकांची यादी तयार करण्यात आली. गोविंद बाबाजी जोशी यांची वर उल्लेख केलेली 'रोजनिशी' हे त्यातलं पहिलं पुस्तक. या पुस्तकासाठी गणेश चुक्कल यांनीही आर्थिक मदत केली. दीर्घ शोध घेऊन हे दुर्मीळ असलेलं पुस्तक कसं मिळवण्यात आलं, याची उन्मेष अमृते यांनी पुस्तकात कथन केलेली हकिकत वाचण्यासारखी आहे. महत्त्वाचं म्हणजे आता पुढे, मराठीतील अशी शंभर दुर्मीळ पुस्तकं प्रकाशित करण्याचं माध्यम प्रकाशनानं ठरवलं आहे. पुणे शहराचा पेशवाईनंतरचा इतिहास, लेखक - शा. बा. मुजुमदार. पेशवेकालीन सामाजिक आर्थिक इतिहास, लेखक - रा. वि. ओतूरकर. 'मराठी रंगदेवतेच्या १०० वर्षांच्या मौजा', लेखक - पांडुरंग गणेश क्षीरसागर. जनाक्का शिंदे यांचं आत्मचरित्र (जनाक्का शिंदे या महर्षि वि. रा. शिंदे यांच्या भगिनी. हे आत्मचरित्र अप्रकाशित आहे). काही रहस्यमय क्रांतिकारक, लेखक - हरिभाऊ जोशी. सत्यशोधक समाजः हिरकमहोत्सवी ग्रंथ, संपादक - माधवराव बागल. महादजी आणि नाना, लेखक- ह. रा. नवलकर (वाईच्या धर्म मासिकात भाऊशास्त्री लेले यांनी नाना फडणविसांवर लिहिलेल्या लेखांना उत्तर म्हणजे महादजी आणि नाना). दखखनचा प्राचीन इतिहास, लेखक - रामकृष्ण गोपाळ भांडारकर. विस्मृतीच्या खाईत गेलेल्या या पुस्तकांच्या पुनर्प्रकाशनासाठी काम सुरू झालेलं आहे. माध्यम प्रकाशन या वर्षाअखेरीस पु. ल. देशपांडे यांना भारतातील विविध क्षेत्रातील दिग्गजांनी लिहिलेली पत्रे प्रकाशित करणार आहे. 'अखख्या महाराष्ट्राचं लाडकं' व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे यांना ५० वर्षांत आलेली पत्रं म्हणजे, तो काळ आणि पु.लं.चं काम, यांचा बहुमूल्य दस्तावेज आहे असं माध्यमकारांचं म्हणणं आहे.




प्रकाशन हा केवळ व्यवसाय नाही तर सर्जनांचं काम लोकांपर्यंत पोहोचवण्याची तीही एक सर्जनशील नवनिर्मितीच असते अशी माझी धारणा आहे. व्यवसायाला प्राधान्य मिळून बहुसंख्य वेळा सर्वच प्रकाशकांकडून सर्जनशील निर्मितीचं काम होतंच असं नाही. पण, अनेकदा ते घडत असतं. माध्यम प्रकाशनानं व्यावसायिक दृष्टिकोन बाजूला ठेवून सर्जनशील निर्मितीचं हाती घेतलेलं काम म्हणूनच अत्यंत महत्त्वाचं आणि कौतुक करावं असंच आहे. हे कौतुक केवळ प्रकाशनासाठी नाही तर, हे सातजण आणखी त्यापुढे गेलेले आहेत. गेली ८-९ वर्षे 'मॉब' या संस्थेच्या नावाखाली ते पाणी या विषयावर काम करीत आहे. रुपारेल कॉलेज, सिद्धिविनायक मंदिर, शिवाजी पार्क, मुंबई फिल्म सिटी या काही ठिकाणी पर्जन्य जलसंधारणाचे प्रकल्प यशस्वीरीत्या राबविण्यात आले आहेत. २-३ वर्षांपूर्वी मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, बीड जिल्ह्यातील ८ गावं दुष्काळमुक्त करण्यात संस्थेला यश आलेलं आहे. 'मॉब'च्या प्रकल्पामुळे १७ लाख रुपये पाण्याचं बिल वाचल्याची पुण्यातील वाडिया कॉलेजने कबुली देणं, ही एकप्रकारे 'मॉब'च्या कामाला मिळालेली पावतीच आहे. एकंदरीत काय तर, वेडात दौडताहेत वीर सात' अशी माध्यम नावाच्या या ग्रुपची कथा आहे. त्यांना त्यांचं हे वेड कायम राखण्यासाठी शुभेच्छा.

जाता जाता एक वडिलकीचा एक सल्ला- सगळ्यांनाच दुर्मीळ खजिन्यातील पुस्तकांचा हा ऐवज निःशुल्क देऊ नका. अनमोल, दुर्मीळ फुकट मिळाल्याची जाणीव ठेवण्याची, त्याबद्दल कृतज्ञता बाळगण्याची जाणीव आपल्या समाजात बहुसंख्यांना नाहीये!

(संपर्क- उन्मेष अमृते ९१६७९३१०६१, विनायक मुणगेकर ९८७०५५१९९१ आणि अमित जठार ९८३३४२९९२२. ई-मेल : madhyamprakashn@gmail.com )

बब्रूवान रुद्रकंठावार

आजच्या तरुणाईच्या भाषेत सांगायचं झालं तर एक जबरा' पुस्तक नुकतंच वाचनात आलं. पुस्तकाचं नाव आहे- आमादमी बिदाऊट पार्टी', लेखक आहेत- बब्रूवान रुद्रकंठावार आणि प्रकाशक- जनशक्ती वाचक चळवळ. बब्रूवान हे अर्थातच टोपणनाव आहे ते, धनंजय चिंचोलीकर या अत्यंत कमी बोलणाऱ्या पत्रकाराचं. संडे क्लब असो की मैफिल की कार्यक्रम, पत्रकार असूनही (!) धनंजय कमी का बोलतो याचं उत्तर, खास मराठवाडी 'लहेजा' असलेलं त्याचं लेखन वाचल्यावर मिळतं. ओठावरच्या भरघोस (भालचंद्र नेमाडेंची आठवण करून देणाऱ्या वळणाच्या) मिशात दडवलेल्या ओठांचा उपयोग धनंजय बोलण्यासाठी कमी करतो आणि बोलतो तेव्हा ते नेमकं असतं. श्रवण आणि निरीक्षणावर त्याचा भर असतो. ते निरीक्षण मग त्याच्या लेखनात उपहासात्मक (विनोदी नव्हे) शैलीत उतरतं. सध्या मराठी

पत्रकारितेत तंबी दुराई आणि प्रितीश नंदी या दोघांचं झकास तिरकस शैलीतलं, अनेकांच्या टोप्या उडवणारं लेखन गाजतंय. तंबी दुराई तर 'लोकसत्ता'त माझा सहकारी होता. पण, मोकळेपणानं कबूल करतो, तंबी दुराई, प्रितीश नंदी आणि असं लेखन करणाऱ्या कोणाही समकालीन लेखकांपेक्षा बब्रूवान रुद्रकंठावारचं लेखन, त्यात भरलेला भेदक उपहास सरस आणि अचंबित करणारा आहे. बब्रूवानचा भेदकपणा वास्तवाची जाणीव ज्या विषण्णतेने आणि अगतिकपणे करून देतो, ती पातळी खूप वरच्या दर्जाची आणि खोलवर अंतर्मुख करणारी आहे. बबऱ्या, दोस्त, बबऱ्याचा मुलगा गब्रू, दोस्ताचा मुलगा बारक्या आणि अधूनमधून बबऱ्या व दोस्त या दोघांच्या पत्नी (त्यांना नावं नाहीत!) यांच्या ठसकेबाज बोलण्यातून खणखणीत फटकेबाजी करत समूहाच्या जगण्याच्या विसंगतीवर, बब्रूवान व्रण न उमटवणारा पण, ठणका देणारा बोचकारा काढतो. ही त्याची खासीयत, त्याच्यात असलेलं सामाजिक भान आणि समंजसपणाचं लक्षण समजायला हवी. हे लेखन मोठ्या व्यासपीठावर, राज्यस्तरीय माध्यमात प्रकाशित झालं असतं तर, माझ्या म्हणण्याला बहुसंख्य मराठी वाचकांनी आनंदानं पसंतीची मान डोलावली असती, यात शंकाच नाही!

भाषा, समाजकारण, अर्थकारण, राजकारण, आधुनिकता तसंच व्यक्ती आणि समाज याचं किती सूक्ष्म निरीक्षण आणि त्यावर विचार बब्रूवान रुद्रकंठावार करतो ते, मुळातूनच वाचण्यासारखं आहे. त्यासाठी त्यानं आज अनेकांकडून बोलल्या जाणाऱ्या अति इंग्रजीमिश्रित मराठी भाषेचा जो मराठवाडी तडका पेश केलाय तो पूर्णपणे अस्सल आणि झणझणीत आहे. इंग्रजी शब्दांचा भडीमार असूनही बब्रूवानच्या शैलीत ते इंग्रजी शब्द पूर्ण आणि सहज शरणागत होत मराठवाडी होतात, हेही या शैलीचं आणखी एक वैशिष्ट्य. इंग्रजीचं हे असं मराठवाडी मराठी होणं, हे बब्रूवानच्या शैलीचं मोठं यश आहे. या शैलीची भुरळ पडून प्रस्तावनेचे पहिले काही परिच्छेद त्याच शैलीत लिहिण्याचा मोह ज्येष्ठ पत्रकार/लेखक अरुण साधू यांना आवरता आलेला नाही. 'सिंथेसाईज्ड वुईथ इंग्लिश...डेडली कॉकटेल' असं या लेखनाचं मोठं चपखल वर्णन अरुण साधू यांनी का केलंय ते समजण्यासाठी 'आमादमी विदाऊट पार्टी' हे पुस्तक वाचायला(च) हवं या श्रेणीतलं आहे.

धनंजय उपाख्य बब्रूवानला मी गेल्या १७-१८ वर्षांपासून ओळखतो, वाचतो आहे. आता त्याची नं वाचलेली 'न घेतलेल्या मुलाखती' आणि 'बर्ट्रांड रसेल वुईथ देशी फिलॉसॉफी' सर्व पुस्तकं वाचायची आहेत. धनंजय आणि बब्रूवान या दोघांनाही खूप खूप शुभेच्छा. ('आमादमी विदाऊट पार्टी', लेखक- बब्रूवान रुद्रकंठावार, प्रकाशक- जनशक्ती वाचक चळवळ, पुस्तकासाठी संपर्क- श्रीकांत उमरीकर- ९४२२८७८५७५)

**- प्रवीण बर्दापूरकर**
भ्रमणध्वनी ९८२२०५५७९९ / ९०११५५७०९९
praveen.bardapurkar@gmail.com

**॥ग्रंथाली॥**

## फुटपाथ ते नोटरी

**सुजाता लोखंडे**




**मूल्य १८० रु.**
**सवलतीत ११० रु.**

या कादंबरीचा नायक सागर आहे. तो ज्या समाजात जन्मला तो आंबेडकरी समाज येथील समाजव्यवस्थेने तळागाळातच आरंभापासून ठेचलेला असून, त्याच्या जगण्याचे सगळे मार्गच अवरुद्ध करून टाकलेले आहेत. साध्या दैनंदिन आवश्यक गरजा - अन्नपाणी, वस्त्र, निवारा पूर्ण करण्यासाठी त्याला अटीतटीने परिस्थितीशी लढावे लागते. वाचकाला विचार करायला लावणारी ही परिस्थिती मनुष्यनिर्मित व्यवस्थेतून अस्तित्वात आली हे तर निर्विवाद आहेच.

**- प्रा. कुमुद पावडे**

## निर्भया लढते आहे - नीलम माणगावे




खरं तर, या कथा लिहिताना आनंद नव्हता झाला. झाल्या त्या वेदनाच! एक मूक बधिरता व्यापून राहिली होती. अशा कथा कुणाला कधीच लिहाव्या लागू नयेत, अशी समाजव्यवस्था निर्माण व्हायला हवी.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

साधना प्रकाशनाचे
नवे पुस्तक




पृष्ठे : २१२, किंमत : २०० रुपये
सवलतीत : १५० रुपये

# मुका म्हणे...

## मुकुंद टाकसाळे

लोकवाङ्मयवृत्त मासिक, साधना साप्ताहिक
व मी मराठी दैनिक या तीन नियतकालिकांत
प्रसिद्ध झालेल्या सदरांमधील निवडक ५० लेखांचे हे पुस्तक आहे.

हे पुस्तक ललित लेखांचे आहे, पण त्याला वैचारिकतेची डूब आहे.
या पुस्तकात नर्मविनोद आहे, पण हाताळलेले विषय गंभीर आहेत.

विनोदी शैलीत केलेल्या ललित लेखनामध्ये काहीएक निश्चित
व निर्णयात्मक 'भूमिका' आहे असे लेखन
मराठीत अपवादात्मक दिसते,
मुकुंद टाकसाळे यांचे लेखन अशा अपवादांपैकी आहे.

अनुक्रम

'अंधश्रद्धे'कडं थोड्या डोळसपणे पाहताना... । वाचन-संस्कृती? । एव्हरीथिंग फॉर सेल! । 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे...' ।
बिहारचा महाराष्ट्र । लोकशाहीचं चांगभलं!!! । महात्मा गांधींचा लिलाव । राजकारण्यांचा विनोद ।
८३ व्या अ. भा. म. सा.सं.च्या निमित्ताने... । 'हिंदू' आणि 'आवरण' । माडगूळकर, मेहता आणि मानधन । सत्यमेव जयते ।
बाळासाहेबांच्या जाण्यानंतर । सोन्याचा कळस । वेगळ्या पत्रकारितेचा 'श्री गणेशा' । 'सुपरमॅन'चं आत्मचरित्र ।
जगण्याची समृद्ध अडगळ । मैत्रीची एक्सपायरी डेट । सरहद गांधी । दीदी आणि मोदी । दु:खाच्या ओंजळी ।
आपण पेज थ्रीचे मानकरी! । आपला 'मोबाईल देश' । आशाताई मुंडले । मराठीचं वर्षश्राद्ध ।
'यशवंतराव चव्हाण : बखर एका वादळाची' । भूमिका जगणारे नट । तोंडी तमाखूची नळी । 'तडा'खेबंद कादंबरी ।
मतदारांची कोंडी । स्मृतिचिन्हांची गर्दी । पानाचा खर्च??? । वंदीन चरण...? । वाचक देवो भव। ।
महादेवभाई : विलक्षण सुंदर नाट्यानुभव! । आबांचा विनोद । कानांवर हात । रज्जूचक्षू प्रकल्प ।
विकास करा, पण गुपचूप! । पुस्तकाचे गाव । 'खुर्ची'चे राजकारण । कबुतर ऱ्हा ऱ्हा ऱ्हा... ।
तशा किरकोळ गोष्टी । तेच ते आणि तेच ते । मान न मान- मैं सलमान । ...मबजूत भीमाचा किल्ला! । मॅगीऽऽ मॅगी ।
सचिन आणि भारतरत्न । जरासी बेफवाई ।

संपर्क
साधना साप्ताहिक
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.
फोन ०२०-२४४५९६३५

साधना प्रकाशनाचे
नवे पुस्तक




पृष्ठे : २१२, किंमत : २०० रुपये
सवलतीत : १५० रुपये

# मुका म्हणे...

मुकुंद टाकसाळे

लोकवाङ्मयवृत्त मासिक, साधना साप्ताहिक
व मी मराठी दैनिक या तीन नियतकालिकांत
प्रसिद्ध झालेल्या सदरांमधील निवडक ५० लेखांचे हे पुस्तक आहे.


हे पुस्तक ललित लेखांचे आहे, पण त्याला वैचारिकतेची डूब आहे.
या पुस्तकात नर्मविनोद आहे, पण हाताळलेले विषय गंभीर आहेत.

विनोदी शैलीत केलेल्या ललित लेखनामध्ये काहीएक निश्चित
व निर्णयात्मक 'भूमिका' आहे असे लेखन
मराठीत अपवादात्मक दिसते,
मुकुंद टाकसाळे यांचे लेखन अशा अपवादांपैकी आहे.

अनुक्रम

'अंधश्रद्धे'कडं थोड्या डोळसपणे पाहताना... । वाचन-संस्कृती? । एव्हरीथिंग फॉर सेल! । 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे...' ।
बिहारचा महाराष्ट्र । लोकशाहीचं चांगभलं!!! । महात्मा गांधींचा लिलाव । राजकारण्यांचा विनोद ।
८३ व्या अ. भा. म. सा.सं.च्या निमित्ताने... । 'हिंदू' आणि 'आवरण' । माडगूळकर, मेहता आणि मानभन । सत्यमेव जयते ।
बाळासाहेबांच्या जाण्यानंतर । सोन्याचा कळस । वेगळ्या पत्रकारितेचा 'श्री गणेशा' । 'सुपरमॅन'चं आत्मचरित्र ।
जगण्याची समृद्ध अडगळ । मैत्रीची एक्सपायरी डेट । सरहद गांधी । दीदी आणि मोदी । दुःखाच्या ओंजळी ।
आपण पेज थ्रीचे मानकरी! । आपला 'मोबाईल देश' । आशाताई मुंडले । मराठीचं वर्षश्राद्ध ।
'यशवंतराव चव्हाण : बखर एका वादळाची' । भूमिका जगणारे नट । तोंडी तमाखूची नळी । 'तडा'खेबंद कादंबरी ।
मतदारांची कोंडी । स्मृतिचिन्हांची गर्दी । पानाचा खर्च??? । वंदीन चरण...? । वाचक देवो भव। ।
महादेवभाई : विलक्षण सुंदर नाट्यानुभव! । आबांचा विनोद । कानांवर हात । रज्जूचक्षू प्रकल्प ।
विकास करा, पण गुपचूप! । पुस्तकाचे गाव । 'खुर्ची'चे राजकारण । कबुतर न्हा न्हा न्हा... ।
तशा किरकोळ गोष्टी । तेच ते आणि तेच ते । मान न मान- मैं सलमान । ...मबजूत भीमाचा किल्ला! । मॅगीऽऽ मॅगी ।
सचिन आणि भारतरत्न । जरासी बेफवाई ।

संपर्क
साधना साप्ताहिक
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.
फोन ०२०-२४४५९६३५




आनंदतरंग

# भारताचा उत्तर धृव

आत्माराम परब, नरेंद्र प्रभू

**अ**से चमकू नका, उत्तर धृवावर जसं चोहीकडे बर्फाचं साम्राज्य असतं तसा आपल्या भारतातला लडाख प्रांत हिवाळ्यात पार गारठून गेलेला असतो. बर्फाची चादर लपेटून बसलेला हा प्रांत पहाणं हे स्वप्नवत तर आहेच पण परदेशात न जाता धृवीय प्रदेशाची मजा लुटायची असेल तर लडखला हिवाळ्यातही गेलं पाहिजे.

छायाचित्रकार म्हणून लडाख मला नेहमीच खुणावत असतो. गेल्या वीस वर्षात मी केलेल्या लडाखवाऱ्यांची आता शतकोत्तर वाटचाल सुरू आहे. एवढ्या वेळा लडाखला गेल्यावरही लडाख माझ्या मनात घर करून बसला आहे. खऱ्या फोटोग्राफरला लडाखचा अख्खा प्रांत म्हणजे फोटोसाठी पर्वणीच आहे. लडाखला कितीही वेळा जा तिथला नित्य बदलत असणारा निसर्ग छायाचित्रकारासाठी नवनवीन संधी सतत देतच आला आहे. अनेक पर्यटकांना सोबत करीत असताना लडाखचा उन्हाळा मी अनेक वेळा अनुभवला पण तिथला हिवाळा मला अनुभवायचा होता. २००६ च्या हिवाळ्यात मला ती संधी मिळाली आणि नंतर कित्येक पर्यटकांना सोबत घेऊन मी लडाखला हिवाळ्यातही जातच राहिलो, ईशा टूर्सच्या 'व्हिंटर लडाख' सहलींना आता जोरदार प्रतिसाद लाभतो आहे.

आपण जाणतोच की काळ हा चालूच राहातो, पण काळही थांबलेला पाहायचा असेल तर हिवाळ्याच्या दिवसात लेह लडाखला गेलं पाहिजे. अतिशय विरळ लोकवस्ती असलेल्या या प्रदेशातील जनजीवन त्या काळात ठप्प झालेलं असतं. असं वरवर दिसत असलं तरी तिथल्या आसमंतात जीवन आकार घेतच असतं. निसर्गाचा अद्भुत खेळ चालूच असतो. याच निसर्गाचे विभ्रम टिपण्यासाठी खर्यास भटक्याने या काळात लडाखला गेलंच पाहिजे. उन्हाळ्यातलं आपलं मनोहारी रुप पालटलेला लडाख प्रांत आता आणखी देखणा झालेला असतो. मात्र ते देखणेपण अनुभवायचं असेल तर तयारी ही तशीच करावी लागते. वजा वीस ते वजा तीस तपमानात तग धरून रहाण्यासाठी लागणाऱ्या कपड्याची जशी व्यवस्था करावी लागते तशी शरिराचीही काळजी घ्यावी लागते. जी काळजी स्वत:साठी घेतो तशीच काळजी कॅमेरा आणि त्याच्या इतर उपकरणांसाठीही घ्यावी लागते.

लडाखच्या भूमीवर उतरायच्या आधी विमानामधूनच त्याच्या हिवाळ्यातल्या सौंदर्याची कल्पना यायला सुरुवात होते. पुराणकथांमधल्या वर्णनाशी साधर्म्य असलेले देखावे पाहून हरखून जायला होतं. कदाचित याच किंवा अशाच उंच ठिकाणांची स्वर्ग म्हणून वर्णनं केली गेली असावीत. या धरतीवरच्या स्वर्गात आता आपण जिवंतपणी पाय ठेवणार असतो आणि हे स्वर्गारोहण डोळ्यांचं पारणं फिटवणारं होणार म्हणून प्रत्येकजण मनोमन हरखून गेलेला असतो. लडाख प्रांताचा तो विहंगम नजारा विमानातून पाहताना आपण आता अनोख्या जगतात प्रवेश करते होत आहोत







याची कल्पना यायला लागते आणि मन त्या धरतीवर आधीच पोहोचतं. ते देखावे खरंच शब्दातीत आहेत. अशाप्रकारे लेहच्या विमान तळावर विमान उतरत असतानाच तिथली हिमशिखरं आपल्याला खुणावू लागतात. लेहच्या छोटेखानी विमानतळावर उतरण्याआधी खिडकीतून बाहेर पाहिल्यास इथे आपण एवढ्या उशीरा का येत आहोत किंवा या आधीच हे ठिकाण का पाहिलं नाही असं खऱ्या भटक्याला वाटून जातं. त्या जादुई भूमीवर पाय ठेवायला आपण थोडे उतावळेच झालेलो असतो. पण  मित्रहो आता इथे पडणारं प्रत्येक पाऊल जरा जपून टाकलं तर हा नजारा मनासारखा अनुभवता येतो. विमानाच्या सुरक्षित कवचामधून बाहेर आल्यावर विरुद्ध तपमानाचा सामना आपल्याला करायचा असतो म्हणून काही दक्षता घेणं जरुरीच असतं. विमानाबाहेर आल्या आल्या सामना करावा लागतो तो तिथल्या थंडीचा आणि हाय अल्टीट्युड सिकनेसचा. विमानाने लेहला गेल्यावर कधीही चोवीस तासाची विश्रांती घेतलेली बरी. त्यानंतर मात्र आपण मनसोक्त भ्रमंतीला तयार होतो.

गोठवणारी थंडी असली तरी लडाखी माणसं हसतमुखाने आपलं स्वागत करायला नेहमीच तयार असतात. अफाट पसरलेला मोकळा भूप्रदेश आणि बर्फाच्छादित शिखरांबरोबरच परंपरागत वेशात असलेली ही लडाखी माणसं आपलं लक्ष वेधून घेत असतात. त्यांना 'जुले' म्हणून (लडाखीत प्रणाम) फोटो घेतला तर ते आनंदाने फोटो घ्यायला तयार होतात पण जर दुरूनच त्यांचे मूळ आविर्भाव टिपले तर ते अधिक चांगले वाटतात. बाहेरच्या अती थंड वातावरणामुळे सामसूम वाटली तरी लडाखच्या मॉनेस्ट्रीजमध्ये अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात आणि चैतन्याची मंदिरं असलेल्या या मॉनेस्ट्रीजमध्ये व्यतीत केलेले क्षण आपण सहसा विसरू शकत नाही.


लडाखला केव्हाही गेलं तरी पँगॉंग लेकला भेट दिली नाही





तर ती सफर पूर्ण झाली असं म्हणता येणार नाही. हिवाळाही त्याला अपवाद ठरत नाही. पँगाँग लेकला जाताना लागणारा छांगला पास ही हटकून थांबण्यासारखी जागा आहे. या पासच्या दोन्ही बाजूला वरून दिसणाऱ्या दऱ्याखोऱ्यांचं दर्शन मनाला उधाण आणतं. ध्रुवीय प्रदेशात दिसतं तसं बर्फाचं साम्राज्य इथे फिरताना रस्त्याच्या दुतर्फा पाहताना किती म्हणून फोटो घ्यायचे असं होऊन जातं. अशाप्रकारचा प्रवास आपण क्वचितच केला असेल. छांगला पासच्या पांढऱ्या चादरीवरच्या रंगीत देवळाचं दर्शन घेतल्यावर (देवाचं दर्शन घेण्याची हिम्मत त्या तपमानात होत नाही.) आपण पुढे जातो तेव्हा केव्हा एकदा पँगाँग लेक पाहातो असं होऊन जातं. साधारण तीन किलोमीटरवर असतानाच एरवी ते दर्शन होतंही, पण हिवाळ्यातला गोठलेला हा तलाव आजूबाजूच्या बर्फात मिसळून जातो आणि अगदी जवळ जाईपर्यंत आपणाला त्याच्या भव्यतेची कल्पना येत नाही. एकदा का आपण पँगाँग लेकजवळ पोहोचले की मग खरंच स्तिमित व्हायला होतं. १४७ किलोमीटर पसरलेला हा खाऱ्या पाण्याचा तलाव हे एक आश्चर्यच आहे. पुढे दोन तृतीयांश चीनमध्ये असलेला हा गोठलेला तलाव आपलं मन मोहून टाकतो. त्या गोठलेल्या तलावाचे फोटो काढणं हे खऱ्या छायाचित्रकाराचं स्वप्न असतं. समोरचे डोंगर आणि वर पसरलेलं आकाश यांचा छाया-प्रकाशाचा खेळ सुरू असतो. क्षणोक्षणी बदलणारा पट आपल्याला असंख्य रंगांचे विभ्रम दाखवत असतो. सर्वत्र पसरलेलं बर्फ, धवल शिखरं आणि गोठलेला तलाव, पांढऱ्या रंगाच्या वेगवेगळ्या छटा एकमेकांत मिसळलेल्या असतात. या अशा ठिकाणचे फोटो काढणं ही एक कला आहे. दूरवर तलावाच्या पलिकडे असणाऱ्या भागावर सूर्यकिरणांचा झोत पडलेला असेल तर तो तेवढाच भाग सोनेरी दिसत असतो, हा भाग म्हणजे त्या फ्रेमचा केंद्रबिंदू असतो. अशावेळी किनाऱ्याचा काही भाग, गोठलेल्या तलावाच्या स्तब्ध झालेल्या लाटा, त्यावरून परावर्तित होणारा प्रकाश आणि तो सोनेरी भाग यांचा एकत्रित फोटो मनासारखा परिणाम साधतो आणि आपल्याला एक उत्तम फोटो मिळाल्याचा आनंद होतो.

हिवाळ्यात लडाखमधून वाहणाऱ्या झंस्कार आणि सिंधू या नद्याही अर्ध्या अधिक गोठलेल्या असतात. संगमाच्या ठिकाणी या दोन्ही नद्यांच्या वाहत्या प्रवाहाचे रंग आपलं लक्ष नक्कीच वेधून



घेतात. दोन्ही प्रवाहातून पाणी वाहत असलं तरी त्यांचे रंग मात्र वेगवेगळे असतात आणि हेच त्या संगमाचं वैशिष्ट्य आहे. हिरवं, निळं पाणी, त्यातून परावर्तित होणारे आकाशाचे रंग, नदीकाठची पांढुरकी तसंच राखाडी रंगाची पुळण, त्या पल्याड दिसणारी बर्फाच्छादित शिखरं हे सगळं पाहताना अनोखं दृष्य पाहिल्याचं समाधान मिळतं त्याला खरंच तोड नाही. पुढे गोठत जाणाऱ्या या नद्यांच्या प्रवाहावर आईस हॉकीच्या दर्दी खेळाडूंचा पदन्यास चालू असतो. अलिकडे कॅनडासारख्या देशातून आलेले खेळाडू तिथे या खेळाची मजा लुटत असतात आणि स्थानिक खेळाडूंनाही प्रशिक्षण देत असतात. पांढऱ्या चादरीवर रंगी-बेरंगी कपडे परिधान करून लीलया वावरणारे हे खेळाडू पाहिल्यावर आपण एका अद्‌भुत क्षणाचे साक्षीदार झालेलो असतो आणि तो क्षणही आपल्या कॅमेऱ्यात बंदिस्त झालेला असतो. याच गोठलेल्या प्रवाहावरून करण्यात येणारा चादर ट्रेक हा या सफरीतला परमोच्च बिंदू असतो. याच काळात दूरवरच्या गावातले लोक नदीच्या प्रवाहावरून चालत लेहला येतात. आणि हौशी पर्यटकही या ट्रेकचा आनंद घेतात. चादर ट्रेक हा तसा साहसी खेळातला प्रकार असला तरी लेहला अगदी सर्वसामान्य पर्यटकांनी माझ्यासोबत ही सफर सहज आणि आनंदात पार केली आहे. नदी प्रवाहावर चालणं, त्यावर तंबू ठोकून आराम करणं हा प्रकार आयुष्यात एकदा तरी करण्यासारखा आहेच आहे. वर काही फूट गोठलेला बर्फ आणि त्या खालून खळाळत जाणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाचा आवाज कान लावून कण्यात जी मजा वाटते, जो थरार आहे तो क्वचितच एखाद्या गोष्टीत आपल्याला जाणवेल.

चार भिंतीआडची दुनिया मात्र या थंडीशी सामना करायला

सज्ज असते. आलेल्या अतिथीला आदरातिथ्याचा लाभ तर होतोच पण काही कमी पडू दिलं जात नाही. याच दरम्यान एखाद्या गावात लग्नसमारंभाचा घाट घातलेला असेल तर त्या समारंभात आपण सामील होण्याची अमूल्य संधी आपणाला चालून येते. तिथले लोक 'अतिथी देवो भव' म्हणून आपलं नक्कीच स्वागत करतात. थंडीने गोठलेल्या वातावरणात जान आणण्यासाठी असे समारंभ याच काळात मुद्दामहून आयोजण्यात येतात.

लडाखच्या पारंपरिक घरात विशेषत: स्वयंपाकघरात आणि देवघरात आपल्याला अनेक कधी न पाहिलेल्या वस्तू पहायला मिळतात. अनेक पुराणवस्तू आपलं लक्ष वेधून घेत असतात. घराबाहेरच्या जगात बौद्ध धर्मीयांनी लावलेल्या पताका वाऱ्यावर नाच करत असतात आणि त्यांचा खेळ पाहतापाहता आकाशातले ढग, त्यांचे आकार, सावल्या यांचा संगम होवून एक माहोल तयार झालेला पहायला मिळतो. या सगळ्या पार्श्वभूमीवर उंचावर असलेला शांती स्तूप, लेह पॅलेस, थिकसे गुंफा, शे पॅलेस ही ठिकाणं एखाद्या ऋषी-मुनींसारखी ध्यानस्थ भासतात. शांती स्तुपाच्या परिसरात भुरभुरत्या बर्फाचा सडा पडलेला असतो. शुभ्र रंगात न्हाऊन निघाली अवघा परिसर मन:शांती देतोच देतो. पाहणाऱ्याला आपलंसं करून टाकतो. नजर जाईल तिथे बर्फ अंगाखांद्यावर घेऊन पसरलेल्या काराकोरम पर्वतरांगा, हिंदुकुश पर्वत आणि हिमालयाच्या कुशीतला हा नयनरम्य प्रदेश आपली वाट पहातोय. इथल्या प्रेमळ माणसांचं आदरातिथ्य अनुभवण्याकरीता लडाखच्या हिवाळ्यात भेट देणं क्रमप्राप्त आहे.

कुणी सुंदरी लेऊन बसली
धवलरंगी वस्त्रे
निळ्या जांभळ्या आकाराची
किती पहा छत्रे
झुळझुळू वाहे पदर तिचा की
नदीकाठ आहे?
फडकत शेला वाऱ्यावर वा
पताकाच आहे?
पाचूंचा हा हार असे का
तशी पसरली दरी?
सुवर्णखजिना कसा सांडला
चांद्रभूमी वरी?
ती साद घालते पहा तुम्हाला
पाहुणचारा बसा
नसेल जागा जगती दुसरी
आथित्यच हा वसा

**– आत्माराम परब, नरेंद्र प्रभू**
info@ishatours.net
भ्रमणध्वनी : ९३२००३१९९०



||ग्रंथाली|| ||
पुस्तक प्रकाशन वृत्तांत





# कविता मनातल्या, कविता कोर्टातल्या....
# न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांच्या कवितासंग्रहाचे शानदार प्रकाशन....

गुंता गाठींचा सोडवायचा असतो
सरळ असणं दोऱ्याचा स्वभाव असतो.....
किंवा
प्रश्नांचं गारुड अन् कागदांचं भारुड... येकच खरं...
कोर्ट बी कागूद अन् न्याव बी कागूदच...

या आणि अशाच कविता वाचल्या जात होत्या आणि त्यांना उपस्थितांकडून जोरदार दाद मिळत होती.

मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांच्या कवितांमधील या ओळी. 'कविता मनातल्या, कविता कोर्टातल्या' या त्यांच्या पहिल्यावहिल्या कवितासंग्रहाचे नुकतेच मुंबईत प्रकाशन झाले. यावेळी या आणि अशाच इतर अनेक कवितांनी श्रोत्यांची मने जिंकली.

निर्भीड आणि परखड न्यायाधीश म्हणून लोकांना परिचित असलेल्या न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांचा वेगळा संवेदनशील चेहरा यानिमित्ताने रसिकांना पाहायला मिळाला.

न्यायालयाच्या धबडग्यात स्वतःचा स्वतःशी संवादच कमी होऊ लागला होता. त्या काळात माझा स्वतःचा आवाज ऐकण्यासाठी मी कविता लिहीत राहिले, अशा शब्दात न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांनी आपली कविता-लेखनामागची भूमिका मांडली.

प्रा. मीना गोखले या त्यांच्या रुईयातील मराठीच्या प्राध्यापिका. त्यांनीच त्यांना कवितांची गोडी लावली. प्रकाशनाला त्याच प्रमुख पाहुण्या होत्या. न्याय देण्यासाठी कायद्याबरोबरच समाज जाणून घेणेही गरजेचे असते. न्यायमूर्ती भाटकर यांनी त्यांच्या आयुष्यात अभिनय आणि लेखनामध्ये जी मुशाफिरी केली आणि कवितेच्या निमित्ताने जी संवेदनशीलता जपली ती त्यांना समाज समजून घेण्यासाठी उपयोगी पडली अशा शब्दात प्रा. गोखले यांनी आपल्या या शिष्येचे कौतुक केले.

पुस्तकाचे प्रकाशन जाहिरात क्षेत्रातील नामवंत भरत दाभोळकर यांच्या हस्ते झाले. आपण स्वतः गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमधून कायद्याची पदवी घेतली असल्याची माहिती देऊन दाभोळकरांनी त्यावेळच्या आठवणी जागवल्या. कायदा आणि निर्मितीक्षमता एकत्र नांदणे शक्य नसल्याचे लक्षात आल्यानेच आपण जाहिरात क्षेत्रात गेलो. पण न्यायमूर्ती भाटकर यांना दोन्ही गोष्टी साधल्या आहेत. त्यांनी कवितालेखन यापुढेही चालू ठेवावे असा आग्रहाचा सल्ला त्यांनी यावेळी दिला.

कवी अरुण शेवते यांनी यावेळी न्यायमूर्ती भाटकरांच्या कवितांचे रसग्रहण केले. प्रसिद्ध अभिनेते व न्यायमूर्ती भाटकरांचे पती रमेश भाटकर तसेच ज्येष्ठ विधिज्ञ वीरेंद्र तुळजापूरकर यांनी यावेळी काही कवितांचे सादरीकरण केले. 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर यांनी हे प्रकाशन म्हणजे आनंदाचा योग असल्याची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रसन्न सूत्रसंचालन अनघा भट-बेहरे यांनी केले.

जुन्या पिढीतील नामांकित संगीतकार स्नेहल भाटकर हे न्यायमूर्ती भाटकर यांचे सासरे. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य या कार्यक्रमाला लाभले होते. उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या सोहळ्याला कायदा व रंगभूमीच्या क्षेत्रातील अनेक नामवंत आवर्जून उपस्थित होते.

॥ग्रंथाली॥✲॥
पुस्तक प्रकाशन वृत्तांत

## पप्पूच्या पुड्या'चे थाटात प्रकाशन

अमरावतीचे सुप्रसिद्ध होमिओपॅथिक प्रॅक्टिशनर डॉ. प्रशांत पाठक कथित आणि त्यांचे बालमित्र जी.बी. देशमुख ह्यांनी शब्दांकित केलेल्या 'पप्पूच्या पुड्या' या पुस्तकाचे येथील अभियंता भवनात थाटात प्रकाशन झाले. पुस्तकाचे विमोचन ज्येष्ठ होमिओपॅथ डॉ. सुधाकरराव पाठक ह्यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद डॉ. प्रदिप शिंगोरे ह्यांनी भूषविले.

आपल्या प्रास्ताविकात डॉ. प्रशांत पाठक ह्यांनी पुस्तकामागची भूमिका समजावून सांगितली, तर जी.बी. देशमुख ह्यांनी पाठकांचा दवाखाना अमरावतीकरांच्या ह्रदयात कसा वसला आहे ते सांगितले. डॉ. एस.के. पाठक ह्यांनी थोडक्यात होमिओपॅथीचे मर्म समजावून सांगितले.


माजी प्राचार्य डॉ. विजया डबीर ह्यांनी पुस्तकाची विस्तृत मीमांसा केली. सुप्रसिद्ध ब्रिटिश लेखक ओ. हेन्री ह्यांच्या लघुकथांमधील धक्कातंत्राच्या शैलीशी 'पप्पूच्या पुड्या'मधील कथारूपी प्रसंगाशी त्यांनी तुलना केली. दवाखान्यातील प्रसंगांना कथारूपात उतरविण्याचे कठीण कार्य लेखकाने लीलया पेलले आहे, असेही त्या म्हणाल्या. 'पप्पूच्या पुड्या' हे नाव जरी विनोदी वाटत असले तरी ह्यामधील काही कथा मिस्किल तर काही गंभीर जीवनानुभव देणाऱ्या आहेत. पुस्तकाच्या चपखल शीर्षकामुळे त्याविषयी निर्माण होणारी उत्कंठा अनाठायी नाही, कारण डॉ. प्रशांत पाठक आणि जी.बी. देशमुख ह्या दोघा बालमित्रांनी घडवून आणलेली ही साहित्यकृती अत्यंत वाचनीय झाली आहे, असा अभिप्राय त्यांनी दिला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. प्रदिप शिदोरे ह्यांनी त्यांच्या मिस्किल शैलीत पुस्तकावर प्रतिक्रिया दिली. 'ग्रंथाली'सारख्या प्रतिष्ठित प्रकाशनाने हे पुस्तक प्रकाशित करावे यातच पुस्तकाच्या वाचनीयतेची खात्री पटते, असे त्यांनी सांगितले.

अमरावतीच्या पॉप्युलर बुक सेंटरचे संचालक नंदकिशोर बजाज आणि दै. हिंदुस्थानचे प्रबंध संचालक विलास मराठे ह्यांनीसुद्धा आपले मनोगत व्यक्त केले.

'ग्रंथाली' प्रकाशन, मुंबईचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांचा संदेश याप्रसंगी वाचून दाखवण्यात आला.

जी-७७ परिवारातर्फे उपस्थितांचे स्वागत प्राचार्य निशिकांत काळे ह्यांनी केले. १९७७ साली मणीबाई गुजराती हायस्कूलमधून मॅट्रिक पास झालेल्या दहावी (फ) च्या विद्यार्थ्यांच्या या ग्रुपविषयी त्यांनी अत्यंत रोचक शब्दात महिती दिली. आभारप्रदर्शन ॲड. प्रशांत यावले ह्यांनी केले, तर कार्यक्रमाचे खुमासदार संचलन लक्ष्मीकांत वरणगावकर आणि डॉ. अनिल जावरकर ह्यांनी केले.





**पप्पूच्या पुड्या – डॉ. प्रशांत पाठक, शब्दांकन : जी.बी. देशमुख**

पुस्तकाचा खरा चरित्रनायक बडनेरा रोडवरील २२ बाय ६च्या क्षेत्रफळात बंदिस्त, पण अनेक पेशंटच्या तीन पिढ्यांच्या मनांमध्ये विस्तारलेला, रुजलेला पाठकांचा दवाखाना आहे. हे पुस्तक दवाखान्याच्या त्या वास्तूचे आहे. तिथल्या प्रामाणिकतेच्या, आपुलकीच्या, मायेच्या वातावरणात घडलेल्या किंवा त्या वातावरणाशी निगडित असलेल्या घटनांची आणि व्यक्तींच्या विविध छटांची ही अभिव्यक्ती आहे. गेल्या तीस वर्षांत या दवाखान्यात त्यांना आलेले विलक्षण, अदभूत अनुभव, विविध स्वभावाच्या पेशंटस्चे मजेदार किस्से तसेच काही गंभीर जीवनानुभव त्यांचे बालमित्र जी.बी. देशमुख यांनी 'पप्पूच्या पुड्या' या पुस्तकात शब्दांकित केले आहेत.


**मूल्य १२० रु. सवलतीत ७५ रु.**

रोहन प्रकाशन

# ग्रंथपान




**ब्रेकफास्ट, बंच, हाय-टी**
**नव्या जीवनशैलीसाठी नव्या संकल्पना...**
**नव्या रेसिपीज**
**उषा पुरोहित**




**मधुमेही खुशीत...**
**अत्याधुनिक मार्गदर्शनातून**
**मधुमेह ठेवा मुठीत!**
**डॉ. प्रदीप तळवलकर**

**ब्रेकफास्ट**

दिवसभराच्या धावपळीसाठी शरीराला आणि मनाला ऊर्जा देणं, उत्साह देणं गरजेचं असतं. म्हणूनच पौष्टिक व स्वादिष्ट मेनू असलेला ब्रेकफास्ट महत्त्वाचा ठरतो.

**ब्रंच**

सुट्टीच्या दिवशी निवांत उठल्यानंतर सकाळचा ब्रेकफास्ट आणि दुपारचं जेवण क्लब' करून ब्रंच'चा मेनू ठरवल्यास
थोडा चेंज' होतो आणि रोजच्या स्वयंपाकाची धावपळही वाचते! आपल्या कुटुंबासमवेत छान वेळ घालवण्यासाठी किंवा सगेसोयऱ्यांसोबत सुट्टीचा 'आनंद लुटण्यासाठी ब्रंच' हा उत्तम पर्याय ठरेल!

**हाय-टी**

साग्र-संगीत जेवणाचा घाट घालायचा नसल्यास २-३ किंवा ४ निवडक स्नॅक्चे पदार्थ बनवून छानसं
'शॉर्ट ॲंड स्वीट' असं गेट-टुगेदर करता येतं. दुपारच्या चहा-बिस्किटांबरोबरच अभिरुचीपूर्ण पदार्थांचा हाय-टी' मनमुराद आनंद देईल.
पुस्तकाच्या अंतरंगाची झलक...

| ब्रेकफास्ट | ब्रंच | हाय-टी |
|---|---|---|
| पाश्चात्त्य ब्रेकफास्ट | राजस्थानी ब्रंच | विविध |
| उत्तरप्रदेशी ब्रेकफास्ट | ढाबा स्पेशल ब्रंच | देशी-विदेशी |
| दाक्षिणात्य ब्रेकफास्ट | चायनीज ब्रंच | गोड व तिखट |
| महाराष्ट्रीयन ब्रेकफास्ट | थाई ब्रंच | डेलिकसीज |

**पृष्ठे २००, आकार : डेमी, हार्डबाउंड**
**मूल्य २५० 'ग्रंथाली' येथे सवलतीत २०० रुपये**

* मला मधुमेह का झाला?
* मधुमेह कधीच बरा होत नाही का?
* मधुमेहामुळे मला अंधत्व येऊ शकेल का?
* मधुमेह आनुवंशिक आहे का?...

...मधुमेहाचं निदान झाल्यानंतर मनामध्ये अशा प्रश्नांचं काहूर माजतं. मात्र योग्य जीवनशैली अंगिकारल्यास मधुमेहावर नियंत्रण ठेवता येतं. यासाठी मुंबईचे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे मधुमेहतज्ज्ञ डॉ. प्रदीप तळवलकर यांचं हे पुस्तक म्हणजे ग्रंथरूपी दिलासा आहे.
मधुमेह होऊ नये यासाठीच्या मार्गदर्शनाबरोबरच 'मधुमेह' या विषयावरची संपूर्ण बाराखडीच त्यांनी या पुस्तकात दिली आहे.

* मधुमेह म्हणजे काय?
* त्याच्याशी मुकाबला कसा करावा?
* आहार आणि व्यायामाचं नियोजन कसं करावं?
* गुंतागुंतीच्या व्याधी टाळण्याकरता कोणती दक्षता घ्यावी?

अशा सर्व कळीच्या मुद्यांवर तपशीलवार व उदाहरणांसह
अत्याधुनिक मार्गदर्शन यात मिळेल.
मधुमेहाबद्दलची सर्व माहिती देत, त्याच्याशी निगडित समज-गैरसमज दूर करून शास्त्रशुद्ध पद्धतीने या आजाराकडे बघण्याचा आशावादी दृष्टिकोन रुजवणारं पुस्तक!

**पृष्ठे २५४, आकार : डेमी, हार्डबाउंड**
**मूल्य ३०० 'ग्रंथाली' येथे सवलतीत २०० रुपये**

पद्मगंधा प्रकाशन


# ग्रंथपान

**पर्जन्यास्त्र : मानवी चेहऱ्याच्या विज्ञानकथा**

पर्जन्यास्त्र हा प्रा. म. वि. दिवेकर लिखित विज्ञानकथांचा संग्रह पद्मगंधा प्रकाशनाने नुकताच प्रकाशित केला आहे. एकूण दहा कथांचा हा संग्रह सर्वच स्तरातील वाचकांना आपला वाटेल इतका उत्तम झाला आहे. विज्ञानाचे प्राध्यापक व सर्पमित्र असलेल्या लेखकाने विविध शास्त्रशाखांमधील वैज्ञानिक सत्यांचा व्यापक व तपशीलवार आधार घेतानाच या कथांमधील ज्ञान, विज्ञान व मनोरंजनाचा बाजदेखील संतुलितपणे सांभाळला आहे.

कथाविश्वामध्ये विज्ञानकथा काहीवेळा 'अंतराळ'कथा, 'संत्राळ'कथा, 'तंत्राळ'कथा वा 'मंत्राळ'कथा असा काहीसा कृत्रिम जगाकडे प्रवास करताना दिसते. अशा निर्जीव कथांच्या पार्श्वभूमीवर पर्जन्यास्त्रमधील कथा मात्र मानवी चेहऱ्याच्या, ताज्या प्रतिभेच्या व सजीव धाग्यांनी विणलेल्या वाटतात. खऱ्याखुऱ्या वाटतात. त्यामुळेच काल्पनिकतेचा आल्हादक आस्वाद देतानाच वाचकाला भानावर ठेवत विचारप्रवृत्त करतात. ब्रेश्तच्या 'एल्यनेशन इफेक्ट' हीच तर विज्ञानवादी अपेक्षा मांडतो.

...अर्थात, विज्ञानकथांमधील ओघानेच येणारे जादुई झपाटलेपणदेखील या कथांमध्ये आहेच. वास्तवाच्या अस्तित्वापार अलगद विहार करीत नेतानाच जाणीव जागी ठेवत अद्भुताचं जग वास्तवात विलीन करू पाहणाऱ्या या कथा आहेत.




पर्जन्यशास्त्र
म.वि. दिवेकर

लघुकथा या साहित्यप्रकाराला 'Slice of Life' अर्थात 'आयुष्याचा एक (परिपूर्ण) काप' असे म्हटले जाते. नेमके हेच सकस साहित्यमूल्य देण्यात लेखक यशस्वी झाला आहे असे म्हणता येईल. या संग्रहातील बहुतेक कथा या संशोधक व्यक्तिरेखांच्या संशोधनकथा आहेत. त्यांच्या विशिष्ट प्रयोगांभोवती केंद्रित राहूनच लेखकाने कथानकाचा विस्तार विशिष्ट अवकाशमर्यादेत मोठ्या खुबीने केला आहे. त्यामुळेच मर्यादित चौकटीतूनही सर्वंकष जीवनाचे विलोभनीय दर्शन घेता येते.

'पर्जन्यास्त्र' ही पहिलीच कथा विशेष प्रायोगिक वाटते. पारंपरिक आकृतिबंधापासून काहीशी फारकत घेत माणूस व निसर्गाचा तत्त्वसंवाद साधत ही कथा एक प्रकारे संपूर्ण कथासंग्रहाचे बीजभाष्यच समोर मांडते. निसर्गाच्या अफाट पसाऱ्यातील क:पदार्थ असणाऱ्या माणसाचा दुर्दम्य आशावाद तसेच अघोरी महत्त्वाकांक्षेसह अनेक वृत्ती-प्रवृत्तींचा धांडोळा यात घेतला आहे. त्याबरोबरच वनस्पती, प्राणी व पक्ष्यांसह एकूणच निसर्गावरील निस्सीम प्रेम वाचकांच्या मनात रुजवण्याचा मानस व्यक्त होताना दिसतो.

'ब्लॅक विडो' ही प्रगल्भ लेखणीच्या आविष्कारातून आलेली व अत्यंत समर्पक शीर्षकाची एक नायिकाप्रधान कथा आहे. 'पगला कहीं का', 'लिव्हिंग रोबो', 'गाभ्यातला शोध' व 'प्रोग्रॅम्ड सुसाईड' या कथा संशोधन जगतातील निसर्गद्रोही बाजारूपणावर प्रहार करतानाच जाज्वल्य राष्ट्राभिमानाबरोबर वैश्विक मानवतेचाही पुरस्कार करतात.

'पक्षिगान'चे उच्च कथामूल्य गूढवादातून पोथ्या-पोतड्यांच्या आख्यायिकांतून 'ज्ञान सर्वांसाठी खुले' करण्याचा मानस व्यक्त करते. यातील पक्षीजगताची सफर विलक्षण अंतर्मुख करणारी आहे.

'अंधारातलं जग' सहजतेने तपशिलात नेणारी, 'अंधार' व 'प्रकाशा'च्या सीमारेषांचा मागोवा घेत 'चांगल्याचा वाईटावर विजय' असा संदेश देणारी कथा आहे.

'मंगळ वक्री झाला' म्हणजे थरार व विस्मयाच्या वलयात लपेटलेली 'इन्व्हॉल्व्हमेंट फँन्सी' अर्थात भान हरपून स्वप्नातली सैर करवणारी एक पटकथा असे या कथेचे वर्णन केल्यास वावगे ठरू नये. 'पुनर्जन्म'मध्येही असाच काहीसा चकित करणारा अनुभव येतो. इतर कथांच्या मानाने या कथांचा दृश्यात्म प्रभाव विलक्षण वेगळा वाटतो.

विज्ञानातील अनेक शाखा-उपशाखांमधील संशोधनांचे संदर्भ घेताना नॅनोटेक्नॉलॉजीच्या संदर्भांची काही अंशी पुनरुक्ती झाली आहे. अर्थात विज्ञानकथांचे 'भविष्यवेधी मूल्य' लक्षात घेता या शाखेचे वाढते महत्त्वच त्यातून अधोरेखित होते.

लघुकथांचे 'सुरुवात', 'विस्तार' व 'समारोप' असे तीन महत्त्वपूर्ण टप्पेदेखील बहुतेक कथांमध्ये नेटकेपणे सांभाळले आहेत. विशेषत: 'पक्षिगान' व 'अंधारातलं जग' या कथांचा समारोप अत्यंत मार्मिकपणे केला आहे. साध्या सोप्या, रोजच्या जीवनातील भाषेच्या वापरामुळे सर्वच कथा वाचकांच्या जवळ जातील यात शंका नाही.

श्री. गिरीश सहस्रबुद्धेंचे मुखपृष्ठ हे या कथासंग्रहाचे बलस्थान ठरावे असेच झाले आहे. रोरावत कोसळणाऱ्या पाऊस-प्रलयातही चिमुकल्या माणसाच्या गगनभेदी महत्त्वाकांक्षा... काहीशा हिरवट... काहीशा काळपट... आरपार भेदून जातात.

'पद्मगंधा प्रकाशना'चे प्रकाशक श्री. अरुण जाखडे यांना पुस्तकाच्या मलपृष्ठावर अत्यंत निवडक व नेमक्या शब्दांत कथासंग्रहाचे अवघे आशयमर्मच उलगडले आहे. त्यांचे मार्मिक समीक्षण आवर्जून वाचावे असेच आहे. पद्मगंधा प्रकाशनाचे विज्ञानाच्या गाभ्यातून वायुवेगाने प्रक्षेपित झालेले हे पर्जन्यास्त्र वाचकांच्या मनात मात्र फुलपाखराच्या नजाकतीनं अलगद उतरेल, असा विश्वास वाटतो.


**- डॉ. उमेश जगदाळे**
71umesh@gmail.com
भ्रमणध्वनी : ९६८९२९९८१२


**पृष्ठे १५२, मूल्य १७० रुपये**
**'ग्रंथाली' येथे सवलतीत १३५ रुपये**

साधना प्रकाशन

# ग्रंथपान




**चौथी आवृत्ती आली**

**न पेटलेले दिवे**

**राजा शिरगुप्पे**

## प्रस्तावना

'न पेटलेले दिवे' हे राजा शिरगुप्पेचं पुस्तक हे अनेक दृष्टींनी परिणाम करतं. कधी ते आपल्याला पेटवतं; कधी थंड पाणी ओततं. कधी सुन्न करेल, तर कधी भडकवेलही. त्याला भेटलेली विलक्षण मुलं, ज्यांतली बरीच बेघर होती, ती आपल्या मनातच थेट घर करून बसतात. ती स्वतः हलत नाहीत, आपल्यालाही हलू देत नाहीत. ती पोरं आपल्या असण्याला, आपल्या सदसद्विवेकबुद्धीला गदागदा हलवतात. आपल्या संस्कृतीची काळजीपूर्वक शिवलेली आणि मढवलेली वस्त्रं टराटरा फाडतात आणि आपल्याला उघडंनागडं करून टाकतात.

मला राजा शिरगुप्पेचं मोठं नवल वाटलं. माझा तो मित्र, पण हे वाचेपर्यंत त्याच्या मनाच्या या कोवळेपणाचा प्रत्यय आला नव्हता. हा निपाणीला भेटला. त्यावेळी माझं तिथं वारंवार जाणं झालं. रहाणंही झालं. देवदासींचा प्रश्न आणि बिडी–तंबाखू कामगारांचे प्रश्न यांवर त्यावेळी आंदोलनं, सभा, परिषदा चालू होत्या. त्यांत आमच्या कार्यकर्त्यांमध्ये हा होता. मला हा आठवत नाही. नंतर अलीकडे राजाने ही ओळख सांगितली. पण तेव्हा हे गुण लक्षात आले असते तर? मैत्रीची मधली वर्षं वाया गेली नसती, हे खरं. त्याचं लक्ष अशा मुलांकडे कसं बरोब्बर जातं? कधी निपाणीच्या स्टँडवरचा पोरगा असेल, की हिमालयात अमरनाथ यात्रेत याचं ओझं उचलणारा पोऱ्या असेल. कधी हॉटेलबॉय, कधी कोणी. किती विविध ठिकाणी आणि विविध स्तरांमध्ये ही मुलं भेटली. तशी ती आपल्या सगळ्यांच्या आसपास असतातच. मग आपली अनुकंपा इतकी बधिर कशी झाली? राजाने नुसती हेरली नाहीत, तर मिळेल तेवढ्या वेळात तो त्यांच्याशी दोस्ती करू शकला. म्हणूनच त्या पोरांनी याच्यापाशी मनं मोकळी, उघड केली. काहींनी तर अशा टुरिस्टांना आवडेल अशी स्वतःची 'स्टोरी' सांगितली. पण नंतर येऊन ती खोटी असल्याचं सांगितलं. आणि मग मन मोकळं करून गेली. ही मुलं सगळी अंतर्धान पावल्यासारखी नाहीशी होतात.

राजाची सहृदयता हे या आजच्या संस्कृतीला आपल्या मूळ संस्कृतीने दिलेलं उत्तर आहे. कितीही त्यांची ताकद मोठी, भरडपट्टी करणारी त्यांची यंत्रं अवजड... तरी अशी कुठे कुठे सहृदयता त्यातही टिकून रहाते, हे फार मोठं आश्वासन आहे. तिथे वरच्या जगात भावाभावांची पैशासाठी, मालकीसाठी चाललेली भांडणं पहातो. तिथं राजाच्या फाटक्या तुटक्या दुनियेतलं अमोल, अवर्णनीय जिव्हाळा आणि प्रेमही.


पुस्तक वाचून आपण काय करणार, हा प्रश्न उभा केला. या पुस्तकाने आपल्यातल्या नैसर्गिक अनुकंपेचं दार किलकिलं केलंय, ते परिस्थितीच्या रेट्याने, व्यवहारवादी आपमतलबी विचारांनी परत घट्ट बंद करून टाकणार आहोत? कुठे आसपास जगणाऱ्या पोरांकडे निदान आपली नजर जाईल, कदाचित त्यांच्याशी संवाद होईल, त्यांतल्या काहींना जगायला, शिकायला जागा करून द्यावीशी वाटेल, आणि त्यांतले काही करतीलही. जसा या भरड संस्कृतीत हा राजा निर्माण होऊ शकतो, तसे संस्कृतीचे सुंदर वनारण्य निर्माण करणारे वीर का निर्माण होणार नाहीत?

**– अनिल अवचट**

**पृष्ठे १२८, मूल्य १२५ रुपये**

**'ग्रंथाली' येथे सवलतीत १०० रुपये**

## ग्रंथाली ✲ नवीन पुस्तके



### अचानक - स्मिता भागवत

भारत - पाकिस्तान फाळणीत वासनेचं तांडव अनुभवलेला या कादंबरीचा नायक - संदीप शहा कोवळ्या वयातच अत्यंत समंजस होतो. प्रखर बुद्धिमत्ता असलेला हा नायक परिस्थितीच्या चटक्यांनी टोकाचा स्वाभिमानी आणि एकांगी बनत जातो. कोवळ्या वयात झालेली कुटुंबाची वाताहत, अत्यंत प्रेमळ आणि कष्टाळू पित्याने केलेली आत्महत्या, दांपत्य जीवनात आलेले दारुण अपयश आणि आपल्या अपत्यांना आपण मायेची ऊब देऊ न शकल्याचा गंड, या सगळ्याची बोच त्याला अस्वस्थ करत राहते. नायकाच्या या मनोवस्थांची चित्रणे लेखिकेने अत्यंत समर्थपणे साकारली आहेत. कादंबरीचे कथानक सत्य घटनेवर आधारित असल्याने नायकाचा मानसिक संघर्ष वाचकाला अस्वस्थ केल्याशिवाय राहत नाही.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

---



### ... पुत्र मानवाचा! - स्मिता भागवत

रखरखीत आयुष्यात ओॲसिस ठरावं त्याप्रमाणे अंबरीषच्या आयुष्यात आलेली मीना त्याचं अवघं जीवनच बदलून टाकते. पण जितक्या वेगाने त्याच्या आयुष्यात सुखाची पालवी फुटते तितक्याच वेगाने आणि आकस्मिक त्याच्या आयुष्याचं पुन्हा वाळवंट होतं, ते मीनाला झालेल्या अपघाताने! त्यानंतर भेटलेल्या अर्चनाशी झालेली जवळीक आणि मीना शुद्धीत आल्यानंतर नायकाच्या- अंबरीषच्या मनातील आंदोलने लेखिकेने समर्थपणे टिपली आहेत. नायकप्रधान या कादंबरीत स्त्री-पुरुष नात्याची वीण सांधताना मानवी मनातील संघर्ष ठळकपणे साकारला आहे. माणसाच्या आयुष्याची दोर नियतीच्याच हातात असल्याने 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा!' या ओळीचा प्रत्यय या कादंबरीतून येतो.

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

---



### आर्त माझ्या बहु पोटी - विजय शं. माळी

''एवढं सगळं असूनही ना 'इथं' कधी रमलो, ना कधी आपलं वाटलं, ना इथल्यांनी तसं कधी जाणवू दिलं. 'तिथं' आपण मनापासून रमतो, ते आपलं वाटतं पण तिथले आपल्याला आपलं मानत नाहीत. माणसं मतलबांना आपलं मानतात तो सोडून इतरांना परकं आणि मग मतलबाविना माणूस परक्या मुलखात परका होतोच पण तो सांभाळता नाही आला तर दस्तुरखुद्द आपल्या घरात, आपल्या मुलखातही. या मानवनिर्मित निसर्गनियमाला माती मात्र आजही अपवाद आहे. जे तिच्या सान्निध्यात आलं ते उभं राहिलं, फुललं फळलं, बहरलं. लडखडत्या पावलात तिनं बळच भरलं. नगण्य अपवाद वगळले तर माणसानं मात्र आपला पाय आडवाच घातला. 'माती' आणि 'माणूस' मग तो रक्ताचा का असेना यातला फरक हाच! मातीला सगळ्यांचीच माया, तिची सारीच लेकरं. मलाही तिच्यासारखं होता येऊ दे. कुणी माझ्याशी कसंही वागलं, कितीही वाईट वर्तन केलं तरी. तिचं मातीपण, तिचं ममत्व, माझ्या रंध्रा रंध्रात उतरू दे. धमन्यातून वाहू दे. शक्य झालं तर सर्वांच्याच. मला कुणी परका मानू नये, उपरा ठरवू नये. मी ही या मातीचा आहे, माझ्या मातीमायचं तुमच्यासारखंच लेकरू!''

आपला गाव आणि तिथल्या मातीवर विलक्षण प्रेम करणाऱ्या मनस्वी नायकाची, जीवनाच्या विविध अंगांना थेटपणे भिडताना विविध प्रश्न उभे करत; समकालीन कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक पर्यावरणाचा अचूक वेध घेणारी; अत्यंत सूक्ष्म, ओघवत्या, चिंतनगर्भ; आपल्या अशा खास शैलीत लिहिलेली, काळजाला भिडणारी महत्त्वपूर्ण कादंबरी.

**मूल्य ६५० रु. सवलतीत ४०० रु.**

## ग्रंथपान

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३

अकरा कथा असलेला 'मृगतृष्णा' हा लक्ष्मीकांत देशमुख यांचा कथासंग्रह नुकताच वाचून बाजूला ठेवला. एक वावटळ सभोवती फेर धरून नाचते आहे, तिच्यात आजूबाजूचा पालापाचोळा सामावला जातो आहे, वर भिरकावला जातो आहे आणि तसाच तो वरवर जातो आहे, असे चित्र दिसू लागले. आपले अस्तित्व आहे, ही स्पष्ट करणारी वावटळ, जी नशीब, समाज, जात, राजकारण, परंपरा या नावाने अजूनही अस्तित्वात आहे. तर, भिरकावणे हे आपल्या होणाऱ्या ससेहोलपटीचे, कमकुवत मनाचे, दुभंगून टाकणाऱ्या प्रवृत्तीचे, शोषणाचे प्रतीक. आपल्याला काय वाटते याला किंमत नाही, जे घडणार आहे, ते घडत जाणार आहे. आणि तसे घडवणारी व्यवस्था आपल्याभोवती तिचे पाश पसरून सजग आहे. 'ब्रह्मास्त्र' या कथेतील सईला सरपंच व्हायचं आहे. शासनाने महिलांसाठी राखीव जागा ठेवलेल्या आहेत. शरद आणि नीताच्या पाठिंब्याने ती सरपंच होतेदेखील. पण.. पण अनेक वर्षे तिथे सरपंच म्हणून संस्थानिक झालेला रोकडे तिचे प्राक्तन म्हणून तिथे हजर आहे, राहूसारखा. तो जे 'ब्रम्हास्त्र' फेकतो, त्याने केवळ सईचे सरपंचपद जात नाही, तिचे सर्वस्वच उद्ध्वस्त होते. इथे का, कसं? असे प्रश्न उपयोगी ठरत नाहीत. इतकेच नव्हे तर उच्चशिक्षित आणि उच्च पदाधिकारी असलेले शरद, नीताही हतबल ठरू शकतात. पालापाचोळा म्हणून कुणी असावं, याला संकेत नाहीत. 'प्रत्येक स्त्रीने लक्ष्मी, सरस्वती दुर्गा व्हावं. सरस्वती म्हणजे साक्षर, सुशिक्षित व विचारी होणं. लक्ष्मी म्हणजे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणं. आणि दुर्गा होणं म्हणजे अन्यायाविरुद्ध कणखरपणे लढणे...' हे फक्त भाषणासाठी उत्तम!




प्रेम हा शब्द जीवनदान देतो की जहर? किती निर्मळ आणि कोमल भावना दडलेली आहे या शब्दात. 'मेरे सरदार'मधील शामल किती निरागस आहे. तितकाच तिचा सुखा. प्रेमासाठी तो पंजाबातून महाराष्ट्रात येतो. तिच्या आग्रहाखातर पारंपरिक दाढीमिशा काढून तिच्या स्वप्नातला राजकुमार होतो. सुखाने संसार सुरू असताना आईबापाला भेटण्यासाठी पंजाबला जायला निघतो. तेव्हा तीच त्याला दाढीमिशा राखण्याचा आग्रह धरते. पण त्याचा परिणाम? इंदिरा गांधींचा खून याच दरम्यान होतो. त्याला जबाबदार असतो शीख तरुण. एवढेच निमित्त पुरे होते. एक समाज दुसऱ्या समाजाची शिकार करू लागतो. त्यात सुखाची आहुती जाते. सुखाने सुरू असलेला प्रेमाचा संसार.. कारण ठरते ती शामलच. 'जात नाही ती जात' या कथेतील शीतल आणि रमेश यांचे प्रेम असेच, निरामय, निखळ. पण जातीचा अहंकार आडवा येतो तेव्हा हे प्रेम कुठल्या कुठे भिरकावले जाते. सुरू होते ते सूडाचे राजकारण. यात होरपळणारे जीव ना स्वतः सुखाला ओंजळीत घेऊ शकत ना कुणाच्या ओंजळीत प्रेम ओतू शकत. मग आप्पा – अण्णा हे निमित्तमात्र ठरतात. 'मृगतृष्णा' कथेतील सविता आणि तो, यांच्यातला भावपिसारा तर अप्रतिम. संवादरूपाने तरलपणे थरथर करीत नाचत असलेला आणि तसाच थरथर करीत कातर होत गेलेला. आपापल्या जागी आपले असणे हे परंपरेचे आहे, ते पाळले पाहिजे. तरी त्यात एक निखळ ओढदेखील आहे. निर्मळ ओढ. हा संयतपणा म्हटले तर दोघेही दाखवू शकतात, स्वतःवर पूर्ण विश्वास मात्र हवा.


भविष्य / ज्योतिष्य यावर कुणी किती विश्वास ठेवायचा, हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न. परंतु या भविष्याचे कुतूहल आणि त्यातून निर्माण होणारे पेच, हे केवळ ज्यांनी ते ऐकण्याची आग्रही भूमिका घेतली तेच समजू शकतात. भविष्य कधीही सुखाने जगू देत नाही, ते ऐकले तसेच घडणार, या विश्वासाने सारे आयुष्यच नासवून टाकते. हा अनुभव 'तळहातावरील रेषा' या कथेतील किरण आणि अनिरुद्ध यांच्या वाट्याला येतो, तोही विदारकपणे. यात विश्वासही ओढला गेलेला आहे. एकमेकांवर विश्वास आणि एकमेकांवरील अविश्वास याचा हा वास्तववादी पुरावा या कथेत सापडतो. तीच तऱ्हा 'कृष्णार्पण वस्तू' या कथेत आहे. प्रेम, जीवापाड प्रेम आणि ज्योतिष यात अडकलेले नचिकेत, गार्गी हे जोडपे. एकमेकांसाठी किती त्यागाची भावना. पण भविष्य...

स्त्री आणि पुरुष यांच्या नात्याला अनेक पदर आहेत. सारे विश्व याच पदराने विणलेले आहे. कितीही उलगडले तरी त्याचा थांग न लागलेले. लक्ष्मीकांत देखमुख यांनी या नात्याचा शोध घेण्याचा प्रयत्न या कथांमधून केलेला आहे. अगदी असोशीने. मानसशास्त्रीय अंगाने देखील तो झालेला दिसतो. 'निळे डोळे' हे त्याचे उत्तम उदाहरण होय. कथेचा आत्मा म्हणजे लहानसे बीज, परंतु कथा फुलत जाते, तिच्यातली उत्कंठादेखील वाढत जाते. यासाठी लेखकाकडे जी सिद्धता असावी लागते, ती देखमुखांकडे आहे, हे प्रकर्षाने जाणवत राहते. पुंडलिक वझे यांचे सुंदर मुखपृष्ठ या संग्रहाला लाभले आहे. तृष्णा भागत नाही ती मृगतृष्णा. हाताशी आहे, परंतु ते गवसत नाही. भासातच सारे विरत जाते. स्त्रीपुरुषाचे नाते असेच तर असते, कधी जवळ, कधी जवळ असूनही अनेक योजने दूर. उरतात फक्त खुणा सुंदर! मुखपृष्ठ!

**मूल्य २५० रु. • सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

'खरं तर 'गॉडफादर' नावाचा शब्द ही सर्वस्वी पुजो यांच्या कल्पनाशक्तीची कमाल आहे. कारण त्यांच्यापूर्वी असा शब्द कोणीही माफियांसाठी वापरलेला नव्हता. अगदी खाजगीतही नाही.' मुळातच गॉडफादर या सिनेमाविषयी प्रचंड कुतूहल. त्यात हे नावीन्य. एक वेगळाच आनंद, एका शब्दाचा जनक सापडल्याचा. तशी ऑस्कर विजेत्या सिनेमांचे कुतूहल प्रत्येक सिनेमाप्रेमीलाच असते. त्यामागे अनेक कारणे असतात. त्यात काहीतरी विशेष असणार हे नक्कीच. तरीही महत्त्वाचा प्रश्न असतो, ऑस्कर मिळाले ते का, कशासाठी? त्या कुतूहलाचा वेग संथ होण्यासाठी उपयोगी ठरावे असे पुस्तक वाचनात आले, आणि एक वेगळीच आनंददायी प्रेरणा मनात दीर्घकाळ रुणझुणत राहिली. गॉडफादर, टायटॅनिक, गॉन विथ द विंड, बेनहर, गांधी, स्लमडॉग यांसारखे ऑस्कर विजेते काही सिनेमे आपण पाहिलेले आहेत, काहींच्या नावांशी आपला परिचय बऱ्याप्रमाणात आहे. तरीही मिळलेले विजेतेपण का, कशासाठी, याचे नेमके आकलन झालेले होतेच, असे नाही, ते या पुस्तकाने झाले, असे म्हणता येईल. अर्थात त्यासाठी अपर्णा पाटील यांनी घेतलेले परिश्रम, शोध, केलेले विश्लेषण आणि त्यापाठी असलेला त्यांचा दृष्टिकोन हे कारणीभूत आहेत, आणि ते सत्कारणी लागले, असे निश्चितपणे म्हणता येईल. ज्यांनी सिनेमे पाहिलेले आहेत, त्यांना काही वेगळे सापडल्याचा आनंद मिळेल, तर ज्यांनी हे सिनेमे पाहिलेले नाहीत, त्यांना ते पाहण्याचे कुतूहल नक्कीच जाणवेल.




या पुस्तकात दहा ऑस्कर विजेत्या सिनेमांचा ऊहापोह झालेला आहे. सिनेमा हे माध्यम करमणुकीसाठीचे साधन. परंतु त्याची निर्मिती करीत असताना त्यापाठी निर्माता, दिग्दर्शक यांची काही ठाम भूमिका असू शकते, ते या ऑस्कर मानांकित सिनेमांच्या निर्मितीतून दिसून येते. त्याचा मागोवा लेखिकेने घेतलेला आहे. त्याची उदाहरणे म्हणून 'शिंडलर्स लिस्ट' व 'टायटॅनिक'ची देता येतील. 'मी क्राकोव्हमधल्या केवळ आठ ज्यूंचा विचार करू शकत नाही. तर साठ लाख निरपराधांचा बळी ज्या संहारात झाला आणि जे हजारो लोक वाचले त्यांचं प्रतिनिधित्व करण्याच्या विचारातून हा सिनेमा करायला हवा.' 'शिंडलर्स लिस्ट' हा सिनेमा करण्यामागची स्पिलबर्ग या दिग्दर्शकाची भूमिका स्पष्ट करणारा हा ठाम विचार. 'टायटॅनिक' ही प्रेमकथा आहे. पण कॅमरून हे स्वतःच 'टायटॅनिक' या जहाजाच्या प्रेमात पडले. मग अशा दुर्घटनेच्या वेळी प्रिय व्यक्तीचं दुरावणं जगण्यासाठी कसं खंबीर बनवतं, अशा विचारातून त्यांनी ही प्रेमकथा पडद्यावर मांडायचं ठरवलं, असं लेखिका नमूद करतात. प्रत्येक सिनेमाच्या बाबतीत आपल्याला एक वेगळी भूमिका दिसून येते.

सिनेमा तयार करताना अनेक आघाड्यांवर कसरत करावी लागते. त्यात कथेतील व्यक्तिरेखांना न्याय देणारे कलावंत निवडणे, हे सगळ्यात अवघड काम. अशाच कलावंतांपैकी आपल्या परिचयाचा असलेला एक प्रसिद्ध कलावंत म्हणजे, सिल्वेस्टर स्टॅलोन. रॉकी, रॅम्बो, द एक्सपेंडिबलमधून आपण त्याला पाहिलेला आहे. त्याच्या भूमिकाही आपल्याला आवडलेल्या आहेत. आणि म्हणूनच त्याच्या एकूण या सृष्टीतील प्रवेशाविषयी, त्याच्या व्यक्तिमत्त्वाविषयी आपल्याला उत्सुकता वाटणे स्वाभाविक ठरते. या कलावंताची संपूर्ण ओळख आपल्याला या पुस्तकातून होते. तशीच ओळख गांधी सिनेमातील बेन किंग्जली, रिचर्ड ॲटनबरो, टायटॅनिकमधील केट विन्सलेट, लिओनार्दो द कॅप्रियो, गॉडफादरमधील मार्लन ब्रँडो अशा अनेक कलावंताचा परिचय आपल्याला या पुस्तकातून होतो. इतकेच नाही, दिग्दर्शक, पटकथाकार, तंत्रज्ञ, कॅमेरामन,संगीतकार अशा ज्या अनेकांचा आवश्यक सहभाग सिनेमासाठी असतो, त्यांचा परिचय करून देण्यात आलेला आहे.

कथा हा सिनेमाचा मूळ गाभा असतो. तिची निवड, तिच्याबरहुकूम सिनेमा प्रदर्शित होण्यापर्यंतचा प्रवास प्रत्येक ऑस्कर विजेत्या सिनेमाने कसा पूर्ण केलेला आहे, त्याची वर्णने थक्क करणारी आहेत. बेनहर, टायटॅनिक, गॉडफादर, रॉकी, शिंडलर्स लिस्ट ही त्यांची उत्तम उदाहरणे म्हणून सांगता येतील. ऑस्करचा इतिहास, निवड करण्याची पद्धती, कॉपीराईट, तंत्र यांचीही माहिती या पुस्तकात दिलेली आहे. लेखिका अपर्णा पाटील यांचे लेखन प्रवाही, आनंददायी आणि वाचकाला सोबत घेऊन चालणारे आहे. सगळ्या ऑस्कर विजेत्या सिनेमांची ओढ लावणारे आहे. त्यांना त्यासाठी नक्कीच शुभेच्छा द्यायला हव्यात. अशोक दाभाडे यांचे मुखपृष्ठ सिनेमाइतकेच उत्कृष्ठ झालेले आहे.

**मूल्य २५० रु. • सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

श्रम ही एकच गोष्ट अशी आहे, जिच्यासाठी कुठला अपवाद असत नाही. असू शकते ते वेगवेगळे श्रमाचे स्वरूप. असतो काही श्रमांना जन्मजात वारसा लाभलेला, तर काहींना विद्यापीठीय प्रमाणपत्रांचा आधार. तरी शेवटी ते श्रमच, शारीरिक, कौशल्याचे, कुशलतेचे, अकुशलतेचे, बुद्धीचे, मेहनतीचे. प्रतिष्ठेचे, अप्रतिष्ठेचे, दखल घेणारे, अदखल असलेले...प्रत्येकाला बांधून ठेवलेले आहे ते या श्रमाच्या रज्जूंनी. काही रेशमी तर काही कठोर. तरीही आनंदाने त्याचा स्वीकार केलेला, त्यांच्याशी समरस झालेला प्रत्येकजण. काही खुषीने तर काही अपरिहार्यतेने. कारण या सगळ्यात सामावलेले असते जीवन, आणि त्याला सावरण्यासाठी, आकार देण्यासाठी सुरू असते स्पर्धा श्रमाची. या श्रमिकांमध्ये ज्यांची कधी गणना केली जात नाही, ना दखल, अशांची मोठी संख्या आपल्या अवतीभोवती आहे, ज्यांच्याशी आपला दैनंदिन व्यवहारात सतत संपर्क येतो, तरीही दखल घेतोच असे नाही. परंतु त्यांची नोंद घेण्याचे डोळस काम केले आहे संदीप राऊत यांनी, आपल्या 'श्रमिकाख्यान' या पुस्तकात.




संदीप राऊत यांचे हे लेखन वृत्तांतवजा असून ते 'लोकमत' या दैनिकातून प्रसिद्ध झालेले आहे. परंतु वृत्तपत्रीय लेखनासारखे या लेखांना 'शिळा' या सदरात टाकता येत नाही. त्याचे कारण त्यांची लालित्यपूर्ण शैली. या शैलीला प्रवाहीपणाचे वरदान आहे. तिच्यात कथानक आहे, नाट्याचा बाज आहे आणि रचनेचे कौशल्य आहे. त्यामुळे कुठलेही पान उघडले तरी त्यातला आशय आपणास आपलासा केल्याशिवाय राहत नाही. त्यातली व्यक्तिरेखा आपल्या जवळची परिचयाचीच नव्हे तर आपली वाटू लागते. कारण या प्रत्येकाशी कधीना कधी, कुठेना कुठे आपला संबंध आलेला असतो, जोडलेला असतो. काहींशी तर दररोजचा. गंमत म्हणजे संबंध असूनही आपण त्यांच्यापासून इतके दिवस दूर होतो, हा अपराधी भावही त्या आपलेपणाच्या मुळाशी आपोआप येऊन उभा राहतो.

वर्तमानपत्राला दररोज घरपोच आणून देणारा पेपरवाला, रस्त्याच्या कडेला दुकान थाटून चहा विकणारा, वडापाव –इडली विकणारा, केळी विकणारी, सलूनवाला, तेलमालिशवाला, कानातला मळ काढणारा, रसवंती चालवणारा, सोन्याला झळाळी आणणारा, बँड – बँजोवाले, किल्ली बनवणारे, रेतीकाम, विटाकाम करणारे असे असंख्य कष्टकरी आपल्यासभोवती वावरत असतात.

या सगळ्यांची म्हणजे सुमारे एक्यांऐंशी जणांची नोंद लेखकाने घेतलेली आहे. नुसतीच माहिती दिलेली नाही, त्यामागचा इतिहास, वृतांत, कथानक, तळमळ, कौशल्य, काळ–काम–वेग , आर्थिक गणित अशा अनेक अंगांनी त्या व्यक्ती आणि त्यांच्या भोवताचे वास्तव लेखांतून उभे केलेले आहे. सोबत त्यांच्या भाषेचा लहेजाही जसाच्या तसा दिलेला आहे. भाषेतला गोडवा आणि डौल यामुळे या व्यक्तिरेखा वाचकांशी संवाद साधतात. उदा. बँडवाला म्हणतो : 'इतवारा अंद्रू कोतीनशा घरशा वराडात कमरेया काटा ढिला जाला वाजवून.' बारबाला : 'तूम क्या समझते, उपोषण करनेसे लेडीज बार बंद हो जायेंगे?' नंदीबैलवाला : 'म्हंजे आमच्यावर श्रद्धा तुमा शिकलेल्या माणसांची हाये, मग आमची श्रद्धा मात्र आंदश्रद्धा कशी ओ ठरते?' ते करीत असलेल्या व्यवसायाची एक भाषा असते, तसे तिथले काही सांकेतिक शब्द असतात, त्यांचाही परिचय होतो. वीटभट्टीशी संबंधित शब्द पहा, 'पातला' – माती पातळ द्रवरूप करणारा खड्डा. 'रगडी'–मातीचे मिश्रण पाण्याने पूर्ण ओले करून मजुराच्या पायाने रगडणे. 'भटकर' – विटांची भट्टी कौशल्याने रचणारा. 'आधला' – भट्टी तयार करताना प्रथम रांगेत विटा रचणे. 'कव' – मासेमारी, असे कितीतरी शब्द आपल्याला नव्याने भेटीला येतात. .

आयुष्याला अनेक रंग असतात. त्यातला काळा रंग. त्याची काळी बाजू, तिच्याआड असलेले जग कुणाच्या खिजगणीत नसते. त्याचा वापर मुखपृष्ठावर केलेला आहे. आणि चढावर ढकलत घेऊन जाणारे अवजड ओझे, नव्हे आयुष्यच, स्वतःच स्वतःला ढकलत नेण्यासारखे दाखवले आहे. ही श्रमिकाची बूज राखणारी सतीश खानविलकर यांची कल्पकता वाखाणण्यासारखी आहे. व्यक्तिरेखांना आणि वास्तवाला उठाव देणाऱ्या रेखाटनांनी सारेच चित्र नजरेसमोर उभे राहते. बालाजी भांगे, किरण पष्टे, अनिल रासम यांची ही रेखाटने लेखांवर उत्तम साज चढवितात.

**मूल्य २०० रु. • सवलतीत १२० रु.**


## ग्रंथपान

'पाय ठेवण्याएवढीही सुरक्षित अशी जमीन नाही. एका बाजूला अफाट वेगात वाहणारी नदी, दुसऱ्या बाजूला आता कोसळत असलेला डोंगर, रस्त्याच्या पलीकडे नदीचंच वळसा घालून जाणारं पात्र. जेमतेम शंभर मीटरच्या जागेत सगळी माणसं एकत्र आली होती. तीही सामानसुमानासकट. त्यात वरून कोसळणारा अनिर्बंध पाऊस. सगळ्यांचेच चेहरे रडवेले झाले होते. जीव वाचवण्यासाठी केविलवाणी धडपड करत म्हणण्यापेक्षा त्या ईश्वराची करुणा भाकत जीव मुठीत घेऊन आम्ही उभे होतो.'

'...आणि तो आनंदाचा क्षण आला. आम्ही १८३६० फूट उंच अशा खारदुंगला पासवर यशस्वी चढाई केली होती. आमचं उद्दिष्ट सफल झालं होतं. 'भारतमाता की जय' म्हणत आम्ही एकमेकांना मिठ्या मारल्या.

**लडाख ...प्रवास अजून सुरू आहे**

आत्माराम परब, नरेन्द्र प्रभू




आत्माराम परब, नरेंद्र पाटील, अनिल जगदाळे, परेश समजीसकर, विलास राणे, विनायक सराफ आणि पराग या मित्रांनी मोटारसायकलवरून मुंबई ते लेह – लडाख असा जो अविश्वसनीय वाटावा असा प्रवास केला, त्याचे वर्णन म्हणजे हे पुस्तक, 'लडाख... प्रवास अजून सुरू आहे.' प्रवासाची हौस असणे आणि ती वेगवेगळ्या कल्पना अमलात आणून पूर्ण करणे, यात अनेकदा साहस असते, आनंद असतो आणि जीवावर बेतणारा खेळही असतो, याचा अनुभव हे प्रवासवर्णन वाचताना येतो, अगदी पावलोपावली. परंतु हेही खरेच, इच्छा असेल, जिद्द असेल तर केवळ मार्ग सापडत नाही, तो मुक्कामी घेऊन जातो. या मित्रांनी मुंबई सोडली तेव्हा त्यांच्या मोटारसायकलींचा वेध होता लेह, लडाखचा, नजरेत जिद्द होती, ठरलेल्या कालावधीत प्रवास पूर्ण करायचा. परंतु सगळे मनासारखे ठरलेल्याप्रमाणे पार पडले, तर त्यातील सगळे अनुभव सांगण्यासारखे असतील असे नाही. जेव्हा सगळेच आपल्या मनाच्या विरुद्ध घडत जाते, तेव्हा सारेच अनुभव जिवंत होतात, कायम सोबत करतात, उत्साहाने भरभरून सांगायला भाग पाडतात, खूप काही शिकवून जातात. आणि ते सारे स्वप्नवत वाटावेत इतके उत्कट, जीवघेणे, सर्व दोर कापलेल्या अवस्थेत घुसळून काढलेले, मनस्तापाच्या खाईत ढकलून माघारी परतण्याच्या निर्णयावर आणून सोडणारे आणि शेवटी हार न मानता पुढेच पाऊल टाकलेले अनुभव या मित्रांनी पचवले, परतवले, स्मृती म्हणून प्रतिपाळ करण्यास स्वतःहून होकार दिलेले अनुभव, याला म्हणतात प्रवास. तो या मित्रांनी केला, पाहिला, अनुभवला, मनालीच्या प्रवासापासून पुढे. हिमदंश, ढगफुटी, डोंगर कोसळणे, पाहता पाहता नदीचे पात्र बदलणे, माणसे आता होती, आता नाहीत, हे सारे नंतर आपण केदारनाथ आणि लेहच्या ढगफुटीच्या प्रलयाचे चित्रण टीव्हीवर पाहिले, घरबसल्या. परंतु ज्यांच्यावर बेतली, त्यांचे काय? हा अनुभव या मित्रांनी घेतला. त्यातून सुखरूप बाहेर पडलो. आणि आपण ज्या स्वर्गभूमीच्या अनुभूतीसाठी घराबाहेर पडलो, तिचे सुंदर दर्शन घेतले. आपला विविधतेने नटलेला देश, निसर्ग याचि देही याची डोळा पाहिला. सारे श्रम सार्थकी लागले.

या प्रवासात अनेक अडचणी जशा आल्या, तशी अनेक सहृदयी माणसेही भेटत गेली. पैसे न घेता जेवण, मुक्काम, हॉटेल, प्रवासात देवदूत झाली. माणूस खरा कळतो तो अशाच प्रसंगी, त्यांच्या माणुसकीचे दर्शन विलोभनीय आहे. स्वच्छ बर्फाचे उंच कडे, कधीही न पाहिलेले निळे निळे आकाश, क्षणाक्षणाला बदलत जाणारे हवामान आणि वळणावळणावर निसर्गाचे रूप, हे सारे पाहताना, अनुभवताना या मित्रांना केवढी समृद्धी लाभली! मिलिटरीचे जवान, त्यांचे जगणे, शिस्त, माणूसपण हेही जवळून पाहता आले. त्याच्याजोडीला प्रवासात भेटलेले कारगील, द्रास, १९६२च्या युद्धाची भूमी, त्यांचा इतिहास, मेजर शैतानसिंहाची कहाणी, हे सारेच आपल्याला, त्यांच्यासोबत असल्याचा आनंद देतात.

लेह-लडाखला कसे जावे, केव्हा जावे याची माहिती आपल्याला या पुस्तकातून मिळते. नव्हे, या प्रवासासाठी हे पुस्तक उत्तम मार्गदर्शक ठरू शकते. लेखकाने स्वतःची इशा टूर स्थापन केली, ती या प्रदेशांच्या प्रेमातून, त्यामुळे या प्रदेशाची सफर ही त्यांच्यासाठी कायमची सफर ठरून गेली आहे. प्रवासाइतकीच लेखनपद्धतीही जिवंत, प्रवाही आणि वाचकाला सोबत घेऊन प्रत्ययाचा अनुभव देणारी आहे. प्रेरणादायी असे हे पुस्तक प्रत्येक प्रवास करू इच्छिणाऱ्याने आवर्जून वाचायला हवे. पुस्तकात अनेक फोटो दिलेले आहेत. मुखपृष्ठाची मांडणीही हा त्या अनुभवांचा एक भाग आहे. अतिशय छान!

**मूल्य २५० रु. • सवलतीत १५० रु.**

## ||ग्रंथाली||




### इंदिरेची स्मृतिकथा - इंदिराबाई वाडीकर

ज्या मध्यमवर्गाने संस्कृतीतल्या सत्त्वांशाला जपण्यात मोठा सहभाग दिला, त्या मध्यमवर्गाच्या सत्त्वशील अशा जीवनधारणेला इंदिराबाईंच्या स्मृतिकथेत महत्त्वाचा शब्द मिळाला आहे. इंदिराबाईंच्या स्मृतिकथेची नाळ तर समाजाच्या सुख-दु:खाशी जोडलेली आहेच. त्यामध्ये त्या काळातील स्त्रीमनाची नवी स्वप्नेही तरळत आहेत, स्त्रीच्या आंतरिक विश्वाचे दर्शनही त्यातून घडत आहे. म्हणूनच सांस्कृतिक इतिहासाचे धागेदोरे जुळवताना अशा लेखनाला महत्त्व प्राप्त होते.

मूल्य १८० रु.   सवलतीत ११० रु.

### चेकपॉईन्ट चार्ली - डॉ. माधवी मेहेंदळे



डॉ. माधवी मेहेंदळे यांनी लिहिलेली 'चेकपॉईन्ट चार्ली' ही ललित अंगानं जाणारी कादंबरी. लेखिकेला जे सांगायचं आहे ते वाचण्याची वाचकाची उत्सुकता शेवटपर्यंत अबाधित राहते. त्यांनी लिहिलेली कादंबरी फक्त मनोरंजनच करत नाही तर ती जर्मनीचा आख्खा इतिहास खूप वेगळ्या तऱ्हेनं वाचकांच्या डोळ्यांसमोर उभा करते. तसंच या कादंबरीत डॉ. माधवी मेहेंदळे यांच्यातला चित्रकार आणि कवी दोन्हीही अतिशय तरलपणे समोर येतो. सुजाण वाचकांना समृद्ध करणारा असा हा अनुभव ठरावा.

मूल्य २५० रु.   सवलतीत १५० रु.




### प्रेमाचं ऋण - माधवी कवीश्वर

माधवी कवीश्वर यांनी लिहिलेल्या 'प्रेमाचं ऋण' या पुस्तकातील आठवणी कृतज्ञतेचे रेखीव दव आहे. या लेखनात काहीसे आत्मकथन आहे. काही समाजात वावरताना आलेले अनुभव आहेत. यामध्ये काही त्यांचे वैयक्तिक अनुभव आहेत. प्रेमातल्या विविध भावांचे स्व-भावासह चित्रण आहे. छोट्या छोट्या घटनांमधून काही ना काही शिकता येते हा बोध आहे. माधवीताईंच्या संवेदनक्षम मनानं टिपलेल्या अशाच असंख्य अनुभवांचा, सकारात्मक जगण्याचा, रंगीबेरंगी कॅनव्हास म्हणजे 'प्रेमाचं ऋण' हे पुस्तक.

मूल्य १५० रु.   सवलतीत ९० रु.

### नामरंगी रंगले - शशिकांत कवीश्वर



शशिकांत कवीश्वर यांचा 'नामरंगी रंगले' हा लेखसंग्रह विविध विषयांनी नटलेला आहे. ध्यास, परिश्रम, जिज्ञासा, अंतर्मुखता, विज्ञान, श्रद्धा आणि ज्ञानाचा स्पर्श ह्या सात रंगांच्या इंद्रधनुष्याचे चित्र म्हणजे हे पुस्तक किंवा ग्रंथ. खरे तर हा ग्रंथच कारण आकार लहान असला तरी अतर्क जाड्या पुस्तकांपेक्षा इथे समाविष्ट असलेला मजकूर जास्त मौल्यवान आहे. या लेखांतून लेखकाने वाचकाशी सुलभ संवाद साधला आहे.

मूल्य १५० रु.   सवलतीत ९० रु.



### श्रमिकाख्यान - संदीप राऊत

मनुष्य जगण्यासाठी किती विविध तऱ्हेची धडपड करतो आणि त्यात रमतोही हे संदीप राऊत यांच्या या पुस्तकात वाचण्यास मिळते. राऊत यांच्या लेखनातून समाजशास्त्रीय माहिती तर अपार मिळत जाते, त्याचप्रमाणे उपेक्षित जीवनाचे विविध पैलू व्यक्त होतात. ते सारेच एकत्र वाचतांना ते कॅलिडिओस्कोपिक परिणामाचे वाटते व त्यामुळेच मनास अचंबित व्हायला होते.

**- दिनकर गांगल**

मूल्य २०० रु.   सवलतीत १२० रु.

### रचनावादी शिक्षणक्रांती - रमेश पानसे



शिक्षणात बदल करण्याची गरज निर्माण होणे वेगळे आणि तशी शक्यता असणे वेगळे. गरज आणि शक्यता ह्या दोन्हींचा मेळ घालण्याचा योग यावा लागतो. शिक्षणात आमूलाग्र बदल व्हावेत अशी मोठी गरज आज निर्माण झाली आहे आणि त्याचवेळी, असे बदल करता येतील याची शक्यताही निर्माण झाली आहे. देशामधील आर्थिक शक्ती, राजकीय इच्छाशक्ती आणि सामाजिक समंजसता ह्यांनी विचारपूर्वक एकत्र येऊन ह्या क्षणाचा लाभ उचलला पाहिजे. शिक्षणात अपेक्षित क्रांती केली पाहिजे...!!

मूल्य १८० रु.   सवलतीत ११० रु.

## प्रकाशन समारंभ क्षणचित्रे



मीना गोखले


मृदुला भाटकर



भरत दाभोळकर


सुप्रिया भाटकर


अरुण शेवते


सुदेश हिंगलासपूरकर




विरेंद्र तुळजापूरकर आणि रमेश भाटकर कविता वाचन करताना



'कविता मनातल्या, कविता कोर्टातल्या' कवितासंग्रह प्रकाशनाच्या वेळी सुदेश हिंगलासपूरकर, अरुण शेवते, कवयित्री मृदुला भाटकर, भरत दाभोळकर आणि मीना गोखले


जी.बी. देशमुख


डॉ. प्रशांत पाठक


पप्पूच्या पुड्या' पुस्तक प्रकाशनाच्या फोटोमध्ये डावीकडून लक्ष्मीकांत वरणगावकर,डॉ. अनिल जावरकर, जी.बी.देशमुख, सौ मनिषा देशमुख, सौ. राजश्री पाठक, डॉ. प्रशांत पाठक, डॉ प्रदीप शिंगोरे, डॉ. एस.के.पाठक, डॉ. सुषमा पाठक, डॉ. विजया डबीर, नंदकिशोर बजाज, विलास मराठे.

RNI No. MAHMAR/2013/50137
Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.